म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र

गांधीजींच्या

# गुजरात

रमेश मंत्री



REFBK-0027148

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं-प्रवास
ग्रं. क्र. ६४६
२७९४८
२५/१०/८३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ
ग्रं-प्रवास
६४६
२७९४८
२५/१०/८३

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

1 1 DEC 1993
18 DEC 1993
29 DEC 1993
19 JAN 1994
19 OCT 1994
15 FEB 1995
9/9/99
११/९९

( क्र. मा. पहा )
१००००—११—८९

आपला भारत महान

# गांधीजींचा गुजरात

रमेश मंत्री

RFFBK-0027148

समांतर शिक्षण प्रकाशन

आपला भारत महान
पुस्तक क्र. २

मूल्य :-
५० रुपये.

अक्षर जुळणी :-
अमेय अक्षर जुळणी,
शुक्रतारा, संत जनाबाई मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७.
दूरध्वनी· ६११२४५७.

मुद्रक आणि प्रकाशक :-
राजीव मंत्री
समांतर शिक्षण प्रकाशन
शुक्रतारा, संत जनाबाई मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७.
दूरध्वनी: ६११२४५७.

मुखपृष्ठ :-
अनिल दाभाडे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | गांधीजींचा गुजरात | ५ |
| २. | डाकोर आणि कर्णावती | १८ |
| ३. | महात्माजी आणि हृदयकुंज | २९ |
| ४. | म. गांधीजींचे राजकोट आणि जुनागढ | ३९ |
| ५. | आद्यकवी व संत नरसी मेहता | ४८ |
| ६. | गिरिनार आणि सासनगीर | ५४ |
| ७. | सर्वसाक्षी सोमनाथ | ५९ |
| ८. | विध्वंसातून पुनर्जन्म घेणारा सोमनाथ | ७१ |
| ९. | सुदामनगरी आणि बेटद्वारका | ८३ |
| १०. | श्रीकृष्णाची द्वारका | ९० |
| ११. | जामनगर आणि सुरत | १०१ |
| १२. | परमपूज्य धर्मक्षेत्र मृत्युंजय | ११६ |
| १३. | साहित्य, सगीत, नृत्य, सण व यात्रा | १२८ |

ग्रंथालय ठाणे
गु-भारा
८.५८
२८१४८
२५।७।९२

# १ गांधीजींचा गुजरात

भारतातील बहुतेक राज्ये आपल्या लक्षात राहतात, ती त्या त्या भागातील उत्तुग व्यक्तित्वामुळे केरळ म्हटले की आद्य शकराचार्यांचे नाव नजरेसमोर येते उत्तर प्रदेश आणि प. नेहरू याचा अतूट संबध आहे महाराष्ट्र म्हणजे छ शिवाजी आणि लो टिळक ही नावे अपरिहार्य आहेत राजस्थान आणि महाराणा प्रताप तसेच गुजरात म्हटले की म गाधींचे राज्य हे सर्वमान्य झाले आहे गाधीजींचा आधुनिक गुजरात, गुजराती भाषा व साहित्य याच्यावर मोठा प्रभाव पडला आहे पोरबदर, राजकोट, अहमदाबाद अशी गुजरातमधील अनेक शहरे गांधीजींच्या वास्तव्याने पुनीत झालेली आहेत गाधीजींच्या सोप्या, प्रासादिक भाषेने गुजरातीचे जुने वळण पार बदलून ग्राथिक भाषाही जनसामान्याच्या आटोक्यात आणली. त्याच्या या साध्या पण प्रभावी भाषेचे मूळ त्यांच्यावरील नरसी मेहता या आद्य गुजराती सत कवीच्या प्रभावात सापडते मृदुता, गोडवा आणि आपले तसेच परके लोक मिष्ठास वाणीने आपलेसे करणे हे गुजराती लोकाचे वैशिष्ट्य आहे याचाच एक परिपाक म्हणजे आज परदेशातही गुजराती लोक सामावून गेले आहेत व आपले वैशिष्ट्यही टिकवून आहेत द आफ्रिका, अमेरिका, इग्लड, मध्यपूर्व अशा अनेक भागात गुजराती लोकानी मानाचे स्थान मिळविले आहे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातही आज गुजराती माणूस हा मराठी भाषकाचा मित्र मित्र म्हणून वावरतो आपल्याइतकीच चागली मराठी भाषा तो बोलतो आणि आपल्याशी सर्व क्षेत्रात समरस होतो

भाषिक पुनर्रचनेनतर १९६० साली महाराष्ट्र व गुजरात ही वेगळी राज्ये झाली तरी त्यापूर्वी वर्षानुवर्षे दोन्हींचा समावेश मुबई प्रात या एकाच राजकीय व व्यावसायिक भागात होता एकेकाळी त्यात सिंधचाही समावेश होता 'गर्वी गुजरात' चे निर्माते नर्मदा शकर हे मुबईला एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये शिकले होते 'जय जय गरवी गुजरात' या काव्याला आता राज्यगीताचा मान आहे ज्येष्ठ गुजराती साहित्यकार

दलपतराम याचेही मुबईत वास्तव्य होते ते नर्मदा शकर यांचे समकालीन होते

आधुनिक गुजराती साहित्यातील बहुतेक अग्रगण्य लेखकाचा मुबईशी दृढ सबंध आला आहे महाराष्ट्राचे व गुजरातचे अत्यत जिव्हाळ्याचे सबध आहेत काकासाहेब कालेलकर हे मूळचे सातान्याचे, पण ते गुजरातीतील प्रथम दर्जाचे साहित्यिक झाले. त्यांना साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले तेही गुजराती रचनेबद्दल गुजरात विद्यापीठाचे उपकुलगुरू व गुजराती साहित्य संमेलनाचे अध्यक्ष हे मानही त्याना मिळाले याउलट महाराष्ट्राचे एक आद्य सत कवी चक्रधर हे गुजरातमधील भडोचचे राजे होते त्यानी महानुभाव पथ काढला व त्याचा महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला वेदमहर्षी पं सातवळेकर यानी आपले जीवितकार्य गुजरातेत 'पारडी' येथे पार पाडले

राम गणेश गडकरी हे आधुनिक मराठी भाषेतिल सर्वश्रेष्ठ नाटककार व कवी पण त्यानी आपली पहिली कविता व पहिले नाटुकले लिहिले ते नवसारी येथे गुजरातीतून गुजरातेत साहित्यिकाचे नाव रस्त्याला देण्याचा समारभ झाला, तो नवसारी येथे राम गणेश गडकरी पथ झाला तेव्हा तसेच लघुनिबध हा प्रकार गुजराती भाषेत रूढ करण्याचे श्रेय लोकहितवादी ऊर्फ गोपाळ हरी देशमुख या मराठी लेखकाचे आहे लोकसभेचे स्पिकर मावळणकर हे गुजरातमध्ये स्थायिक झालेले एक कर्तबगार महाराष्ट्रीय तसेच गुजरातचे नामवंत लेखक श्री के. एम मुनशी याचे मुख्य कार्यक्षेत्र मुबई हे झाले त्यानी भारतीय विद्याभवनचा विशाल ससार याच महानगरात माडला. श्री ज्योतिंद्र दवे, गुलाबदास ब्रोकर, हरिंद्र दवे, चुनिलाल मडिया अशा अनेक श्रेष्ठ गुजराती लेखकाची कर्मभूमी मुंबई हीच राहिली आहे श्री चिं वि जोशी हे ज्येष्ठ मराठी विनोदकार गुजरातेतील बडोद्याचे. महर्षी कर्वे याचे कार्य ठाकरसी यानी पुढे चालविले म गाधी हे ना गोखले याना आपले गुरू मानीत असत गुजरात आणि महाराष्ट्र याच्या एकात्मतेची ही यादी फार मोठी आहे.

आजचा गुजरात म्हणजे कच्छ, सौराष्ट्र आणि गुजरात या तीन विभागाचा मिळून एक प्रदेश झाला आहे कच्छच्या आखातापासून दीवदमणपर्यंत एक हजार मैलाचा समुद्रकिनारा या राज्याला लाभला आहे

तर दुसऱ्या बाजूला अरवली, विंध्य, सातपुडा व परियात्र या पर्वतराजी आहेत समुद्र व डोंगर याच्या सहवासात राहणाऱ्याना अनेक नैसर्गिक सकटाना तोंड द्यावे लागते आणि त्यामुळेच त्याच्यात एकमेकाना सहाय्य करण्याची, एकमेकात मिळून मिसळून रहाण्याची वृत्ती निर्माण होते तिची साक्ष गुजराती समाज कोठेही देतो. प्राचीन काळापासून या भागातील लोकाना मुशाफिरी आणि मुलुखगिरीची हौस इ. स पूर्व ५०० मध्ये सध्याच्या भावनगरपासून राजपुत्र विजयने सिलोनपर्यंत सफर करून तेथे वास्तव्य केले होते टॉलेमीने इ स. १४० मध्ये वेरावळ व पोरबदर याचा 'प्रशात बंदरे' म्हणून उल्लेख केला आहे ऋग्वेदातही द्वारकेचा उल्लेख कुशस्थळी या नावाने करण्यात आला आहे. द्वारका ही कृष्णाची राजधानी होती व सोमनाथजवळ भल्लकतीर्थ येथे श्रीकृष्णाने देहत्याग केल्याचा पुराणात उल्लेख आहे सोमनाथ आणि द्वारका ही हिंदूची परमपवित्र तीर्थस्थाने गुजरातमध्ये आहेत शत्रुंजय (पलिताना), गिरिनार, केदार आणि अनेक महत्त्वाची जैनाची तीर्थक्षेत्रेही या राज्यात आहेत. लोथला येथे हडाप्पाकालीन सस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. प्राचीन काळी समुद्रमार्गे गुजरातचा ग्रीस व रोमशीही व्यापार चालू होता गुजरातमध्ये पारशांचीही मोठ्या प्रमाणावर वस्ती आहे. सातव्या शतकात मुसलमानानी इराणवर स्वारी केली, तेव्हा शेकडो पारशी धर्मांतराच्या भीतीने त्या भागातून गुजरातमध्ये आले आजही सजाण, नयापाटी, बिलिमोरिया, गणदेवी या भागात पारशी लोकाची दाट वस्ती आहे सुप्रसिद्ध टाटा घराणे याच भागातील सध्याच्या गुजरातची लोकसंख्या सुमारे तीन कोटी असून त्यात हिंदू, जैन, पारशी व मुसलमान हे मुख्य आहेत गुजराती ही सर्वत्र प्रचलित असलेली भाषा आहे पण तीतही पारशी गुजराती हा थोडा वेगळा ढग आहे बडोद्याच्या प्रेक्षणीय स्थळात ताबवेकर हवेलीचा समावेश आहे. 'श्री विठ्ठल खडेराव ऊर्फ भाऊ ताबवेकर हे १८४९ ते १८५४ पर्यंत बडोद्याचे दिवाण होते त्यानी ही चार मजली हवेली बाधली. या हवेलीत त्या काळातील चित्रकलेचे उत्तम नमुने दाखविणारी भीत्तिचित्रे असल्याने आता राष्ट्रीय स्मारक म्हणून सरकारतर्फे या हवेलीचे रक्षण होत आहे' ब्रिटिशकालीन वातावरण असलेली उद्याने, वाड्यातील दिवाणखाने, सगीत व इतर कलात मग्न असलेल्या स्त्रिया याची उत्तम चित्रे येथे पाहावयास मिळतात त्यापैकी काही चित्राचा रग उडाला आहे तरी बहुतेक चित्रे

चागल्या स्थितीत आहेत

बडोदे हे गाव पूर्वी वडपद्रका या नावाने ओळखले जात होते. या भागात वडाची झाडे विपुल प्रमाणावर होती शेकडो वर्षांपूर्वी लोक या झाडाच्या आश्रयाखाली वस्ती करीत त्या समूहाला वडपद्रका म्हणजे वडाखालची वस्ती असे म्हणत. त्याचा वडोदरा असा गुजराती अपभ्रंश व नंतर बडोदा हा मराठी अपभ्रंश झाला.

बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड म्हणजे भारताला मिळालेली एक अद्‌भुत देणगी आहे वास्तविक ते वंशपरंपरेने राजे नव्हते म्हणूनच कदाचित आदर्श राजे झाले. बडोद्याचे राजे मल्हारराव याना १८७५ मध्ये ब्रिटिश सरकारने पदच्युत केले, तेव्हा नव्या राजाचा शोध सुरू झाला मल्हाररावाच्या ज्येष्ठ बधूच्या पत्नी जमनाबाई याना सरकारने दत्तक घेण्याचा अधिकार दिला. श्री. काशिनाथ गायकवाड हे सयाजीरावाचे वडील व बडोदा संस्थानचे संस्थापक दमाजी गायकवाड यांचे पणतु. श्री काशिनाथ गायकवाड याना तीन मुले होती. आनंद, गोपाळ व संपत. ब्रिटिश सरकारने जमनाबाईंना सुचवले होते की काशिनाथ हे मूळ सस्थापकाचे खरे वारस असल्याने त्याच्या तीन मुलापैकी एकाला दत्तक घ्यावे

त्यावेळी गोपाळ बारा वर्षांचा होता. तो देखणा होता व त्याच्या मुद्रेवर बुद्धिमत्तेची छाप होती जमनाबाईंनी गोपाळची निवड केली व तोच पुढे सयाजी या नावाने गादीवर आला. कोणत्याही सस्थानचा नवा वारस निवडायचा तो अल्पवयीन असावा असा ब्रिटिशाचा सकेत असे. कारण त्यामुळे रेसिडेन्टच्या हाती संस्थानची सत्ता राहत असे. तसेच अल्पवयीन वारस हा रेसिडेन्टच्या देखरेखीखाली शिक्षण घेत असल्याने रेसिडेंट त्याच्यावर आपल्याला अनुकूल असे संस्कार करू शकत असे जुनागड संस्थानात ब्रिटिशानी हेच केले व भारतातल्या इतरही अनेक सस्थानाचा हाच इतिहास आहे

ता २७ मे १८७५ रोजी गोपाळचे दत्तक विधान झाले आणि बडोद्याचे तिसरे सयाजीराव महाराज म्हणून ते गादीवर आले. दत्तक मातोश्री जमनाबाई आणि दिवाण सर टी. माधवराव याच्या मार्गदर्शनाखाली सयाजीरावाचे सकल्प सस्कारसपन्न असे शिक्षण झाले राजा हा प्रथम

प्रजाहितदक्ष असला पाहिजे हे त्याना मिळालेल्या शिक्षणाचे सार होते सयाजीरावाना अठरावे वर्ष लागले, तेव्हा २८ डिसेंबर १८८१ रोजी त्याच्या हाती ब्रिटिश सरकारने रीतसर राज्यकारभार सोपविला सुदैवाने सयाजीरावांना दीर्घायुष्य लाभले आपल्या प्रदीर्घ म्हणजे चौसष्ट वर्षांच्या कारकीर्दीत त्यानी सर्वोत्तम राजाचा आदर्शच घालून दिला साहित्यप्रेमी, कलाप्रेमी, नि·पक्षपाती, प्रजेच्या उन्नतीविषयी सदैव दक्ष अशी त्याची अनेक वैशिष्ट्ये सागता येतील. आचार्य अत्रे यानी म्हटले आहे, 'सयाजीरावाच्या गुणाचे नि कर्तृत्वाचे जेवढे वर्णन करावे तेवढे थोडेच आहे ! असा राजा भारतात झाला नाही पुढे होणार नाही भारताच्या निरनिराळ्या राजाच्या मुख्यमत्र्यानी आपआपल्या कार्यालयात गाधींचा फोटो टागण्याऐवजी सयाजीराव महाराजाचा फोटो लावावा '

सयाजीरावानी आपल्या प्रजेसाठी काय केले ? तर ब्रिटिशानाही आपल्या प्रदेशात ज्या सुधारणा करता आल्या नाहीत, त्या सयाजीरावांनी बडोद्यात करून दाखविल्या ग्रामपचायत ही सकल्पना भारतात प्रथम सयाजीराव महाराजानी बडोद्यात आणली १९०८ सालीच बडोद्यात कायदेमडळ स्थापन झाले. न्यायखाते आणि अंमलबजावणी खाते यांची फारकत बडोद्यात त्यांनी प्रथम केली जी ब्रिटिश सरकारला त्याच्या अखेरपर्यंत करता आली नाही 'हिंदू कायदा' कोडच्या स्वरुपात लागू करण्याचे महान कार्य सयाजीराव महाराजानी केले मागासलेल्या जमातींसाठी सवलत देण्याची कल्पना उर्वरित भारतात पन्नास वर्षांनतर आली, ती बडोद्यात १९०६ साली अमलात आली साहित्य व कलेच्या क्षेत्रात तर त्याची कामगिरी अपूर्व आहे १८९० साली सयाजीरावानी 'कला भवन' ही सस्था स्थापन केली सर्व प्रकारच्या तत्रविद्या आणि साहित्य, कला याचे बडोदा हे माहेरघरच झाले बडोदा सस्थानात महाराजानी जेवढी मोफत वाचनालये उघडून लोकाना ज्ञानाची कवाडे खुली करून दिली, तेवढी ब्रिटिश राज्यात अखेरपर्यंत नव्हती. म्युझियम हे या सस्थानचे भूषण आहे भारतातील पहिले तारागण (प्लॅनेटोरियम) बडोद्यात उभारले गेले घटस्फोटाच्या कायद्याची भारतात सर्वप्रथम तरतूद झाली ती बडोद्यात. आज गोव्यात कोकणी व मराठी भाषकाचे सघर्ष चालतात, पण महाराजानी विसाव्या शतकाच्या सुरुवातीसच बडोद्यात गुजराती व मराठी या दोन्ही भाषाना

राजमान्यता दिली होती डॉ आंबेडकराना परदेशी पाठवून भारताला एक नररत्न दिले ते सयाजीरावांनीच नामवत, विचारवत अरविंद घोष यानाही सयाजीरावानी बडोद्यात आपल्या मार्गदर्शनासाठी आणले होते त्यानी गुजरातमध्ये 'महाराष्ट्र' निर्माण केला.

कीर्तिमंदिर हे बडोद्यातील एक लक्षणीय वास्तू आहे. पूर्वजाच्या कर्तृत्वाची साक्ष म्हणून सयाजीराव महाराजांनी हे मंदिर १९२६ मध्ये उभारण्यास सुरुवात केली व दहा वर्षांनतर ते पूर्ण झाले त्यासाठी साडेपाच लाख रुपये खर्च आला या कीर्तिमंदिरातील मध्यवर्ती मंडपाला बावन्न खांब आहेत तसेच चार सगमरवरी स्तंभ असून मध्ये सयाजीराव महाराजाचा अर्धपुतळा आहे वरच्या गॅलरीत नंदलाल घोष या नामवत बगाली चित्रकाराची भित्तिचित्रे आहेत त्यातील महाभारतातील चित्र विशेष लक्षात राहते संत मीराबाई, रवींद्रनाथ टागोर याच्या 'नटीर पूजा' या कवितेतील कल्पनेचे चित्र ही चित्रेही प्रेक्षणीय आहेत सभामडपाच्या आजूबाजूला पहिल्या मजल्यावरील सात खोल्यात गायकवाड घराण्यातील महाराज व महाराण्या याचे सुदर सगमरवरी पुतळे आहेत. Truth, Ambition, Morality, Fame (सत्य, महत्त्वाकाक्षा, नैतिकता, कीर्ती) हे गायकवाड घराण्याचे आदर्श या स्मारकाच्या प्रवेशद्वारावर कोरले आहेत सबध स्मारकाचा आकार इंग्रजीतील 'ई' या अक्षरासारखा आहे. स्मारकाभोवती नयनमनोहर हिरवळ व वृक्षवेली आहेत. त्यामुळे मन प्रसन्न राहते शहराच्या ऐन मध्यातील स्टेशनजवळ असूनही या स्मारकाचा परिसर शात, निवांत वाटतो.


बडोद्याच्या राजघराण्याशी निगडित अशी दुसरी महत्त्वाची वास्तू म्हणजे लक्ष्मी विलास राजवाडा या वाड्याचे विस्तृत आवार व मोकळी जागा पाहूनच आपल्या मनावर त्याची पहिली छाप पडते या वाड्याच्या आवारात फत्तेसिंह म्युझियम आहे, ते आकाराने लहान पण वैशिष्ट्यपूर्ण आहे पहिल्या दालनात बडोद्याच्या पूर्वीच्या राजाची व त्यांच्या राण्याची उत्तम तैलचित्रे आहेत त्या राजाचे कोच, टेबले, वगैरे उची सामान ठेवल्याने त्याला खानदानी स्वरूप आले आहे. त्या समोरच्या दालनात इटालियन चित्रकार फेलिसी यानी काढलेली इटालियन शैलीतील चित्रे आहेत राजा रविवर्मा याच्या श्रेष्ठ कलाकृतींना एक स्वतंत्र दालन देण्यात

आले आहे राजा रविवर्मा हे त्रावणकोर सस्थानातील किलीमनूर या गावचे त्यांचा जन्म १८४८ साली झाला व मृत्यू १९०६ साली झाला ते मूळचे राजघराण्यातील नव्हते त्याचा राजा हा किताब वशपरंपरा चालत आलेला नाही त्याच्या चित्रकलेच्या प्रेमामुळे त्रावणकोरच्या राजाने त्याना राज्यचित्रकार केले पुढे राजघराण्यातील एक तरुणी त्याच्या प्रेमात पडली आणि तिने रविवर्माशी विवाह केला, तेव्हा त्याना 'राजा' हा किताब मिळाला राजा रविवर्मा हे या विवाहामुळे राजघराण्याचे एक सभासद झाले. त्यामुळे त्याचा म्हैसूर, बडोदा अशा इतर नामवत राजघराण्याशी संबध आला व त्या त्या राजघराण्यातील राजे व राण्या याची उत्कृष्ट तैलचित्रे राजा रविवर्मा यानी रगविली

सयाजीराव महाराजानी १८८१ मध्ये राजा रविवर्मा याना बडोद्यात आणले व त्याच्याकडून अनेक विषयावरील चित्रे काढून घेतली त्यात रामायण, महाभारतामधील ठळक प्रसग आहेत, तसेच बडोद्याच्या राजघराण्यातील प्रमुख व्यक्तीही आहेत दृष्यताला कमलपत्रावर पत्र लिहिणाऱ्या शकुंतलेचे चित्र लक्ष्मी विलास पॅलेसच्या वस्तुसग्रहालयात पाहावयास मिळते तसेच विश्वामित्र-मेनका, मस्त्यगधा व शतनु राजा, नल- दमयती, उर्वशी, अर्जुन-सुभद्रा, राधामाधव अशी भारताच्या सास्कृतिक इतिहासातील अनेक दृश्ये राजा रविवर्मा यानी या दालनात सजीव केली आहेत याच तोडीची व याच विषयावरील चित्रे आपल्याकडेही नामवत चित्रकार श्री एस एम पडित यानी स्वतःच्या स्वतंत्र शैलीत काढलेली आहेत

काही पाश्चात्त्य कलाकृतीही या संग्रहालयात आहेत. सयाजीराव अनेकदा परदेशी गेले होते त्यानी तेथून आणलेली अशी चित्रे, चिनी मातीच्या मोठ्या नक्षीदार सुरया, फ्रेंच फर्निचर वगैरेंचे उत्तम नमुने येथे पाहावयास मिळतात एका दालनात निवडक सगमरवरी पुतळे आहेत त्याची कलात्मकता नजरेत भरण्यासारखी आहे

बडोद्यातील प्रमुख म्युझियम आहे ते कामठी बाग ऊर्फ सयाजीराव उद्यानमध्ये कामठीबाग हे बडोद्यातील सर्वात मोठे उद्यान आहे त्यामुळे या वस्तुसग्रहालयाला नयनमनोहर, हिरवीगार पार्श्वभूमी लाभलेली आहे त्याचे पूर्ण नाव 'दि म्युझियम ॲण्ड पिक्चर गॅलरी' असे आहे. सयाजीराव



**बडोद्याचे म्युझियम**

महाराजानी १८८७ मध्ये त्याचा पाया घातला आणि १८९४ मध्ये ते पूर्ण झाले पिक्चर गॅलरी मात्र नतरची आहे तिची इमारत १९०८ साली बाधण्यास सुरुवात झाली आणि ती १९१४ साली पूर्ण झाली. मात्र बडोद्याच्या वैभवास साजेसा चित्रसग्रह जमा करण्यास अनेक वर्षे लागली दरम्यान पहिले महायुद्ध सुरू झाल्याने अनेक अडचणी आल्या अखेर १९२१ साली गॅलरी जागतिक कीर्तीच्या चित्रकाराच्या कलाकृतींनी सपन्न झाली आणि त्याच वर्षी तिचे उद्‌घाटन झाले या दोन्ही इमारतींचे वास्तुरचनातज्ज्ञ हे नामवत ब्रिटिश होते आर एफ चिसॉवफ आणि मेजर आर एन मॅन्ट यानी या इडो- सारसेनिक शैलीच्या इमारती बांधल्या या दोन्ही भव्य इमारती दोन मजली आहेत

या म्युझियमच्या एका दालनाचे नाव ग्रेटर इडियन रूम असे असून त्याचे प्रवेशद्वार आगबोटींच्या कमानींनी सुसज्ज केले आहे लाकडी हत्तीच्या पाठीवरील चदनाचा हौदा आणि मोठी घटा हे भारताचे प्रतीक आणि बाली बेटातली नक्षीच्या वस्तू या दालनात आपले लक्ष वेधून घेतात. भारतीय नवरीचा भरजरी वेष, लाकडी कोरीव काम, सतराव्या

शतकातील नेवारी चित्रे, ब्रम्हदेश व सयाममधील हस्तिदती मूर्ती व नक्षीकाम, बुद्धाच्या मूर्ती व बौद्ध हस्तलिखिते, सोन्याचादीची भाडी, जातक साहित्यातील दृश्य दाखविणाऱ्या मूर्ती ही या दालनातील वैशिष्ट्ये आहेत त्यापुढील जपानी दालनात जपानहून आणलेली लाख, ब्रॉझ व लाकडाची शिल्पे जपानी कलेचे सौंदर्य दाखवितात. जपानी शैलीतील चित्रे व पोशाखही या दालनात आहेत चौदाव्या शतकातील बुद्धाचा पुतळा आपले लक्ष आकर्षित करून घेतो जपानी बाहुल्या जगात प्रसिद्ध आहेत. त्याचे काही गोजिरवाणे नमुने येथे आहेत तसेच जपानी बुद्धमदिराच्या प्रतिकृतीही प्रेक्षणीय आहेत

'भारतीय कला' या विभागात भारतीय दागदागिने, उची वस्त्रे, लाकूड, लाख व हस्तिदती कलाकुसरीच्या वस्तू, गुजरात व जयपूरमधील ब्रॉझची नक्षीची भाडी इत्यादी प्रेक्षणीय वस्तू आहेत बगाल व ओरिसा यासाठी एक स्वतत्र्य दालन आहे त्यात डाक्का येथील खास उची वस्त्रे, तसेच कटक, मुशिदाबाद येथील कलाकुसरीची भाडी, चामड्याच्या वस्तू, मातकाम याचे प्रदर्शन आहे दक्षिणेकडील राज्याच्या विभागात कर्नाटक, महाराष्ट्र, केरळ, तामीळनाडू या भागातील प्राचीन मूर्ती, वस्त्रे, भाडी, नक्षीकाम, चदनाच्या सुबक वस्तू इत्यादींचे प्रदर्शन आहे मुस्लिम व मुस्लिमपूर्व काळातील कलेचे नमुने एका दालनात पाहावयास मिळतात त्यात पाटणा येथील फरीदची कबर लक्षणीय आहे चपानेर, अहमदाबाद व बडोदा या भागात सापडलेले चौदाव्या शतकातील दगडातील कोरीव कामाचे काही उत्कृष्ट नमुने या विभागात आहेत त्यानंतरच्या मोगल कला या विभागात दिल्ली, काश्मीर, जयपूर या विभागातील मोगल कलेच्या उत्तम वस्तू आहेत त्यात मीनाकामाची भाडी, काश्मिरी शाली, सुलतानच्या नक्षीकाम केलेल्या सगमरवरी फरशा, लखनौ व सियालकोट येथील चादीची नक्षीदार भाडी व हुक्के वगैरेचे वैभवशाली दर्शन घडते मोगल चित्रकलेचेही अनेक नमुने या दालनात आहेत

ओल्ड बडोदा रूम नावाच्या दालनात जुन्या बडोद्याच्या वैभवशाली खुणाची जपणूक केलेली आहे विशेषत खडेराव महाराजाच्या (१८५६) कारकीर्दीतील बडोद्याची कला येथे जतन करून ठेवली आहे त्यात ताबेकर वाड्याचे काही दरवाजे, जुनी चित्रे, लाकडी कोरीव काम इत्यादी विशेष

लक्षात राहतात नेपाळी आणि तिबेटी दालन, राजस्थान व गुजरात दालन अशा इतर दालनात त्या त्या भागातील कलेच्या वस्तू आहेत

सेंट्रल हॉल या भव्य मडपात गायकवाड राजघराण्यातील मानाच्या वस्तूचे प्रदर्शन आहे निरनिराळ्या सनदा व महत्त्वाची कागदपत्रे याची छायाचित्रे, लष्करी गणवेश, महाराजाना मिळालेल्या मौलिक भेटवस्तू, म गाधीच्या अस्थीचे अश ज्या ताब्याच्या भाड्यातून चादोड येथे विसर्जित करण्यात आले होते, ते नक्षीचे भाडे, गायकवाड घराण्यातील महाराजाचे सगमरवरी अर्धपुतळे इत्यादी बडोद्याच्या राजघराण्याशी सबधित अशा अनेक वैभवपूर्ण वस्तूनी हे दालन परिपूर्ण आहे त्याशिवाय इजिप्त-बॅबिलोन गॅलरी, इतिहासपूर्व काळातील वस्तूचे दालन, आर्किऑलजिकल विभाग, याचा खास उल्लेख केला पाहिजे त्यात गुप्तकालीन मूर्ती, राज्याभिषेकातील त्रिमूर्ती, १०४२ मधील कदब राजाच्या काळातील शिलालेख, हर्सोल येथील पर्शियन शिलालेख वगैरे वस्तू विशेष लक्षात राहतात. तसेच या विभागात ऋषभदेवाची भव्य मूर्ती असून इतर अनेक जैन शैलीतील मूर्ती आहेत. चिनी विभागात सहाव्या शतकातील चिनी कलेचे नमुने आहेत.

या सग्रहालयातील युरोपियन चित्रकलेचा विभाग अत्यत समृद्ध आहे लडनच्या एका नामवत कलातज्ज्ञातर्फे महाराजानी चित्रकलेचा हा ठेवा खरेदी केला. १९१० ते १९१४ पर्यंत ही चित्रे लडन येथे खरेदी करून ठेवण्यात आली पण महायुद्धामुळे सहा वर्षे ही चित्रे भारतास पाठविता आली नाहीत. या सग्रहात बिझिनटाईन शैलीची पधराव्या व सोळाव्या शतकातील अनेक अमोल चित्रे आहेत. या शैलीतूनच पुढे युरोपियन शैलीचा उदय झाल्यामुळे त्याना अनन्यसाधारण महत्त्व आहे फ्लेमिश शैलीतील 'डिपोझिशन फ्रॉम द क्रॉस' ख्रिस्ताच्या अखेरीचे चित्र अत्यत प्रभावी आहे हिटन या जगप्रसिद्ध इटालियन चित्रकाराच्या सेंट पीटरच्या अतावरील चित्राची हुबेहुब नक्कल येथे आहे कोअलो, रिबेरा, कॅनो या स्पॅनिश चित्रकाराच्या कलाकृती या विभागात आहेत या विभागातील सर्वांत महत्त्वाचे चित्र पोर्तुगिज कलाकाराचे आहे कॅथरीन ब्रॅगन्झा हिचे हे तैलचित्र आहे त्याला महत्त्व आहे ते यासाठी की याच राजकन्येच्या विवाहाप्रीत्यर्थ पोर्तुगालने इग्लडच्या राजाला पाच लक्ष पौंड हुडा व मुबई बेट आदण म्हणून दिले आणि मुबईचा नवा इतिहास सुरू झाला कॉलियर, ऑटो व्हॅम व्हीन इत्यादी डच चित्रकाराच्या कलाकृती या

विभागात आहेत. तसेच फ्रेंच, फ्लेमिश, ब्रिटिश, ऑस्ट्रिशन, रशियन इत्यादी शैलीतील निवडक चित्रे येथे प्रदर्शित करण्यात आली आहेत

भारतीय चित्रकला विभागात कनू देसाई, रावळ, बेंद्रे, हेब्बर, जेमिनी रॉय इत्यादी ख्यातनाम चित्रकाराच्या निवडक कलाकृती आहेत. भारतीय शिल्पकारापैकी बकरे, धनराज भगत, फडके याच्या कलाकृती आपले लक्ष वेधून घेतात ग्रीक व रोमन विभाग, औद्योगिक कला, प्रिन्टस् व नाणे विभाग इत्यादी विभागही वैभवसपन्न आहेत. प्राणिशा या विभागात व्हेल (देवमासा) माशाचा ७२ फूट लाबीचा प्रचड सागाडा आहे तसेच गीरचे सिंह, वाघ, चित्ते, अनेक प्रकारचे इतर प्राणी व पक्षी याच्या पेंढा भरलेल्या कलाकृती आहेत सागराशी निगडित असे मासे, बेडूक, कोरल, स्पज इत्यादींचा विभाग समृद्ध आहे केनिया, युगाडा, झाझिबार इत्यादी विभागातील वेषभूषा, शस्त्रे वगैरे प्रेक्षणीय आहेत या सग्रहालयातर्फे एक नियतकालिक प्रसिद्ध करण्यात येते त्याशिवाय चित्रपट दाखविण्यात येतात व भाषणेही करण्यात येतात पाश्चात्य अद्ययावत सग्रहालयातील बहुतेक सोयी येथे उपलब्ध असल्यामुळे हे सग्रहालय पाहणे हा एक आनदाचा व ज्ञानवृद्धी करणारा अनुभव आहे. ज्या कामठी ऊर्फ सयाजी बागेत हे वस्तुसग्रहालय आहे, त्याच बागेत बडोद्याचे प्राणिसग्रहालय आहे त्यात गीरचे सिंह, वाघ, चित्ते, हरणे, आफ्रिकन चिंपाझी वगैरे प्राणी व अनेक प्रकारचे सुदर पक्षी आहेत तसेच याच बागेत प्लॅनेटोरियमही आहे. हे भारतातील पहिले तारागण सयाजीराव महाराजानी जे अनेक परदेश दौरे केले, त्यात तेथे पाहिलेले बहुतेक उपक्रम त्यानी बडोद्यातही सुरू केले. हे अद्ययावत तारागण हे त्यापैकी एक आहे या उद्यानातील घड्याळही सुप्रसिद्ध आहे. वीस फूट हिरवळीच्या तबकडीवर फुलाचे काटे फिरत असतात कालवेळ यासारख्या रूक्ष सकल्पनेला दिलेले काव्यात्मक स्वरूप मोहक आहे मुलाना हे फुलाचे घड्याळ अतिशय आवडते. तसेच या उद्यानात मुलासाठी असलेली छोटी आगगाडीही मुलाची लाडकी आहे

कँटोनमेन्ट भागातील उद्यानात इएमई या नावाचे मदिर हे अगदी वेगळे व वैशिष्ट्यपूर्ण मदिर आहे इएमई म्हणजे इलेक्ट्रिकल अँड मेकॅनिकल इजिनिरिंग स्कूल असा खुलासा वाचला की ही कोणी देवी नसून सस्थेचे नाव आहे हे लक्षात येते हे मदिर उद्यानात आहे त्यामुळे त्याला हिरवेगार

नेत्रसुखद अशी पार्श्वभूमी लाभली आहे विशेष म्हणजे त्याचे डोंगराच्या सुळक्यासारखे टोक या आकारामुळे व ज्या वस्तूने ते तयार केले आहे त्या वस्तूमुळे झटकन लक्षात भरते गेल्या महायुद्धात माडलेले व निकामी झालेले एक विमान बडोद्यात आणण्यात आले. त्या वेळी येथील इलेक्ट्रिकल अँड मेकॅनिकल इजिनियरिंग स्कूलचे प्रमुख एक ब्रिटिश ब्रिगेडियर होते. या निकामी -ानाच्या पत्र्याचा उपयोग करून एक मदिर बाधावे अशी त्यानी कल्पना काढली व या सस्थेच्या विद्यार्थ्यांनी व अध्यापकानी तिचा पाठपुरावा करून हे अगदी वेगळे दिसणारे मदिर उभारले. बावीस चौरस मीटर्स व्यासपीठ तयार करून त्यावर हे ज्ञान (दक्षिणमूर्ती शिव) मदिर बाधण्यात आले. त्याच्या पत्र्याचा मनोरा २१ मीटर्स उच आहे मदिरातील वातावरण प्रसन्न व स्वच्छ असून पारपरिक मदिराऐवजी हे आधुनिक युगाला साजेसे असे वैज्ञानिक मदिर झाले आहे मदिराचा आसमतही सुदर व स्वच्छ ठेवण्यात आला आहे. ज्याला जिओडेसिक (घुमटासारखे) म्हणतात, अशा पद्धतीने लाकडी बाधकामाच्या या मदिरावर पाढरा शुभ्र विमानाचा पत्रा चमकतो

न्यायमदिर ही बडोद्यातील एक मध्यवर्ती इमारत आहे काही शहराचे विशिष्ट लँड मार्क्स असतात. जसा दिल्लीचा चादणी चौक, मुबईचा फ्लोरा फौटन तसा न्यायमदिर हा बडोद्याचा 'लँड मार्क' आहे. जवळच असलेला सुखसागर तलाव म्हणजे बडोद्याचे आणखी एक वैभव आहे तलावाजवळ मोठा बाजारही आहे तो खडेराव मार्केट या नावाने प्रसिद्ध आहे सुखसागराच्या काठी सध्याकाळच्या रमणीय वेळी बसून तलावाची शोभा पाहणे हा बडोद्यातील हृद्य अनुभव आहे.

महाराज सयाजीराव विद्यापीठ हे बडोद्याच्या राजघराण्याच्या कीर्तीत भर घालणारे या शहराचे एक वैशिष्ट्यपूर्ण ठिकाण आहे कला, विज्ञान, वाणिज्य, तत्रज्ञान इत्यादींबरोबरच कँकलरी ऑफ आर्टस, इजिनियरिंग इत्यादी शाखाही हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत. १९५२ पासून येथे हा खास वेगळा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. आता हा पदवी देणारा अभ्यासक्रम असून या भागातील हा एकमेव आहे भारतात असे शिक्षण देणाऱ्या फक्त सहा सस्था आहेत देशातील वस्तुसग्रहालयाची सख्या वाढत असून त्याच्यापाशी प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी याची मोठी गरज आहे ती या अभ्यासक्रमानी भागविली आहे

सेन्ट्रल लायब्ररी हे मध्यवर्ती ग्रथालय. १९१० साली स्थापन झालेल्या या ग्रथालयाने आपला हीरक महोत्सव साजरा केला बडोद्यातील अनेक सास्कृतिक सस्था प्रजाहितदक्ष राजे सयाजीराव गायकवाड यानी स्थापन केल्या सेंट्रल लायब्ररी ही त्यापैकीच एक त्यानी १९१० साली वीस हजार ग्रथाचा आपला सग्रह सार्वजनिक ग्रथालयासाठी दिला श्री. बोर्डन हे अमेरिकन तज्ज्ञ या ग्रथालयाचे पहिले ग्रथपाल होते आता या ग्रथालयातील पुस्तकाची सख्या साडेतीन लाखावर गेली आहे फक्त दहा रुपये अनामत भरून या ग्रथालयाचा कोणालाही मोफत उपयोग करता येतो मराठी, गुजराती, हिंदी, इग्रजी, सिंधी व उर्दू अशा सहा भाषातील पुस्तके येथे असून त्यापैकी मराठी ग्रथाची सख्या सत्तर हजार आहे. सस्थेचे १५०० सर्वसाधारण सभासद असून त्याशिवाय महिला विभागाचे ३५० व बालविभागाचे एक हजार सभासद आहेत वृत्तपत्रे व मासिकेही लोकाना मोफत वाचण्यासाठी मिळतात मुबई व पुणे येथील प्रमुख मराठी वृत्तपत्रे येथे येतात

मराठी नाटकाच्या इतिहासात बडोद्याला खास स्थान आहे कारण मराठी नाट्यसृष्टीचा मेरुमणी अशी बालगंधर्व कपनी ही श्रीमत सयाजीराव गायकवाड याच्या आश्रयाखाली होती. बडोद्याचे महाराज सयाजीराव यानी एखाद्या नामवत नाटक कपनीस वर्षासन देऊन सस्थानास त्या कपनीचे नियमित खेळ करण्याची योजना आखली तीनुसार निरनिराळ्या कपन्याना विचारणा झाली 'ललित कलादर्श'च्या केशवराव भोसले यानी वार्षिक दहा हजार रुपये सागितले गधर्व कपनीने पाच हजाराची मागणी केली व ती मान्य झाली गधर्व कपनी जेव्हा 'बडोद्याच्या महाराजाच्या आश्रयाखाली' असे आपल्या जाहिरातीत लिहू लागली, तेव्हा केशवराव भोसले यानी ललित कलादर्शचा उल्लेख 'खास लोकाश्रयाखालील' असा करण्यास सुरुवात केली. मराठी नाटकाची परपरा आजही बडोद्यात दिमाखाने चालू आहे प्रेमाबाई हॉल या नाट्यगृहात गुजराथीबरोबर मराठी नाटकेही होतात शिवाय खुद्द बडोद्यात 'बडोदा अमॅच्युअर्स असोसिएशन' सारख्या कार्यक्षम नाट्य सस्थाही आहेत बडोद्याचे मराठी नाट्यसृष्टीत मानाचे स्थान असण्याचे आणखी एक कारण म्हणजे राम गणेश गडकरी याच्या 'एकच प्याला' या विख्यात नाटकाचा पहिला प्रयोग बडोदा येथे झाला


❑

# २. डाकोर आणि कर्णावती

बडोद्याहून डाकोर हे अतर ६५ किलो मीटर्सचे आहे मोटार किंवा रेल्वेने तेथे जाता येते रेल्वेने आनद गोध्रा फाट्यावरून जावे लागते डाकोर गाव लहानच आहे पण गोमती हा मध्यवर्ती तलाव गावात आहे पौराणिक कथेनुसार या गोमती तलावाच्या काठी डक नावाचे ऋषी तप करीत होते त्याच्या तपाने प्रसन्न झालेल्या शकराने येथे राहण्याचे मान्य केले तेव्हापासून डकेश्वर महादेवाची स्थापना झाली आणि त्याचाच पुढे अपभ्रश होऊन डाकोर हे उच्चारसुलभ नाव पडले भीमाने गदाप्रहार करून हा गोमती तलाव निर्माण केला अशीही कथा आहे या प्रहाराच्या गगनभेदी आवाजाने डकऋषींचा तपोभग झाला त्या वेळी भीमाबरोबर श्रीकृष्णही होते डक मुनींच्या विनतीवरून श्रीकृष्णाने येथे वास्तव्य करण्याचे मान्य केले पण आपले अवतार कार्य सपल्यावरच आपण येथे येऊ असे त्यानी सागितले पुढे सत बोडाणाच्या प्रयत्नामुळे श्रीकृष्ण हे द्वारकेहून येथे आले

सत बोडाणाची कथा अशी आहे की, विजयसिह बोडाणा नावाचा कृष्णभक्त येथे राहत असे तो दरवर्षी द्वारकेची यात्रा करून कृष्णाचे दर्शन घेई पण उतारवयात त्याला ती यात्रा झेपेना कारण त्या काळी चालत किंवा बैलगाडीने हा खडतर प्रवास करावा लागे त्याची दया येऊन श्रीकृष्णाने त्याला दृष्टात दिला की 'मीच तुझ्या गावी येऊन राहतो' त्याप्रमाणे बोडाणा बैलगाडी घेऊन द्वारकेला गेला त्याने भोळेपणाने तेथील पुजाऱ्याना सागितले की, 'भगवान श्रीकृष्ण या गाडीतून माझ्याबरोबर डाकोरला येणार आहेत' त्यावर पुजाऱ्यानी मदिराची दारे बद करून घेतली आणि भोवती कडेकोट पहारा ठेवला पण रात्री सर्व पुजाऱ्याना निद्रिस्त करून श्रीकृष्ण बोडाणाच्या बैलगाडीत बसले आणि डाकोरला आले मदिरात मूर्ती नाही असे पाहून सतप्त झालेले पुजारी मोठ्या सख्येने डाकोरला आले त्याच्या आगमनाची वार्ता लागल्याबरोबर बोडाण्याने श्रीकृष्णाची मूर्ती गोमती तलावात लपवली डाकोरमध्येही मूर्ती नाही असे पाहून पुजाऱ्यानी सत बोडाण्याचा खून केला, तेव्हा गोमतीचे पाणी

श्रीकृष्णाच्या रक्ताने लाल झाले मूळ मूर्तीऐवजी पुजाऱ्याने त्या मूर्तीच्या वजनाएवढे सोने घेतले आणि ते परतले या ठिकाणी सुवर्णतुलेच्या प्रसिद्ध आख्यानाची पुनरावृत्ती झाली कारण मूर्तीच्या वजनाइतके सोने गरीब बोडाण्याच्या पत्नीकडे कुठून असणार ? पण श्रीकृष्णाने चमत्कार केला आणि तिने दिलेल्या एकुलत्या एका कर्णफुलाचे वजन मूर्तीएवढे भरले ते सोने घेऊन पुजारी द्वारकेला परतले मग तलावातून मूळ मूर्ती काढण्यात येऊन तिची डाकोरला प्रतिष्ठापना करण्यात आली या मदिराचा व महाराष्ट्राचा जिव्हाळ्याचा सबध आहे कारण अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात गुजरातवर पेशवे राज्य करीत होते त्या वेळी सातारा येथील श्री गोपाल जगन्नाथ ताबवेवार यानी या मदिराचा विस्तार केला



डाकोरचे मंदिर

गोमती तलावासमोरच डाकोरजीचे मदिर असल्याने हेच या गावातील एकमेव धार्मिक व सास्कृतिक केद्र आहे तलावात लहानसे बेट आहे त्यावर जाण्यासाठी लहानसा पूल आहे. याबरोबर दत्त, हनुमान व रणछोडराय याच्या पादुका आहेत रणछोडराय हे श्रीकृष्णाचे नाव पडण्याचे कारण असे, की सत बोडाण्याच्या भक्तीमुळे श्रीकृष्णाने कच्छच्या रणातील

द्वारका सोडली आणि तो डाकोरला आला या आसमंतात जी दहा धार्मिक महत्त्वाची ठिकाणे आहेत, त्यात पुरातन डंकेश्वर महादेवाचे मदिर व श्रीकृष्णाच्या मूर्तीचे ज्या खोलीत वजन केले होते, ती खोली आहे त्या ठिकाणी सत बोडाणा व त्याची पत्नी गगाबाई याच्या मूर्ती आहेत मुख्य डाकोरजीचे मदिर भव्य आहे १५० चौरस फूट आवारात हे मदिर उभारण्यात आले आहे मदिराची उची ८० फूट आहे व शिखरावर सोन्याचा कळस आहे मदिराला दोन शिखरे व प्रवेशद्वाराजवळ तीन घुमट आहेत जवळच दोन दीपस्तभ आहेत मुख्य दरवाजा चादीचा असून त्यावर कालियामर्दन, राधाकृष्ण इत्यादी कृष्णाच्या जीवनातील ठळक प्रसंग कोरले आहेत. उत्तरेकडील प्रथेप्रमाणे मदिर काही ठराविक वेळेतच खुले राहते इतर वेळी देवाचे भोजन, विश्राती इत्यादीसाठी ते बद असते दरवाजा उघडेपर्यंत भक्तमडळी बाहेर भजन किंवा नामस्मरण करीत असतात रणछोडरायची मूर्ती सुमारे साडेतीन फूट उचीची व काळया पाषाणाची आहे. गाभाऱ्याची महिरप सोन्याची असून मूर्तीजवळ चादीचा रथ आहे मदिराबाहेर मुदपाकखाना आहे तेथून देवाला भोग व प्रसाद पाठविण्यात येतो

शारदांबा मदिर हे डाकोरचे आणखी एक आकर्षण आहे या मदिराची उभारणी अलीकडेच म्हणजे १९७० साली झाली आहे द्वारकापीठाच्या शकराचार्यांच्या प्रेरणेने श्रीयंत्राच्या मेरूपृष्ठ या प्रकारच्या वास्तुशिल्पकलेचा हा उत्कृष्ट नमुना आहे द्वारकाधीशाच्या महाद्वारासारखेच येथेही महाद्वार आहे मदिरातील मुख्य देवी श्री शारदाबेची आहे जवळच आद्यशकराचार्य आणि दत्त याच्या मूर्ती आहेत मदिराच्या चौथऱ्याचा आकार श्रीयत्राचा आहे वेगळ्या पद्धतीचे मदिर म्हणून हे लक्षात राहते या मदिरात एक ध्यान गुफा असून तीत लक्ष्मीनारायण, नवग्रह व आद्यशकराचार्य याच्या मूर्ती आहेत

अहमदाबाद, अहमदनगर, औरंगाबाद अशी मुस्लिम वळणाची जी नावे आहेत, ती मुसलमान बादशहानी जुनी नावे बदलून नवी केलेली आहेत. अहमदाबादचेही असेच नामातर झाले आहे सुरुवातीची सर्व गावे नदीच्या काठी बसवली जात तसेच साबरमती नदीच्या काठी आशाभिल्ला राजाने आशावता हे गाव अकराव्या शतकात बसवले पुढे त्याचा असपल्ली असा

अपभ्रंश झाला पंधराव्या शतकाच्या सुरुवातीस सुलतान अहमदशहा याचा मुक्काम साबरमतीच्या काठी कर्णावतीस असताना त्याने नदीजवळच्या हिरवळीत एक विलक्षण दृश्य पाहिले, ते असे की, त्याने सशांवर आपले कुत्रे सोडले तेव्हा ससे भिऊन पळून गेले नाहीत तर कुत्र्याच्या नजरेला नजर देऊन प्रतिकारार्थ तेथेच थांबले ते अद्भुत दृश्य पाहून सुलतान अहमदशहाने आपले गुरू गजबक्ष याना त्याचा अर्थ विचारला. तेव्हा गुरू म्हणाले, ''ही देवभूमी आहे तू येथेच राजधानी स्थापन कर.'' त्याप्रमाणे अहमदशहाने इ स. १४११ साली या ठिकाणी राजधानी सुरू केली व या गावाचे कर्णावती हे नाव बदलून त्याचे 'अहमदाबाद' केले त्यानंतर ५५० वर्षांनी अहमदाबादजवळ गांधीनगर ही नवी वसाहत तयार करण्यात आली आणि ती गुजरातची राजधानी करण्यात आली अर्थात हा अलीकडचा इतिहास झाला गुजरातमधील द्वारका, सोमनाथ या तीर्थांचे उल्लेख पुराण कालापासून हजारो वर्षे होत आहे सोमनाथ, भडोच, सुरत, लोथल इत्यादी भागांत साडेचार ते पाच हजार वर्षांपूर्वीच्या मानव संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. १ मे १९६० रोजी महाराष्ट्राबरोबरच स्वतंत्र गुजरात राज्याची स्थापना झाली

पूर्वीच्या अनेक राजधान्याप्रमाणे अहमदाबाद किंवा कर्णावती नगरीभोवती उंच तट होता त्याचे अवशेष आजही पाहावयास मिळतात अर्थात बरेच ठिकाणी हे तट पडीक अवस्थेत आहेत, तरी आजही या शहराचा उल्लेख Walled city (तटाचे शहर) असा करण्यात येतो पूर्वी कर्णावतीभोवतीच्या तटबंदीला बारा दरवाजे होते. तीन दरवाजात ही जुनी वेस यापैकीच एक आहे. आजच्या अनेक पटींनी वाढलेल्या वस्तीला ती काहीशी अडचणीचीच झाली असली तरी जुने अवशेष राखून ठेवण्याच्या सरकारी धोरणाने ती टिकून आहे. लाल दरवाजा हीही जुन्या अहमदाबादची एक खूण या लाल दरवाजाजवळ भद्र हा किल्ला आहे किंवा खरे तर जुन्या किल्ल्याचा एक भाग आहे. पूर्वी इथे राजवाडा होता व सुंदर उद्यान होते आता तेथे सार्वजनिक बांधकाम खात्याचा कचेऱ्या आहेत. जवळच भद्रकालीचे देऊळ आहे गुजरातवर जेव्हा पेशव्याचा अमल होता तेव्हाचे हे कालिमातेचे मंदिर आहे पेशव्याच्या काळात दमाजी गायकवाड आणि कदमबांडे यांनी या भागात करवसुली चालू ठेवली होती

इ स १७८१ मध्ये गायकवाडानी बडोद्यास स्वतत्र राज्यही स्थापन केले लाल दरवाजाजवळच्या कालीमातेची मूर्ती उभी काळ्या पाषाणाची असून तिची जीभ चादीची आहे भद्र हा अहमदाबादला एक अतिशय दाट वस्तीचा व गजबजलेला भाग आहे याच भागात अहमदाबादचे प्रमुख महाराष्ट्र मडळ आहे बरेच मराठी भाषक भद्र भागात एकवटले आहेत

कर्णावती नगरी कापड उद्योगाबद्दल मशहूर आहे हे शहर भारताचे मँचेस्टर म्हणून ओळखले जाते. मात्र गेल्या दहाबारा वर्षांत दगली व इतर अनेक कारणानी येथील कापड व्यवसायाला ओहोटी लागली आहे तसे पाहिले तर भारतातील इतर अनेक शहराप्रमाणे अहमदाबादेतही जुने शहर व नवे शहर असे दोन विरोधी व्यक्तिमत्त्वाचे भाग आहेत साबरमतीच्या एका बाजूला जुने पुराणे गाव आहे काहीसे गलिच्छ, भरपूर गजबजलेले अरुद रस्त्याचे, काळवडलेले साबरमतीवर पूर्वी एकच पूल होता तो एलिस ब्रीज त्यामुळे पुलाच्या पलीकडे फारशी वस्ती वाढली नाही मात्र हळूहळू या पुलाची सख्या एकावरून सातावर गेली आणि पलीकडच्या भागाचा पद्धतशीर, आखीव रेखीव विकास झाला आश्रमरस्ता, नवरगपुरा इत्यादी भाग अद्ययावत भरपूर रुद रस्त्याचे, उच व आधुनिक पद्धतीच्या इमारतींचे असे आहेत चदीगडचे निर्माते ला कार्बुझर हे या नव्या अहमदाबादच्या अनेक इमारतीचे वास्तुशिल्पकार आहेत या दोन भागामुळे शहरात एकसधपणा नाही मुबईचे धारावी व मलबारहिल किंवा पुण्याचे भवानी पेठ व नवापेठ हे अगदी वेगळ्या गावाचे भाग वाटावेत तशीच कर्णावतीचीही गत आहे सस्कृतीच्या बाबतीतही हेच म्हणता येईल शेकडो वर्षांच्या मुसलमान अमलाचा परिणाम, जैन परपरा व हिदू सस्कृती याचे मिश्रण अहमदाबादमध्ये दिसते

प्रदीर्घ मुस्लिम अमलामुळे या शहरात मुस्लिम धर्तीच्या अनेक वास्तू दिसतात जुम्मा मशिद ही त्यातील प्रमुख वास्तू. ही शहराच्या मध्यवर्ती भागात आहे सुलतान अहमदशहाने ही भव्य व सुदर मशीद १४२३ साली बाधली 'पूर्वेकडील सर्वात सुदर मशीद' असे जॉन मार्शल यानी हिचे वर्णन केले आहे मशिदीचे नमाज पढण्याचे आवार इतके भव्य आहे की प्रथमदर्शनीच त्याची आपल्यावर छाप पडते हे आवार ३९० फूट लाब व २५० फूट रुद आहे सर्व बाजूनी कमानी व स्तभ आहेत या चौकाभोवती



जुम्मा मशिद


२६० नक्षीदार स्तभ आहेत. तसेच १४ धारदार घुमट आहेत. सुलतान अहमदशहा याची कबर या मशिदीत आहे एका वेळी पाच हजार लोक या चौकात प्रार्थना करू शकतात मशीद व सर्व आवार अत्यत स्वच्छ व प्रसन्न ठेवण्यात आले आहे या मशिदीत झुलते मिनार होते पण १८१८ सालच्या भूकपात ते उद्‌ध्वस्त झाले अहमदाबादमध्ये आणखी दोन ठिकाणी झुलते मिनार आहेत हे मिनार म्हणजे वास्तुशास्त्रातील एक चमत्कारच आहे स्टेशनजवळ सिद्धी बशीर मशिदीचे मिनार १४८५ साली हमीदा शिद्दी बशीर याने बाधले त्याची उची पचाहत्तर फूट असून ते पाच मजली आहेत तळाला ते एकमेकाशी जोडले आहेत वर चढण्यासाठी गोलाकार जिने आहेत हे मनोरे दोन लोक हलवतात तेव्हा हे बळकट दगडी उच मनोरे गदगदा हलतात ते आत्ता पडतील की काय अशी पाहणाऱ्याला

भीती वाटते मी पूर्वी दोन वेळा या अद्‌भुत मिनाराचा हा खेळ पाहिला आहे जगात इतरत्र कोठेही असा वास्तुशास्त्रातील चमत्कार पाहावयास मिळत नाही मात्र हल्ली हे मिनार हलविण्यास बदी आहे

मिर्झापूर भागात राणी रूपमती मशीद आहे हिंदू स्त्रीचे नाव मुस्लिम मशिदीस देण्याचे कारण असे की महमद बेगडा याची एक बेगम रूपमती ही हिदू होती तिच्या स्मृतीसाठी ही मशीद बाधण्यात आली जुम्मा मशिदीनतर वीस वर्षांनी राणी रूपमती मशीद बाधण्यात आली. हिंदू व मुस्लिम अशा मिश्र जातीची शिल्पकला येथे पाहावयास मिळते या मशिदीचे मिनारही १८१८ च्या भूकपात नष्ट झाले-

शाहिबाग रस्त्यावरील स्वामी नारायण मदिर हे अहमदाबादचे एक प्रमुख धार्मिक स्थळ आहे स्वामी नारायण हे दोनशे वर्षांपूर्वीचे एक सत व आध्यात्मिक नेते होते या पथातर्फे अनेक देशात मदिरे व आध्यत्मिक केंद्रे उभारण्यात आली आहेत अहमदाबादचे हे अक्षर पुरुषोत्तम मदिर त्यापैकीच एक बिर्ला यानी देशभर बाधलेल्या मंदिराप्रमाणेच या पथाची मदिरेही भव्य, कलात्मक असतात आणि त्याचे आवार अत्यंत स्वच्छ व प्रसन्न असे असते या पथाची मुख्य कचेरी लंडन येथे नॅसहेन विभागात आहे मुंबईसही दादर (सेंट्रल) स्टेशनसमोर या पथाने एक विशाल मदिर अलीकडेच बाधले आहे या पथाचे कार्य बरेचसे रामकृष्ण मिशनच्या धर्तीचे आहे कारण हा पथ केवळ वैयक्तिक अध्यात्मावर भर देत नसून प्रत्यक्ष समाजकार्यही मोठ्या प्रमाणावर करतो भारत, अमेरिका, इंग्लड, ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, प जर्मनी, कॅनडा, केनिया, टाझानिया, युनायटेड अरब रिपब्लिक इत्यादी अनेक देशांत मंदिरे व आध्यात्मिक केद्रे आहेत सिगापूर, थायलड, अशा पूर्वेकडील देशातही मंदिरे व केंद्रे आहेत दुष्काळ, पूर, आग, साथीचे रोग इत्यादी सकटसमयी या पथातर्फे जनतेला साहाय्य देण्यात येते

स्वामी नारायण पथाच्या या अक्षर पुरुषोत्तम मदिराच्या आवारात आपण प्रवेश करतो तेव्हा विस्तीर्ण स्वच्छ चौक, एका बाजूला धार्मिक ग्रथ विक्रीकेंद्र दिसते. प्रवेशद्वाराजवळ दोन्ही बाजूना हनुमान व गणपती यांच्या मूर्ती आहेत मदिराचा मडप लहान असला तरी नक्षी केलेल्या पाढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडाचा व सुंदर आहे जयपूर शैलीच्या महिरपी व नक्षीदार



अक्षर पुरुषोत्तम मंदिर

छटा यामुळे मडप अधिकच लक्षात राहतो मदिराच्या डाव्या बाजूला राधा, श्रीकृष्ण व हरिकृष्ण महाराज याच्या सुबक मुर्ती आहेत गाभाऱ्यातील मुख्य मूर्ती तीन आध्यात्मिक नेत्याच्या आहेत गुणातीतानद महाराज, सहजानद स्वामी व गोपालानद स्वामी यांच्या या पाढऱ्या सगमरवराच्या मूर्ती आहेत त्याना जोधपुरी वेष घातलेला आहे जवळच उजव्या बाजूला स्वामी नारायणाची आसनस्थ मूर्ती आहे मदिराच्या शिखरावर व भिंतीवर बाहेरच्या बाजूने अनेक सताच्या मूर्ती कोरलेल्या आहेत महाराष्ट्रीय सतही आहेत तुकाराम, ज्ञानेश्वर, रामदास या मराठी सताच्याबरोबरच सत

मीराबाई, तुलसीदास, प्रल्हाद, ध्रुव इत्यादींच्याही मूर्ती आहेत मदिर व त्याच्या आवारातील वातावरण पवित्र व सौंदर्यदृष्टीला सुखविणारे असे आहे

असेच आणखी एक लक्षणीय मदिर म्हणजे शाही रस्त्यावरील शेठ हाथीसिंह जैन मंदिर या मदिराकडे लाबून पाहिले की शिखरेच शिखरे दिसतात शेठ हाथीसिह केसरीसिह व त्याची पत्नी सौ. हरकुवरजी यानी हे मदिर बाधले प जवाहरलाल नेहरू याच्या भगिनी या हाथीसिंह घराण्यात दिल्या होत्या त्याचे नाव कृष्णा हाथीसिंह शेठ हाथीसिंह केसरीसिह हे कृष्णा हाथीसिंह याचे आजे सासरे होते. ते धार्मिक प्रवृत्ती व साध्या राहणीचे सधन व्यापारी होते त्याच्या मातोश्री दिलवाडा येथील तीर्थंकर महावीर स्वामीच्या दर्शनासाठी दरसाल जात पण पुढे त्या अतिशय वृद्ध झाल्या व दिलवाडाला दर्शनासाठी जाणे त्याना शक्य होईना म्हणून शेठ हाथीसिंह केसरीसिह यानी १८५० साली दहा लाख रुपये खर्चून हे मदिर बांधले ते मूळ दिलवाडा मदिराच्या धर्तीवरच असून गाभाऱ्यात जैनाचे पधरावे तीर्थंकर महावीर याची ध्यानस्थ मूर्ती आहे मदिराचे निर्माते हाथीमल व त्यांच्या दोन पत्नी याच्याही सगमरवरी लहान मूर्ती मदिराच्या आवारात आहेत




**हाथीसिंह मदिर**

हाथीसिह मदिराचे प्रवेशद्वार भव्य, उच व नक्षीदार आहे ते जयपूर

शैलीचे आहे जवळच मदिराची कचेरी आहे तेथे मदिराची माहिती देणारी पुस्तिका मिळते प्रवेशद्वार चार नक्षीदार स्तभावर उभे आहे या प्रवेशद्वारातून आत गेले की प्रशान्त आवार लागते त्यात झाडे व वेली लावून ते सुशोभित करण्यात आले आहे सभामडपाचे स्तभही उत्कृष्ट कलाकुसरीचे व प्रेक्षणीय आहेत छतावरही सुदर नक्षी व मूर्ती आहेत. गुजरात व राजस्थान यामधील बहुतेक जैन मदिराप्रमाणेच हे मदिर सगमरवरी नक्षीदार स्तभ, तोरणे व छत यानी आकर्षक झाले आहे गर्भगृहातील तीर्थंकर महावीराची मूर्तीही मनाला शातता देते मदिराच्या आवारात ओवऱ्या आहेत त्यात ५२ मदिरे आहेत ही मदिरेही नक्षीदार तोरणे व शिखरे यानी विभूषित आहेत

दादा हरी बाव या नावाची एक खोल व जलहीन विहीर अहमदाबादला येणाऱ्या प्रवाशांना दाखविण्यात येते ही जवळजवळ पाचशे वर्षांची जुनी आहे ही विहीर दाखविणारे वाटाडे हिची पार्श्वभूमी सागतात, ती अशी गुजरातचा सुलतान महमदशहा याची पत्नी इराणची होती ती गरोदर राहिली तेव्हा बाळतपणासाठी इराणला पाठवावे अशी तिच्या माहेरच्या लोकाची इच्छा होती पण त्या काळात इराणचा प्रवास दीर्घकाळ घेणारा व अतिशय कठीण होता म्हणून हरिया नावाच्या सुइणीने अहमदाबादलाच हिचे बाळतपण करण्याची जबाबदारी पत्करली व ती यशस्वीरीत्या पार पाडली तेव्हा सुलतानाने तिला दोन सुवर्णककणे बक्षीस दिली पण त्या दासीने ती ककणे स्वत:साठी ठेवून न घेता लोकाच्या उपयोगासाठी त्यातून एक विहीर खोदून घेतली तीच ही बाव या विहिरीस श्रम पडले आहेत तिची बाधणी अतिशय योजनापूर्वक करण्यात आली आहे. धुणे धुण्यासाठी कट्टे, पाणी वाहून नेण्यासाठी दगडी पन्हाळी, बारा खाबाचा मजबूत मडप इत्यादी सोयी आहेत सध्या तळाचे दोन मजले बद आहेत शभर वर्षांपूर्वीपर्यंत या विहिरीस पाणी होते, पण आता ती पूर्णपणे आटली आहे विहिरीत पाणी आणण्यासाठी जाता यावे म्हणून गोलाकार दगडी जिने आहेत विहिरीच्या मागे एक दर्गा आहे त्याच्या जवळ बेगम, दाई हरिया आणि ही विहीर बाधणारा प्रमुख याच्या कबरी आहेत ही विहीर अनेक वर्षे निर्जल व दुर्लक्षित राहिल्याने उदास वाटते.

सिद्दी सय्यद दर्गा हे कर्णावती नगरीचे आणखी एक प्रेक्षणीय स्थळ सिद्दी सय्यद या गुलामाने १८७२ साली सुलतान समीखाग याचे स्मारक म्हणून हा दर्गा बाधला. या दर्ग्याचा काही भाग पडला असून काही उत्कृष्ट जाळ्या ब्रिटिशकाळात काढल्या गेल्या त्या कोणाच्या तरी खाजगी सग्रहात किंवा म्युझियममध्ये असतील आता उरलेल्या जाळ्यात प्रत्येकी चार



**सिद्दी सय्यद दर्गाच्या कलात्मक जाळ्या**

स्तभाच्या सहा रांगा आहेत त्याना पाच सुदर घुमट आहेत या दर्ग्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या भितीतील दगडी जाळ्या त्याचे कोरीवकाम इतके नाजूक व आकर्षक आहे की त्या काळची ही कलाकुसर पाहून मन थक्क होते अहमदाबाद शहराचे प्रतीक म्हणून अनेक माहितीपत्रकावर या जाळ्याची चित्रे देण्यात येतात

ग्रंथालय ठाणे

# ३. महात्माजी आणि हृदयकुंज

गुजरातेत अनेक ठिकाणी म गांधीचे वास्तव्य झाले असले, तरी कर्णावतीच्या हरिजन आश्रमाचे स्थान श्रेष्ठ व वैशिष्ट्यपूर्ण आहे हा आश्रम साबरमती आश्रम या नावानेही ओळखला जातो शहराच्या मुख्य वस्तीपासून हा काहीसा दूर, साबरमती नदीच्या काठी आहे गाधीजीच्या जीवनतत्त्वास अनुसरून हा आश्रम अगदी साधा, शात व पवित्र आहे महात्माजींचे या ठिकाणी पधरा वर्षे वास्तव्य होते. ज्या जागेवर हा आश्रम स्थापन झाला, तिला पुराणकालातही फार मोठे स्थान होते कारण तेथे दधिची ऋषींचे वास्तव्य होते आजही या आश्रमाजवळ दधिची ऋषीचे मदिर आहे राक्षसाना पायबद घालण्यात देवाचा राजा इद्र जेव्हा हतबल झाला तेव्हा तो दधिची ऋषींकडे आला. कारण या ऋषींचे तपस्येने वाढलेले तेज एवढे मोठे होते की त्यांची हाडे वज्राची झाली होती दधिचीच्या बरगडीचे वज्रचक्र केलेस तर तू असुराच्यावर विजय मिळविशील असे विष्णूने इद्राला सागितले तेव्हा इद्र दधिचींकडे आला त्याच्या विनंतीप्रमाणे दधिचींनी प्राणत्याग करून त्याला बरगडी देण्याचे मान्य केले त्यानी आमरण प्रायोपवेशन केले त्यांच्या बरगडीचे वज्रचक्र केले व असुराचा पाडाव केला याच दधिचीचे तेज घेऊन गाधीजी अवतरले. त्यांनीही प्राणत्याग केला व देशाला स्वातत्र्य मिळवून दिले गांधीजींची उपोषणे व दधिची ऋषींचे उपोषण यात विलक्षण साम्य आहे 'ते न त्यक्तेन भुंजीथा:' या उपनिषदातील वचनाचे मूर्तिमत रूप म्हणजे दधिची 'त्याग हाच आनद' हे त्याचे तत्त्व होते व तेच गाधीजींनी आमरण आचरले ज्यावेळी आपल्या आश्रमासाठी गाधीजींनी या जागेची निवड केली तेव्हा ती पडीक होती तेथे साप विपुल प्रमाणात फिरत होते साथीच्या रोगाला भिऊन शहरापासून दूर आलेल्याच्या झोपड्या तेथे होत्या गाधीजींनी या रुग्णाची सेवा केली. जमीन साफसूफ केली आणि तेथे 'सत्याग्रही आश्रम' स्थापन केला ही १९१७ सालची गोष्ट

या जागेवर लहान लहान एकमजली इमारती बाधण्यात आल्या शाळा उभारली गेली खडबडीत उचसखल जमीन एकसारखी करून झाडे लावण्यात आली ही सर्व कामे स्वत· गांधीजी व त्याचे सहकारी सत्याग्रही यानी केली हृदयकुज ही बैठी झोपडीवजा इमारत गाधीजींसाठी बाधण्यात आली हिच्या शेजारीच 'नदिनी' नावाची दुसरी लहानशी इमारत पाहुण्यासाठी बाधली गेली तेथे नोकरचाकर नव्हते त्यामुळे पाहुण्याचे जेवणखाण गांधीजी स्वतः तयार करून वाढीत असत. गाधीजी रोज पहाटे पाच वाजता उठून प्रार्थना करीत आश्रमवासीही त्याना त्यावेळी साथ देत गीता, कुराण, बायबल व झेंद अवेस्ता यातील निवडक भजने एकत्र करून 'आश्रम भजनावली' ही छोटी पुस्तिका तयार



करण्यात आली १९१७ पासून १९३२ पर्यंतच्या सर्व राष्ट्रीय चळवळीचा उगम याच आश्रमात झाला गोधा येथे झालेल्या पहिल्या गुजरात परिषदेत म गाधी, लोकमान्य टिळक आणि विठ्ठलभाई पटेल एकत्र आले याच आश्रमात गाधीजींना महादेवभाई देसाई, विनोबा भावे, वल्लभभाई पटेल, काका कालेलकर, मीरा बेन, राजेंद्रप्रसाद असे अतिरथी महारथी शिष्य म्हणून मिळाले बारडोली सत्याग्रहात वल्लभभाई पटेल हे 'सरदार' झाले व गाधीजींचा उजवा हात बनले १९१८ साली एकदा गाधीजी इतके आजारी झाले की आपला अत जवळ आला म्हणून याच हृदयकुजमध्ये ते 'भगवद्गीता अखेरची ऐकवा' असा आग्रह धरू लागले

माँटेग्यू सुधारणा, रौलट ॲक्ट, जालियनवाला बाग, अमृतसर काँग्रेस अशी अनेक वादळे गाधीजींच्या याच आश्रमातील वास्तव्यात आली त्यावेळी ते देशाच्या अनेक भागात फिरत असले तरी त्याची मुख्य वस्ती हृदयकुजमध्येच होती याच 'हृदयकुंज' मध्ये 'यग इडिया' व 'नवजीवन' या नियतकालिकाचा जन्म झाला 'यग इडिया' तील लेखाबद्दल इथेच १० मार्च १९२२ रोजी गाधीजींना अटक झाली अहमदाबादमध्ये त्याच्यावर खटला झाला भारताच्या इतिहासातील अत्यत देदीप्यमान असा प्रसग या ऐतिहासिक खटल्यात गाधीजींनी 'हे पाशवी राज्य सपलेच पाहिजे, देशभक्ती हा द्रोह असेल तर होय, मी द्रोही आहे' असे बाणेदार उद्गार काढले या खटल्यात गाधीजींना शिक्षा झाली याच साबरमती आश्रमात गाधीजींचे चिरजीव रामदास याचा विवाह १९२८ साली झाला विवाहाच्या दिवशीही वधूवरानी गोठा सारवला, विहीर साफ केली व उपोषण केले वधूच्या मातेला दिलेला चरखा ही या विवाहातील एकमेव भेटवस्तू होती

सायमन कमिशन आणून ब्रिटिश सरकारने आणखी एक घोडचूक केली याच साबरमती आश्रमातून गाधींजींनी या कमिशनविरुद्ध प्रखर लढा पुकारला १९२९ साली गाधींजीच्या प्रेरणेने प जवाहरलाल नेहरू याच्या अध्यक्षतेखाली लाहोर येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात 'पूर्ण स्वराज्य' चा ठराव समत झाला व 'इन्किलाब झिंदाबाद' ने आसमत उजळला भारताचे कविश्रेष्ठ रवींद्रनाथ टागोर याच आश्रमात गांधींजींना भेटण्यासाठी आले जानेवारी १९३० मध्ये या आश्रमात काँग्रेस कार्यकारिणीची बैठक भरली आणि असहकाराच्या चळवळीचे नेतृत्व गाधींजींकडे देण्यात आले ही चळवळ सुरू करण्यापूर्वी २ मार्च १९३० रोजी गाधींजींनी व्हॉईसरॉयना निर्वाणीचे पत्र पाठवून भारतीयाच्या मागण्या मान्य करण्याची विनती केली तिचा उपयोग झाला नाही तेव्हा बारा मार्च रोजी २४१ मैल चालून सुरतनजीक दाडी येथे मिठाचा सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय हृदयकुजमधून गाधीजीनी जाहीर केला या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी दहा हजार स्वयसेवक आश्रमाच्या आवारात जमले पण गाधीजींनी भारताच्या वेगवेगळ्या भागातून फक्त ७९ सत्याग्रहीची निवड केली बारा मार्च रोजी गाधींजी नेहमीप्रमाणे पहाटे उठले त्यानी प्रार्थना केली आश्रमात पडित खरे याचा मुलगा निधन पावला होता त्याच्या

नातेवाईकाचे सात्वन करून गाधींजी निघाले साडेसहा वाजता ऐतिहासिक दाडी सत्यग्रहाच्या मोर्चाला सुरुवात झाली 'स्वातत्र्य मिळाल्याशिवाय मी या आश्रमात परत येणार नाही,' अशी घोषणा करून गांधींजी ७० सत्याग्रहींसह निघाले तेव्हा दहा हजार अनुयायानी त्याचा व भारतमातेचा जयजयकार केला ज्याचा मुलगा काही दिवसापूर्वी निधन पावला होता, ते पंडित खरे या मोर्चात भजन म्हणत चालत होते- 'वैष्णव जन तो तेणे कहिये '

साबरमती आश्रमात प्रवेश केल्यावर येथील हिरवीगार झाडे, फुलझाडे व स्वच्छ बैठी कौलारू घरे यामुळे मन उल्हासित होते शहरातील सिमेंट कॉंक्रीट जगलात हा एक हितकारी बदल आहे. आवारात गेल्यावर सुरुवातीलाच डावीकडे 'गाधीस्मारक सग्रहालय' आहे ही इमारत इतर म्युझियमसारखी भव्य व अनेक मजली नसून गाधींजींच्या साध्या राहणीस शोभेशी एकमजली व बैठी आहे त्यात तीन विभाग आहेत एका विभागात छायाचित्राच्या साहाय्याने गाधींजींच्या जीवनाचा चित्रपट उलगडून दाखविलेला आहे त्याचे बालपण, शालेय शिक्षणाचा काळ, विवाह, इग्लंडला शिक्षणासाठी प्रयाण, लडनच्या वास्तव्यातील ठळक प्रसग, सायकल चालविणारे गाधीजी, रवींद्रनाथ टागोर, टॉलस्टॉय व रोमा रोलॉं याच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या लेखकाचा सहवास महारोग्याची शुश्रूषा करतानाचे गाधींजी, ब्रिटिशाच्या तुरुगातील वास्तव्य, विविध चळवळीचे नेतृत्व व ३० जानेवारीच्या हत्येनतरची अत्ययात्रा अशा प्रभावी छायाचित्रातून जीवन येथे आकार घेते. या सग्रहालयातील दुसऱ्या विभागात गाधीजींच्या विविध वस्तूचे प्रदर्शन आहे त्यात त्यांचे घड्याळ, काठी, वस्त्रे, चपला, टोपली, 'यग इडिया' व 'हरिजन' चे अक, चरखा इत्यादी वस्तू येथे आहेत 'सत्याग्रह हे स्वराज्य' या विभागात अनेक जागतिक नेत्यानी गाधीजींविषयी व्यक्त केलेले अभिप्राय आहेत त्यात बर्ट्रान्ड रसेल, जॉर्ज शॉ, रोमा रोलॉं, मार्टिना ल्यूथर किंग इत्यादी मान्यवराची वचने आहेत ग्रथालय विभागात गाधीजींचे व त्याच्याविषयी इतराचे सात हजार ग्रथ आहेत. आश्रमाविषयीची छायाचित्रे व पुस्तिकाही येथे मिळतात नवजीवन ट्रस्टतर्फे या पुस्तिका व इतर पुस्तके प्रसिद्ध करण्यात आली आहेत महत्त्वाच्या कागदपत्राचा तिसरा विभाग आहे

त्यात म गाधीची पत्रे, त्याना आलेली महत्त्वाच्या व्यक्तींची पत्रे, 'यंग इडिया' व 'हरिजन' साठी म गाधींनी लिहिलेल्या मूळ लेखाची हस्तलिखिते आहेत



**गाधीजीचा आश्रम**

'हृदयकुज' हे गाधींजीचे निवासस्थान साधे, बैठे व कौलारू आहे पुढे एक व्हाराडा आहे आत गाधींजीची खोली आहे त्या खोलीत त्याचा चरखा ठेवण्यात आला आहे आचार्य विनोबा यानी गाधीजींच्या सत्याग्रहाचे सिद्धात ज्यात लिहिले आहेत, असे जीवनचक्र समोर भिंतीवर आहे ही साधी खोली पधरा वर्षे सबध देशाचे स्फूर्तिस्थान व अनेक चळवळीची गगोत्री होती गाधीजींच्या खोलीजवळ पाहुण्याची खोली व मागे कस्तुरबाची खोली आहे कस्तुरबांच्या खोलीत त्याची व गाधीजीची छायाचित्रे आहेत पोरबदर येथे गाधीजींचे घर आहे त्या घराची प्रतिकृती या खोलीत आहे शेजारीच मीराबेनची झोपडी आहे या परकीय शिष्येचे भारतीय नाव गाधीजीनीच ठेवले होते या आश्रमात उपासना मदिर आहे. तेथे गाधीजीची भजने व प्रवचने होत असत दिल्ली येथील लाल किल्ल्यात साउड अँड लाईट हा कार्यक्रम करण्यात येतो, त्याच धर्तीवर गाधीजींचे जीवन साकार करणारा कार्यक्रम सध्याकाळी या आश्रमातही सादर करण्यात येतो पन्नास मिनिटे हा कार्यक्रम चालतो आश्रमातल्या

पार्श्वभूमीवर जेव्हा गांधीजींचा आवाज कार्यक्रमात ऐकू येतो, तो एक थरारक अनुभव आहे अली सरदार जाफरी यांनी या कार्यक्रमाचे लेखन केलेले असून जयदेव यानी सगीतदिग्दर्शन केले आहे भजनात मन्ना डे व उषा मंगेशकर याचे आवाज आहेत

अखिल भारतीय कीर्तीच्या दोन प्रमुख सस्था अहमदाबादमध्ये आहेत 'इडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट' आणि 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन' या त्या सस्था होत व्यवस्थापन या विषयाला आधुनिक उद्योगधद्यात अतिशय महत्त्व आले आहे या विषयात भारतात सर्वात उत्तम शिक्षण अहमदाबादच्या 'इडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट' या सस्थेत देण्यात येते आतरराष्ट्रीय कीर्तीचे वास्तुशिल्पकार लुईस कान्ह यानी या सस्थेच्या वैशिष्ट्यपूर्ण इमारतीची रचना केली आहे सरकारी व खाजगी उद्योगधदे याना खास डिझाईन पुरविणे व त्याविषयाचे शिक्षण देणे ही कामे 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन' ही मान्यवर संस्था करते गुजरात विद्यापीठ हीही अहमदाबादची श्रेष्ठ परंपरा असलेली सस्था आहे म गाधी हे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते व सरदार वल्लभाई पटेल हे दुसरे कुलगुरू होते अहमदाबादमध्ये अनेक वस्तुसग्रहालये आहेत त्यात हस्तव्यवसायावर भर देणारे श्रेयस म्युझियम, विविध प्रकारची भाडी प्रदर्शित करणारे वेचर युटेन्सिल म्युझियम, भारतीय मिनिएचर पेंटिंग्जचा सग्रह करणारे एन् सी मेहता कलेक्शन, कापड व्यवसायाचे दर्शन घडविणारे कॅलिको म्युझियम इत्यादींचा समावेश होतो

गांधीनगर ही गुजरातची नवी राजधानी अहमदाबादपासून २३ किलो मीटर्सवर आहे. चदिगडप्रमाणे ही राजधानीसाठी मुद्दाम आखलेली नगरी असल्याने प्रशांत रस्ते, झाडी, अद्ययावत इमारती, दुकाने, करमणुकीची साधने इत्यादी सोयींनी युक्त आहे साडेपाच हजार हेक्टरवर उभारण्यात आलेल्या या नगरीचे तीस विभाग-सेक्टर्स-पाडण्यात आले आहेत या राजधानीची लोकसख्या सुमारे ऐंशी हजार आहे, पण अहमदाबादहून दररोज येथे नोकरीसाठी किंवा सरकारी कामासाठी येणाऱ्याची सख्या पाऊण लाखापर्यंत आहे त्यामुळे दिवसाची लोकसख्या व रात्रीची लोकसख्या यात फार मोठे अतर आहे. विठ्ठलभाई पटेल भवनात विधानसभा व सबधित कचेऱ्या आहेत. नवव्या विभागात सचिवालय आहे

याच विभागात सरिता उद्यान व डिअर पार्क (हरणे ठेवण्याचे उद्यान) आहे.

काकरिया तलाव हे अहमदाबादचे एक भूषण आहे हा बहुकोनाकृती तलाव सुलतान कुतुबुद्दिन याने १४५१ साली बाधला त्याची वास्तुशिल्परचना आणि निसर्गसौंदर्य आल्हाददायक आहे जवळच्या टेकडीवर उद्यान व बालवाटिका आहेत. हे अहमदाबादचे वनभोजनाचे लोकप्रिय ठिकाण आहे काकरिया तलावाच्या ऐतिहासिक आठवणी रोमाचकारक आहेत कारण या तलावात सम्राट जहागीर आणि सौंदर्यसम्राज्ञी नूरजहान यानी नौकाविहार केला आहे. पौर्णिमेच्या रात्री या तलावाची शोभा विशेष सस्मरणीय असते अहमदाबादचे 'स्पेस ॲप्लिकेशन सेंटर' हे अवकाश सशोधन केंद्र आतरराष्ट्रीय ख्याती पावलेले आहे. 'युसिस' च्या विज्ञान विभागाच्या कार्यक्रमासाठी मी या अवकाश केंद्राला अनेकदा भेटी दिल्या आहेत अमेरिकेच्या अवकाशयानासाठी या केद्रातर्फे काही भाग तयार केले होते. या केद्राची स्वत ची दूरदर्शन प्रक्षेपण व्यवस्था आहे उपग्रहातर्फे या व्यवस्थेतर्फे प्रक्षेपण होते असेच आणखी एक सशोधन केद्र म्हणजे 'अतिश'. अहमदाबाद टेक्स्टाईल रिसर्च असोसिएशन या नावाचे हे सक्षिप्त रूप आहे. कापड व्यवसायासाठी सशोधन येथे चालते या व्यवसायातील पदव्युत्तर शिक्षणही येथे देण्यात येते अतिशचा परिसर झाडी व हिरवळ यामुळे मनोहर झाला आहे या परिसरात मुक्त मोराचे विभ्रम पाहण्यात वेगळाच आनद आहे

शाही बागमध्ये 'सरदार वल्लभभाई पटेल' म्युझियम आहे. आधुनिक गुजरातच्या सघटनेचे महान कार्य सरदार पटेल यानी केले विशेषतः सौराष्ट्र व गुजरातमधील कित्येक लहानमोठ्या सस्थानांचे विलीनीकरण करून या प्रदेशाला सलग व एकसघ रूप त्यानी दिले त्यामुळे गुजरातला या पोलादी पुरुषाबद्दल विशेष आदर आहे त्याचे प्रतीक म्हणजेच हे भव्य म्युझियम पूर्वीच्या राजभवनात हे वस्तुसग्रहालय आहे गुजरातची राजधानी गाधीनगरला हटविल्यामुळे हे राजभवन रिकामे झाले होते सरदार पटेल याच्या कर्तृत्ववान जीवनाशी निगडित अशा अनेक छायाचित्राचे व वस्तूचे हे प्रेक्षणीय प्रदर्शन आहे

अहमदाबादच्या आसपास जी प्रेक्षणीय स्थळे आहेत, त्यात अहमदाबादपासून ऐंशी किलो मीटर्सवर असलेले लोथला हे महत्त्वाचे

ठिकाण आहे येथे केलेल्या खोदकामात असे आढळून आले की प्राचीन काळी एक सबंध शहरच या ठिकाणी जमिनीखाली गाडले गेले आहे. घरे, विहिरी, रस्ते इत्यादीचे संशोधन केले असता हे हडाप्पा संस्कृतीच्या काळातील शहर असावे असे पुरातत्त्ववेत्त्याचे मत आहे. हा शोध अगदी अलीकडे म्हणजे १९५४ साली लागला मोहनजोदरोप्रमाणेच हे शहर उत्तम तऱ्हेने नियोजित करण्यात आले होते घरातील स्नानगृहेही अजून जशीच्या तशी आहेत. या शहराचा प्राचीन काळी इजिप्त व मेसोपोटेमिया याच्याशी व्यापार होता, असा पुरावा येथे सापडला आहे बळी देण्याच्या काही वेदीही येथे आहेत लोथल व मोहनजोदरो ही पाच हजार वर्षांपूर्वीची शहरे व संस्कृती मानली जातात.

अहमदाबादपासून शभर किलो मीटर्सवर असलेले मोढेरा येथील सूर्यमदिर हे प्राचीन गुजरातच्या वास्तुशिल्पकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे ओरिसातील कोनार्क, काश्मीरमधील मार्तंड तसेच मेहसाणा जिल्ह्यातील मोढेरा येथील हे सूर्यमदिर काही अशी विध्वंसकाच्या हल्ल्याला बळी पडले आहे मोढेरा सूर्यमदिर सोळकी वशातील पहिला राजा भीमादेवने १०२६ साली बाधले आज हे मदिर भग्नावस्थेत असले तरी त्याचे जे अवशेष उरले आहेत, त्यावरून त्या वेळच्या त्याच्या भव्यतेची व कलात्मकतेची साक्ष पटते प्रथम सभामडप लागतो या अष्टकोनी सभामडपाला नक्षीदार स्तभ आहेत खाबांना उत्तम कोरीव काम केलेल्या कमानी किंवा तोरणे आहेत या मंदिराचा एक विशेष प्रथमदर्शनीच लक्षात भरतो तो असा की, त्याचा चौथरा जमिनीपासून बराच उच आहे अशा प्रकारचे पहिला चौथरा उच असलेले मदिर म्हणजे राजस्थानमधील राणकपूरचे मोढेरा येथील मदिराच्या भिंतीवर बाहेरील बाजूला पुराणातील प्रसग, देव, देवता व निरनिराळे प्राणी याच्या मूर्ती आहेत. या भिंतीला नक्षीदार कोनाडे आहेत व त्यात सूर्याच्या बारा मूर्ती आहेत मात्र सूर्याची मूळ मूर्ती नष्ट झाली असावी ती येथे दिसत नाही मदिराचे गर्भगृह नक्षीदार स्तभानी विभूषित झालेले आहे या गर्भगृहाखाली एक तळघर आहे तेथील आसन रिकामे आहे मदिर बाधले गेले तेव्हा वर मूर्ती- बहुधा सूर्याची असावी असा अंदाज आहे कारण या असानाची स्थापना अशा रीतीने करण्यात आली आहे की सकाळच्या सूर्याचे किरण त्या वरील मूर्तीवर पडावेत सभागृहासमोरील



मोढेराचे सूर्यमंदिर

पायऱ्या उतरून गेले की एक मोठे कुड लागते उदयपूरजवळ असे एक सूर्यकुड आहे भाविकासाठी या कुडाभोवती अनेक लहान मदिरे आहेत.

मोढेराप्रमाणे मेहसाणा जिल्ह्यात धार्मिकदृष्टीने आणखी एक महत्त्वाचे स्थळ आहे ते म्हणजे सिद्धपूर मातृगया या नावाने प्रसिद्ध असलेल्या या क्षेत्रास प्राचीन इतिहास आहे मनूची मुलगी देवहूती व ब्रह्मदेवचा मानसपुत्र कर्दमऋषी सन्यास घेऊन वनात जाण्यासाठी निघाले पण त्यापूर्वी आपल्या कुलवृद्धीसाठी पुत्र व्हावा अशी देवहूतीने विनंती केली कर्दमानी त्याला मान्यता दिली पुढे त्याना पुत्र झाला हा मुलगा म्हणजे

ठिकाण आहे येथे केलेल्या खोदकामात असे आढळून आले की प्राचीन काळी एक सबध शहरच या ठिकाणी जमिनीखाली गाडले गेले आहे. घरे, विहिरी, रस्ते इत्यादीचे संशोधन केले असता हे हडाप्पा सस्कृतीच्या काळातील शहर असावे असे पुरातत्त्ववेत्त्याचे मत आहे हा शोध अगदी अलीकडे म्हणजे १९५४ साली लागला मोहनजोदरोप्रमाणेच हे शहर उत्तम तऱ्हेने नियोजित करण्यात आले होते घरातील स्नानगृहेही अजून जशीच्या तशी आहेत या शहराचा प्राचीन काळी इजिप्त व मेसोपोटेमिया याच्याशी व्यापार होता, असा पुरावा येथे सापडला आहे बळी देण्याच्या काही वेदीही येथे आहेत. लोथल व मोहनजोदरो ही पाच हजार वर्षांपूर्वीची शहरे व सस्कृती मानली जातात

अहमदाबादपासून शभर किलो मीटर्सवर असलेले मोढेरा येथील सूर्यमदिर हे प्राचीन गुजरातच्या वास्तुशिल्पकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे ओरिसातील कोनार्क, काश्मीरमधील मार्तंड तसेच मेहसाणा जिल्ह्यातील मोढेरा येथील हे सूर्यमदिर काही अंशी विध्वसकाच्या हल्ल्याला बळी पडले आहे मोढेरा सूर्यमदिर सोळकी वशातील पहिला राजा भीमादेवने १०२६ साली बाधले आज हे मदिर भग्नावस्थेत असले तरी त्याचे जे अवशेष उरले आहेत, त्यावरून त्या वेळच्या त्याच्या भव्यतेची व कलात्मकतेची साक्ष पटते प्रथम सभामडप लागतो या अष्टकोनी सभामडपाला नक्षीदार स्तभ आहेत खाबाना उत्तम कोरीव काम केलेल्या कमानी किंवा तोरणे आहेत या मदिराचा एक विशेष प्रथमदर्शनीच लक्षात भरतो तो असा की, त्याचा चौथरा जमिनीपासून बराच उच आहे अशा प्रकारचे पहिला चौथरा उच असलेले मदिर म्हणजे राजस्थानमधील राणकपूरचे मोढेरा येथील मदिराच्या भितीवर बाहेरील बाजूला पुराणातील प्रसग, देव, देवता व निरनिराळे प्राणी याच्या मूर्ती आहेत या भिंतीला नक्षीदार कोनाडे आहेत व त्यात सूर्याच्या बारा मूर्ती आहेत मात्र सूर्याची मूळ मूर्ती नष्ट झाली असावी ती येथे दिसत नाही मदिराचे गर्भगृह नक्षीदार स्तभानी विभूषित झालेले आहे या गर्भगृहाखाली एक तळघर आहे. तेथील आसन रिकामे आहे मदिर बांधले गेले तेव्हा वर मूर्ती- बहुधा सूर्याची असावी असा अदाज आहे कारण या असानाची स्थापना अशा रीतीने करण्यात आली आहे की सकाळच्या सूर्याचे किरण त्या वरील मूर्तीवर पडावेत सभागृहासमोरील



**मोढेराचे सूर्यमंदिर**

पायऱ्या उतरून गेले की एक मोठे कुंड लागते उदयपूरजवळ असे एक सूर्यकुंड आहे भाविकासाठी या कुंडाभोवती अनेक लहान मंदिरे आहेत

मोढेराप्रमाणे मेहसाणा जिल्ह्यात धार्मिकदृष्टीने आणखी एक महत्त्वाचे स्थळ आहे ते म्हणजे सिद्धपूर मातृगया या नावाने प्रसिद्ध असलेल्या या क्षेत्रास प्राचीन इतिहास आहे. मनूची मुलगी देवहूती व ब्रह्मदेवचा मानसपुत्र कर्दमऋषी सन्यास घेऊन वनात जाण्यासाठी निघाले पण त्यापूर्वी आपल्या कुलवृद्धीसाठी पुत्र व्हावा अशी देवहूतीने विनती केली कर्दमानी त्याला मान्यता दिली पुढे त्याना पुत्र झाला हा मुलगा म्हणजे

विष्णूचा अवतार होता त्याचे कपिलमुनी असे नाव ठेवण्यात आले कपिलमुनीनी याच ठिकाणी आपल्या मातेला मुक्ती दिली. या ठिकाणी भाविक लोक मातेच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी धर्मकृत्ये करतात सिद्धपूरमध्ये कपिलाश्रम आहे तसेच मातेला साख्यशास्त्र सागणारे कपिलमुनी व देवहूती याची मदिरे आहेत. रुद्रनाथ नावाचे एक भग्न मंदिर आहे ते पूर्वी अकरा मजली उच होते असे सागण्यात येते

दर्पण ही अहमदाबादची सस्था आंतरराष्ट्रीय कीर्ती पावलेली आहे या संस्थेच्या सस्थापिका मृणालिनी साराभाई यांनी अनेक देशात नृत्याचे कार्यक्रम सादर करून भारतीय नृत्य आतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रिय केले आहे श्री मीनाक्षी सुदरम पिल्ले यांच्याकडे मृणालिनीबाईनी शिक्षण घेतले १९४९ साली त्यानी 'दर्पण' ही सस्था स्थापन केली व नृत्याबरोबरच सगीत, नाटक, कठपुतली बाहुल्याचे खेळ, लोककला इत्यादींचाही विकास केला दर्पण या सस्थेने अनेक नाटकेही सादर केली आहेत

वेगवेगळ्या राज्यातील लोकनृत्याच्या विभागात डाग, राजस्थान, गोंड, दाडिया रास, तामीळनाडूतील कुम्मी नृत्य, केरळमधील कैकोटकाली नृत्य, मिझोमधील नृत्य इत्यादी प्रकारही या सस्थेत शिकविले जातात या विभागाला 'जनवाक' असे नाव आहे

पपेटी किवा कठपुतली हा 'दर्पण'चा विभाग १९६८ साली सुरू झाला. कठपुतळ्याचे सर्व प्रकार या विभागात हाताळण्यात येतात. श्रीमती मेहर कॉन्ट्रॅक्टर या कठपुतली विभागाच्या प्रमुख आहेत १९५५ पासून त्यानी भारतात व परदेशात बाहुल्याचे खेळ दाखवले आहेत १९५८ साली प्रयाग येथे भरलेल्या इंटरनॅशनल पपेट फेस्टिव्हलमध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले होते. मॉस्को येथे १९७६ साली भरलेल्या आतरराष्ट्रीय 'युनियन इटरनॅशनल मॅदल मेरियनेट' या सस्थेच्या त्या उपाध्यक्षा होत्या १९६८ पासून आतापर्यंत श्रीमती मेहर कॉन्ट्रॅक्टर यांनी कठपुतळीचे खेळ शेकडो विद्यार्थी-विद्यार्थिनीना शिकवले आहेत

❑

# ४. म. गांधींचे राजकोट आणि जुनागड

अहमदाबादपासून राजकोट हे अतर २१६ किलो मीटर्स आहे या प्रवासाला साधारण पाच तास लागतात. राजकोटमध्ये गाधीजींचे वास्तव्य दीर्घकाळ होते ते ज्या घरात राहत होते ते घर 'कबा गाधीनू डेला' या नावाने मशहूर आहे महात्माजींचे वडील हे कबा या नावाने ओळखले जात असत त्यांचा वाडा हा डेला म्हणून हे घर 'कबा गाधीनु डेला' झाले या घराचा दरवाजा पूर्वीच्या पद्धतीच्या वाड्यासारखा उच, लाकडी असून त्याला लहान दिडी दरवाजा आहे तो ओलाडल्यावर दगडी फरशा बसवलेले अगण लागते उजव्या बाजूला कचेरी आहे अगणात पेरूचे झाड आहे पूर्वी धनिक सावकाराची प्रशात, समाधानी घरे असत, तसे हे घर आहे घराचा मुख्य भाग सुरू होतो, तेथे व्हराडा आहे श्री व्यास यानी मला जी माहिती सागितली, ती अशी 'गाधींचे वडील करमचद गाधी हे १८७६ साली पोरबदरहून राजकोटला आले ते राजकोट सस्थानचे दिवाण होते आणि राजस्थानी न्यायालयाचे न्यायाधीशही होते १८८० ते १८८१ मध्ये त्यानी ही इमारत बाधली अगणाच्या आत डावीकडील खोलीत करमचद गाधींची बैठकीची खोली होती प्रवेशद्वाराच्या वर पहिल्या मजल्यावर मोहनदास गाधींची अभ्यासाची खोली होती १९२० साली गाधी कुटुबावर आर्थिक आपत्ती कोसळल्याने ही इमारत विकण्यात आली 'म गाधींनी या इमारतीवरील सर्व हक्क सोडून दिले इमारतीच्या फरशा, खोल्यातील कपाटे व इतर अनेक वस्तू पूर्वी होत्या तशाच ठेवण्यात आल्या आहेत १९४८ साली सौराष्ट्र सरकारने ही इमारत खाजगी मालकाकडून विकत घेऊन हिचे राष्ट्रीय स्मारक केले गाधीजींच्या जन्मशताब्दीच्या वर्षात गाधी स्मारक म्हणून राष्ट्रीय इमारत आहे असे केंद्र सरकारने जाहीर केले '

१८८१ ते १८८७ पर्यंत गाधीजी हे विद्यार्थी म्हणून या घरात राहत होते त्या वेळी ते हायस्कूलमध्ये शिकत होते राजा हरिश्चद्राच्या जीवनावर नाटक पाहिल्यानतर म गाधींनी फक्त सत्य बोलण्याची प्रतिज्ञा केली, ती

याच घरात १८८२ साली गाधीजी विवाहासाठी पोरबदरला गेले मग सौ कस्तुरबा याना घेऊन ते याच घरात परत आले. काही उनाड मुलाच्या सगतीत गाधीजी सापडले. पण आपल्या दुष्कृत्याची त्यांनी याच घरात वडलाच्याजवळ कबुली दिली करमचद आजारी पडले, तेव्हा गाधीजींनी याच इमारतीत त्यांची सेवा केली गाधीजी याच घरात राहत असता राम-मदिरात, शिव-मदिरात किवा इतर देवांच्या दर्शनास जात होते 'सर्वधर्मसमभावाची' भावना त्यांच्या मनात याच घरात निर्माण झाली १८८५ साली या इमारतीत श्री. करमचद गाधी याचे निधन झाले

१८८७ साली याच इमारतीत राहत असताना गांधीजी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले गाधीजी इग्लडला कायद्याचा अभ्यास करण्यासाठी गेले, तेव्हा त्यानी याच घरात मद्य, परस्त्री व मास यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा केली पाश्चात्य देशात गेल्यावर भारतीय तरुण कुमार्गाला लागतात असा त्या वेळी सार्वत्रिक समज होता गाधीजी याच कबा गाधीनू डेल्यांतून ४ सप्टेंबर १८८८ रोजी बॅरिस्टर होण्यासाठी इग्लंडकडे रवाना झाले १८९१ साली याच घरात गाधीजीच्या मातोश्री पुतळाबाई याचे निधन झाले त्याच वर्षी म गाधी हे बॅरिस्टर होऊन या घरात आले. द आफ्रिकेतील अहिंसक सत्याग्रह हा गाधीजींच्या जीवनातील अत्यत मोठा प्रसग. ते द आफ्रिकेला १८९३ साली गेले, ते याच घरातून १८९६ साली गाधीजी द आफ्रिकेहून परत आले ते याच घरात राहिले द आफ्रिकेतील भारतीयाना किती क्रूरपणे वागविण्यात येते याचे विदारक वर्णन करणारी पुस्तिका त्यानी याच घरातून प्रसिद्ध करून जागतिक खळबळ माजवली १८९६ साली राजकोटमध्ये प्लेगची साथ सुरू झाली. या साथीत हजारो लोकाची दैन्यवस्था झाली तेव्हा गाधीजींनी याच इमारतीतून या लोकाना साहाय्य देण्याची सर्वंकष योजना पार पाडली. सौराश, मोहनदास करमचद गाधींचे महात्मा गाधी होण्याचे बीज याच कबा गांधीनू डेलामध्ये सापडते कारण वाढत्या वयातील सर्व योग्य असे सस्कार गाधीजींच्यावर झाले, ते याच घरात

गाधीजींच्या जीवनातील प्रमुख घटनाची छायाचित्रे येथे आहेत गाधीजींच्या काही वस्तूही आहेत. गाधीजीचे जीवन खऱ्या अर्थाने घडले, ते याच ठिकाणी.

राजकोटमध्ये पाहण्यासारखी आणखी एक वस्तू म्हणजे जुबिली पार्क आणि वॅटसन म्युझियम राजकोटचे ब्रिटिश पोलिटिकल एजट जेम्स वॅटसन यानी १८५८ साली हे म्युझियम स्थापन केले. त्यात प्राचीन मूर्ती, जुनी नामी व दुर्मीळ पुस्तके आहेत गुजरात सरकारच्या पुरातत्त्व विभागातर्फे आता या म्युझियमची देखभाल होते याच ज्युबिली पार्कमध्ये एक वाचनालय आहे तेथे 'लोकसत्ता' व 'केसरी' ही मराठी दैनिके पाहावयास मिळतात राजकोटचे राजकुमार कॉलेज हे एकेकाळी भारतात सर्वत्र मशहूर होते कारण या कॉलेमध्ये स्वातत्र्यपूर्ण काळात फक्त सस्थानिकाच्या मुलानाच प्रवेश मिळत असे त्यावेळचे राजकोट सस्थानही वैभवशाली होते कन्या विकोजी या राजपूत राजाने राजकोट राज्याची स्थापना सोळाव्या शतकात केली त्यानतर मोगल बादशहानी राजकोटवर कब्जा मिळविला, तो दोनशे वर्षांपर्यंत टिकला नतर रजपूत जेदा व मोगल यांच्यात राज्याविषयी वाद निर्माण झाला, तेव्हा १८०८ साली ब्रिटिश पोलिटिकल एजट कर्नल वॉकर याने रजपुताच्या बाजूने निर्णय दिला १९४७ साली भारत स्वतत्र होऊन सस्थानाचे विलीनीकरण होईपर्यंत राजकोट हे रजपूत जेदाच्या ताब्यात होते आपल्याकडे जाधव नाव आहे, तसेच राजस्थान, सौराष्ट्रात जेदा हे नाव आहे रणजित विलास पॅलेस हा आजही रजपूत सस्थानिकाच्या वैभवाची साक्ष देतो राजकोट हे चार लक्ष लोकसख्येचे शहर आहे जुबिली पार्कबरोबरच जनताबाग, प्रद्युम्न पार्क अशी मोठी उद्याने आणि रेसकोर्सही आहे बालभवन ही सस्था विशेष लक्षात राहाण्यासारखी आहे खेळ व करमणूक याच्या द्वारा मुलाना शिक्षण देणाऱ्या या सस्थेत नाट्यगृह, मत्स्यालय, पोहण्याचा तलाव व पक्षी अभयारण्य इत्यादी सुविधा आहेत लखाजीराव ग्रथालय आणि लँग लायब्ररी ही ग्रथालये राजकोटची भूषणे आहेत सरदार वल्लभभाई पटेल याच्या जीवनाशी निगडित अशी अनेक छायाचित्रे व वस्तू आहेत

राजकोटचे रामकृष्ण मदिर ही एक नितात सुदर व पवित्र अशी वस्तू आहे. लालसर रगाच्या दगडांचे हे देखणे मदिर अत्यत स्वच्छ व प्रसन्न ठेवण्यात आले आहे. तेथे एक ग्रथालयही आहे रामकृष्ण मिशनतर्फे हे मदिर बाधण्यात आले मात्र हे केवळ प्रार्थनास्थळ नसून समाजकार्याचे एक प्रमुख केंद्र आहे. या आश्रमातील प्रमुख व त्याचे शिष्य दुष्काळात

पाणीवाटप, रोगराईत आजाऱ्याची शुश्रूषा, आगीसारख्या आपत्तीच्या वेळी लोकाना साहाय्य अशी कामेही करतात. २५ लक्ष रुपये खर्चून हे मंदिर १९७९ मध्ये बांधण्यात आले सध्याच्या दुष्काळात आश्रमातर्फे दररोज दोन हजार कुटुबाना पाण्याचा पुरवठा होतो

जुनागड म्हटले की तीन गोष्टी प्रामुख्याने आठवतात नरसी मेहताचे वास्तव्य या गावी दीर्घकाळ होते, गिरिनार हा पुराणप्रसिद्ध पर्वत या गावाजवळ आहे आणि भारत स्वतत्र झाल्यावर ज्या एकाच सस्थानिकाने भारताऐवजी पाकिस्तानात विलीन होण्याचा निर्णय जाहीर केला, तो संस्थानिक जुनागडचा होता. राजकोट ते जुनागड हे अंतर फक्त एकशे एक किलो मीटर्सचे म्हणजे साधारण दीड पावणेदोन तासाचा प्रवास जुनागड हे भारतातील सर्वात प्राचीन अशा शहरापैकी एक आहे गुजरातमध्ये सर्वात जुने प्रभासपाटण (सोमनाथ) आणि त्याखालोखाल जुनागड हे जुने गाव आहे. मात्र प्राचीन काळी हे गाव कटंककुब्ज या नावाने विख्यात होते नंतर त्याचे नाव मणिपूर असेही पडले सातव्या व आठव्या शतकात जीर्णदुर्ग या नावाने हे गाव मशहूर होते सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यू-एनत्संग याने इसवी सनापूर्वी ७२५ वर्षे या गावाला भेट दिली होती या गावात त्या वेळी वृद्ध भिक्षूंचे पन्नास मठ असल्याची त्याने नोद केली आहे इतिहास काळात गिरिनार हे या गावाचे सर्वात जुने नाव आहे. इ स २२३ ते २३६ या काळात जुनागड ही माळव्याच्या शक राजाची राजधानी होती जुनागड ते गिरिनार या मार्गावर आजही अशोककालीन शिलालेख पाहावयास मिळतात. तिसऱ्या शतकात हा भाग चद्रगुप्त मौर्य याने जिंकून घेतला होता. त्याचा सुभेदार, पुष्पगुप्त याने येथे सुदर्शन तलाव खोदला. जीर्णदुर्ग या नावाबरोबरच १४१३ च्या शिलालेखात या गावाचा उल्लेख 'जीर्ण प्राकार' असाही आढळतो त्यातील 'प्राकार' हा शब्द बौद्ध सस्कृतीचा निदर्शक आहे.

पुराणात असा उल्लेख आहे की, यादव द्वारकेहून या भागात आले जुनागड गिरिनार जवळच मुचकुद हा शेकडो वर्षे निद्रित होता स्कद पुराणात गिरिजावर स्वतत्र प्रकरण आहे. या भागाला पुराणकाळी कुशस्थळी असे नाव होते. इ स. पूर्वी ३१९ मध्ये सौराष्ट्र हे लोकराज्य होते चंद्रगुप्त मौर्यांचा नातू सम्राट अशोक याने इ स. पूर्व २५६ मध्ये या भागावर राज्य

केले होते, ते अद्याप सुस्थितीत असलेल्या अशोककालीन शिलालेखावरून सिद्ध होते इतर वस्तुसंग्रहालयात आधी इमारत बाधतात आणि मग त्या इमारतीत वस्तू ठेवण्यात येतात इथे उलटा प्रकार आहे ज्या शिलेवर हे लेख खोदले आहेत, ती शिला एवढी प्रचड आहे की, ती हातातून इतरत्र नेणे कठीण आहे म्हणून या शिलेवरच इमारत बाधली असून वारा, पाऊस व ऊन यापासून शिलालेखाचे रक्षण करण्यात आले आहे आतल्या भिंतीवर शिलालेखाची छायाचित्रे आहेत

ही शिला शभर फूट लांब, १२ फूट उच असून तिचा परीघ ७५ फूट आहे त्या शिलेवर ब्राम्ही भाषेत चौदा शिलालेख कोरलेले आहेत या लेखात म्हटले आहे की, "लोकानी प्राण्यांचा वध करू नये, झाडे व वनस्पतीचा नाश करू नये मूक प्राण्यांना त्रास देऊ नये ब्राह्मण व श्रवण याच्याशी लोकानी आदराने वागावे. महिलाचे मठ, यात्रा व व्यापारी याच्यावर राजाचे अधिकारी निरीक्षक म्हणून काम करतील व त्याचे सरक्षण करतील सज्जन लोकाना जनतेने साहाय्य करावे तसेच धार्मिक कृत्यानाही जनतेने मदत करावी नोकराना व गुलामाना चागली वागणूक द्यावी वाडवडिलाच्याशी नम्रतेने वागावे"

या शिलेवर पश्चिम बाजूला इ स १५० मधील एक शिलालेख आहे तो महाक्षत्रप रुद्रदामचा आहे या शिलालेखात म्हटले आहे की, सुदर्शन तलावाची भिंत पुरामुळे वाहून गेली व तिची दुरुस्ती करण्यात आली त्यासाठी लोकाच्यावर दड बसविण्यात आलेला नसून सरकारी खर्चाने ही दुरुस्ती केली आहे शिलालेख ११ फूट लांब, ५॥ फूट रुद असून तो सस्कृतमध्ये आहे आणखी एक शिलालेख स्कदगुप्ताच्या कारकीर्दीतील इ. स. ४५० मधील आहे सुदर्शन तलाव पुन्हा फुटला व त्याची दुरुस्ती केली असा मजकूर त्यावर आहे स्मशान म्हटल्यावर जे अप्रिय दृश्य नजरेसमोर उभे राहते ते म्हणजे गलिच्छ व अपुरी जागा, जळणाऱ्या चिता, राख, कोळसा, लाकडे व इतर कचरा आणि एकदरी शोकमय, मळकट वाटतात पण जुनागडच्या या स्मशानाचे दर्शन त्याच्या अगदी उलट होते एक तर स्मशानाची जागा भरपूर मोठी आहे या जागेवर अतिशय देखणे उद्यान, उंच व भरगच्च वृक्ष, फुलझाडे वगैरे नयनमनोहर दृश्य आहे या उद्यानात शंकर, पार्वती, श्रीकृष्ण, राम, सीता इत्यादी देवताच्या मूर्ती आहेत तसेच

गुरू नानक, आद्य शंकराचार्य, साईबाबा इत्यादी संतांच्या मूर्ती आहेत लहान लहान मंदिरावर संतवचने लिहिली आहेत. दहनाची जागाही अतिशय स्वच्छ व नीटनेटकी आहे या सोनापूर स्मशानाचा आणखी एक विशेष म्हणजे त्या स्मशानात एक 'बोन बँक' ही आहे तेथे देण्यात आलेली हाडे वैद्यकीय कारणासाठी पुरविण्यात येतात येथे आल्यावर स्मशानाला आपण भेट दिलेली नसून म्हैसूरच्या उद्यानासारख्या एखाद्या रमणीय व शांत, निवांत, सुंदर उद्यानाला भेट दिली आहे, असेच वाटते तिथून आम्ही दामोदर कुंडाकडे गेलो या कुंडाला काठावर दामोदर मंदिर आहे हे मंदिर व कुंड इ. स ४५७ मध्ये चक्रपतिता या जुनागडच्या अधिकाऱ्याने बांधले येथील मूळ कुंड हे श्रीकृष्णाचा पणतू वज्रनाभ याने बांधले होते, असा पुराणात उल्लेख आहे या ठिकाणी संत नरसी मेहताला श्रीकृष्णाने अनुग्रह करून त्याच्या गळ्यात माळ घातली होती, असे नरसी मेहताच्या चरित्रात म्हटले आहे हे कुंड ५० फूट रुंद व २७५ फूट लांब असे प्रशस्त असून त्यावर बळकट दगडी घाट आहे जवळच मुचकुंद गुफा आहे. मुचकुंद या ठिकाणी दीर्घकाळ निद्रेत होता

येथून गिरिनारला जाणारा रस्ता १८२० साली संघजी या श्रीमंत भक्ताने बांधला जुनागडचे दिवाण हरदास यांनी १८३८ साली नदीवर पूल बांधून गिरिनारचा मार्ग यात्रेकरूसाठी केला या किल्ल्यात अगदी शेवटपर्यंत रिक्षाने किंवा मोटारीने जाता येते. हा किल्ला इतका विस्तीर्ण आहे की पूर्वी त्यात एक गावच वसलेले होते ,२ लक्ष ७२ हजार चौरस फूट क्षेत्रफळ असलेला हा बळकट व भव्य किल्ला गावाच्या सीमेपासून तीन किलो मीटर्स अंतरावर आहे.

यादव जेव्हा द्वारकेहून या भागात आले तेव्हा त्यांनी हा किल्ला बांधला. नंतर अनेक राजांनी त्यात लहान-मोठ्या सुधारणा केल्या चंद्रगुप्त मौर्याने या भागात आपले राज्य स्थापन केले तेव्हा त्याने किल्ल्याची तटबंदी बळकट केली. त्यावेळी या किल्ल्याचे नाव गिरिदुर्ग असे होते व किल्ल्यावर सुभेदार व त्याचे सैन्य यांची वस्ती होती या भागात केलेल्या उत्खननावरून असे दिसून आले की मौर्य, शक आणि गुप्त या घराण्यांच्या अमलात या किल्ल्यात मोठे वाडे, मंदिरे, तलाव व क्रीडेची मैदाने होती पण सातव्या शतकानंतर हा किल्ला ओस पडला त्याच्यावर झाडी वाढली

जवळजवळ अडीचशे वर्षे हा किल्ला पूर्णपणे दुर्लक्षित राहिला होता. पण लाकडे तोडण्यासाठी या जगलात गेलेल्या एका लाकूडतोड्याला या किल्ल्याचा शोध लागला. ते दहावे शतक होते त्यावेळी राजा नवघण याने बरीच झाडे तोडून, जागा साफ करून, इमारतींची डागडुजी करून व तटबंदी दुरुस्त करून घेऊन या किल्ल्याला जीवदान दिले

तेथे दोन प्रचड विहिरी आहेत. या दोन विहिरी चागल्या भजबूत बाधून काढलेल्या असून खूपच मोठ्या आहेत. त्यांचे नाव अडीचडी कुवा असे काहीसे विचित्र आहे या विहिरीसाठी अडी व चडी या दोन दासींनी आत्मबलिदान केले आहे म्हणून त्याच्यावरून हे नाव विहिरीला देण्यात आले आहे नवघण राजाच्या पदरी असलेल्या या दोन दासी सख्ख्या बहिणी होत्या राजाने ही प्रचड विहीर खोदली, पण तिला पाणी लागेना तेव्हा ज्योतिषाने सागितले की, ही भूमी बळी मागत आहे कोणी येथे बलिदान केले तरच पाणी लागेल त्याप्रमाणे अडी व चडी यानी सर्वांना पाणी मिळावे म्हणून येथे आपले बळी दिले व मग विहिरीत पाणी लागले नवघणच्या मुलाने नतर ही विहीर पक्की बाधून घेतली ही विहीर सव्वातीनशे फूट लांब, साठ फूट रुद व सव्वाशे फूट खोल आहे विहिरीत उतरण्यासाठी पायऱ्या बांधल्या आहेत १४५० साली राव मडलिकाने ही विहीर दुरुस्त केली किल्ल्यावरच्या लोकाना पाणीपुरवठा व्हावा म्हणून नतरच्या मुसलमान सुल्तानानी व ब्रिटिश अधिकाऱ्यानीही या विहिरींची उत्तम व्यवस्था राखली

अडीचडी विहिरीजवळच गुफा आहे ही गुफा दोन मजली असून ती बौद्धांनी बाधली आहे मध्यभागी ११ चौरस फुटाचे कुड आहे ध्यान व चिंतन करण्यासाठी निवांत जागा व राहण्यासाठी ओवऱ्याही या गुफेत आहेत ही गुफा चौथ्या शतकातली आहे या ठिकाणी पूर्वी बुध विहार होता तिचे छत सहा खाबावर बाधलेले आहे नवघण कुवा नावाची विहीर याच भागात आहे राव नवघण याने सुरू केलेली ही विहीर नतर त्याचा मुलगा राव खनगार याने पूर्ण केली ३१ फूट रुद, ३२ फूट लांब व १७१ फूट खोल अशी ही विहीर आहे ज्याने अडीचडी विहीर आणि नवघण कुवा पाहिला नाही त्याचे जीवन व्यर्थ आहे अशी म्हण आहे

कोणत्याही किल्ल्यावर धान्याच्या कोठाराला अतिशय महत्त्व. कारण शत्रूच्या सैन्याचा वेढा जेव्हा किल्ल्याभोवती पडतो तेव्हा किल्ल्यातील लोकाचे सर्व भवितव्य या कोठारावर अवलबून असते उपरकोट किल्ल्यावरही तसेच कोठार आहे त्यात पूर्वी ज्वारीचा साठा केला जात असे किल्ल्याच्या पूर्वेच्या बाजूला धक्का बारी नावाचा कडा आहे गुन्हेगारा तेथून खाली ढकलून त्याचा कडेलोट करण्यात येत असे किल्ल्याच्या पश्चिम बाजूला दोन इतिहासकालीन तोफा ठेवण्यात आल्या आहेत. त्यापैकी मोठ्या तोफेला 'नीलम' असे नाव असून ती एक टन वजनाची व पचधातूची आहे. महम्मद बेगडा याने ती इ स १५३८ मध्ये या किल्ल्यावर बसविली नीलम ही तोफ १७ फूट लांब व तोंडाजवळ साडेनऊ फूट परीघ आणलेली अशी भक्कम आहे दुसरी तोफ त्या मानाने लहान आहे या तोफा इजिप्तमध्ये ओतविण्यात आल्या होत्या दीव येथे तुर्कस्थानचा ॲडमिरल सुलेमान पाशा हा आला असता त्याने त्यावेळी दीव-दमणच्या पोर्तुगीज राज्यकर्त्यांना या तोफा दिल्या होत्या पोर्तुगीजानी जुनागड विरुद्ध केलेल्या लढाईत महंमद बेगडा याने पोर्तुगीजावर विजय मिळविला तेव्हा पोर्तुगीज या तोफा मागे ठेवून पळून गेले बाबा प्यार मठ नावाची एक गुहा किल्ल्यावर आहे पूर्वी या गुहेत पस्तू असावा, बौद्धानी ही गुहा तयार केली असावी असे तेथील अवशेषावरून अनुमान काढता येते गुहेतील स्तभ व तोरणावर सिंह व इतर प्राणी कोरण्यात आले आहेत इसवी सन २०० पर्यंतच्या काळातील या गुहा असाव्यात असा अंदाज आहे

माई घडैची नावाचा एक दर्गा या किल्ल्यावर आहे त्याचे शिल्प पाहता पूर्वीचे मदिर तोडून त्याच्या अवशेषांवरच ही मशीद बाधण्यात आली हे स्पष्टपणे दिसून येते या ठिकाणी माई घडैची कबर आहे. ही माई गढवी जमातीची हिंदू होती पण तिला महमद बेगडाने सक्तीने मुसलमान केले ज्या ठिकाणी तिचे दफन करण्यात आले, त्या ठिकाणी माई घडैची मृत्यूनतरही जमिनीतून एक हात वर येतो आणि भक्ताना भिक्षा देतो अशी स्थानिक लोकात कथा प्रसृत आहे उपरकोट किल्ल्यावर एक 'ससाराची जागा' म्हणून आहे तेथे दगडावर दगड ठेवून लोक उच उतरड करतात जितके दगड न पडता ठेवण्यात येतील तितके मजली घर मिळते अशी समजूत आहे या किल्ल्यावर एक मशीद आहे हिच्या भोवती आता झाडे

वाढली आहेत या ठिकाणी पूर्वी हिंदू राजांचे राजवाडे व महाल होते या वाड्याचे दीडशे स्तंभ अजूनही आहेत महम्मद बेगडाने १४४२ मध्ये या वाड्याचे मशिदीत रूपातर केले. पूर्वीच्या राजाचे सिंहासन आता मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहे. या सर्व जुन्या व भग्नाश झालेल्या इमारती पाहात आम्ही एका मोठ्या जलाशयाकडे आलो रखरखीत उन्हात तो थड गार जलाशय पाहून प्रवासीही मनोमन निवतात याच मोठ्या जलाशयातून जुनागडला पाणीपुरवठा होतो. १८९९ साली बाधण्यात आला त्यात मध्यभागी मशिदीसारखी उच इमारत आहे व भोवती चार मिनार आहेत या चार मिनारांवर जाण्यासाठी बाहेरून गोल जिने आहेत ते सापाने एखाद्या खाबाला विळखा घातल्यासारखे दिसतात

❑

# ५ आद्य कवी व संत नरसी मेहता

नरसी मेहता हे गुजराथचे आद्य कवी व सत महाराष्ट्रात ज्ञानेश्वराना जे श्रेष्ठ स्थान आहे तसेच गुजराथमध्ये नरसी मेहताना आहे भक्तिरसाने व काव्यगुणानी ओथबलेली त्यांची भक्तिगीते गुजराथमध्ये घरोघर म्हटली जातात.

म गाधींचे सर्वात आवडते भजन 'वैष्णव जन तो तेणे कहिये' हे नरसी मेहताचेच नरसी मेहताचे बहुतेक जीवन जुनागडमधेच व्यतीत झाले ते ज्या ठिकाणी भजनकीर्तन करीत असत, ते ठिकाण अजूनही उत्तम स्थितीत ठेवण्यात आले असून 'नरसी मेहतानो चोरो' या नावाने ते प्रसिद्ध आहे चोरो म्हणजे मोठा ओटा, घरातील प्रशस्त चौक जुनागडच्या पूर्व भागात माजेवाडी गेटजवळ हा नरसी मेहतानो चोरो आहे महाराष्ट्रातील देहू, आळदी, नेवासे याच्यासारखेच हे गुजराथमधील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे

नरसी मेहता याचा जन्म १४१४ साली जुनागडनजीक तळाजा गावी झाला त्याचे मूळ नाव नरसिंह त्याचे लाडके रूप म्हणून नरसी या नावाने ते ओळखले जाऊ लागले नरसी लहान असतानाच त्यांचे वडील कृष्णादास व आई दयाकुवर यांचे निधन झाले

नरसीना बालपणापासूनच साधुसत, देव याच्याविषयी आकर्षण होते पण वयाच्या सतराव्या वर्षापर्यंत त्याना बोलता येत नव्हते एका साधूच्या आशीर्वादाने त्याना वाचा प्राप्त झाली आणि त्यानी पहिलाच शब्द उच्चारला तो म्हणजे 'राधेश्याम' त्या क्षणापासून नरसींनी म्हटले की, कृष्णभक्ती हेच आपले जीवनकार्य आहे अखेरपर्यंत म्हणजे १४८० पर्यंत त्यानी तेच केले तेव्हाच्या पद्धतीप्रमाणे वयाच्या सतराव्या वर्षीच त्याचे लग्न झाले त्याच्या पत्नीचे नाव माणकबाई असे होते पण लग्नानतरही त्याचे ससारात लक्ष नव्हते ते भक्तिमार्गालाच लागले त्यावेळी त्याचे पालक म्हणजे त्याचे चुलत भाऊ व वहिनी हे होते वहिनी त्याच्या या ससाराकडे दुर्लक्ष करण्याच्या वृत्तीबद्दल नरसींना अपमानास्पद बोलत असे

एकदा तिचे बोलणे असह्य होऊन नरसी घर सोडून गेले आणि आता ते पूर्णपणे कृष्णभक्तीला वाहून घेतलेले संत झाले



संत नरसी मेहता

नरसी मेहताची पद्यरचना अत्यत मधुर आहे साधी भाषा, भक्तिभाव व रसाळता यामुळे त्यानी भक्तिगीते सर्वत्र प्रसार पावू लागली आणि त्याच्या कीर्तनप्रवचनाना हजारो लोक येऊ लागले नरसी हे नागर म्हणजे ब्राम्हण होते पण त्या काळातही ते स्पृश्यास्पृश्यता मानीत नसत

हरिजनांच्या वस्तीतही जाऊन ते भजन, कीर्तन, प्रवचन करीत असत पुढे महात्माजींनी अस्पृश्यतेचा कलंक घालविण्यासाठी मोठेच सायास केले पण त्यापूर्वी पाचशे वर्ष नरसी मेहतांनी ते कार्य केले होते हे विशेष. त्यावेळी त्याना सनातनी लोकाचा रोष ओढवून घ्यावा लागला पण त्यांनी आपले धैर्याने त्याला तोंड दिले नरसींना कीर्तनानतर जी प्राप्ती होत असे, त्यावर त्यानी आपले साधे जीवन व्यतीत करण्यास सुरुवात केली नरसीच्या जीवनात श्रीकृष्णाने आपल्या या भक्ताला सहाय्य केल्याचे काही प्रसग घडले असे नरसींचे चरित्रकार मानतात एकदा काही संत मडळी द्वारकेच्या यात्रेला निघाली त्यांना द्वारकेत पैशाची गरज लागणार होती. त्यांनी नरसींना विनती केली तेव्हा शामल शाह नावाचा व्यापारी द्वारकेत आहे, असे नरसींनी कर्णोपकर्णी ऐकले होते

'या भक्तमंडळींना सातशे रुपये द्यावेत' अशी नरसीची शामलदास शाह नावाने चिठ्ठी घेऊन मडळी द्वारकेत गेली. पण त्यांना चौकशीअंती कळले की त्या नावाचा कोणीही व्यापारी द्वारकेत नाही आता भक्ताची निराशा झाली व द्वारकेत राहण्याचा व परतीचा खर्च कसा काय करायचा असा त्याना प्रश्न पडला तेव्हा श्रीकृष्णाने व्यापाऱ्याचे सोंग घेतले व 'मीच शामल शाह' असे सागून नरसीची चिठ्ठी घेतली व भक्ताना सातशे रुपये दिले अशी एक आख्यायिका आहे पुढे नरसी मेहताना मुलगा झाला त्याचे नाव त्यांनी शामलदास असेच ठेवले, त्यावरून या आख्यायिकेस पुष्टी मिळते त्यांना एक मुलगीही होती, तिचे नाव कुवरबाई मुलीचे लग्न होऊन मुलगी गरोदर राहिली, अशा वेळी माहेरहून आहेर पाठवण्याची गुजराथमध्ये पद्धत आहे या आहेरात काय काय द्यावे याची एक भलीमोठी यादी कुवरबाईच्या सासूने नरसी मेहतांच्याकडे पाठविली

मेहता हे दरिद्री होते. त्याचा उपहास करण्यासाठी सासूने शेवटी लिहिले, यापैकी काहीच पाठवणे जमले नाही तर निदान दोन दगड पाठवावेत.

ही यादी घेऊन मुलीच्या सासरचा दूत जुनागडला नरसींच्याकडे आला तेव्हा ते कृष्णभजनात तल्लीन झाले होते. पण प्रत्यक्ष श्रीकृष्णानी शामलशाह सावकाराचे रूप घेऊन कुवरबाईच्या यादीतील सर्व वस्तू दिल्याच. पण त्याबरोबर दोन दगडही दिले देवाच्या स्पर्शाने ते दगड

सोन्याचे झाले आणि कुवरच्या सासरची माणसे या विपुल आहेराने चकित झाली

नरसी मेहताचा मुलगा शामलदास याच्या विवाहाच्या वेळी नरसींनी द्वारकेला जाऊन श्रीकृष्णाला विवाहाचे निमत्रण दिले तेव्हा पुन्हा श्रीकृष्णाने सावकाराचे रूप घेऊन विवाह थाटात पार पाडला मुलाच्या या विवाहाचे वर्णन नरसी मेहता यानी आपल्या काव्यात मोठ्या रसाळपणे केले आहे. आपल्याकडेही जनाबाई, तुकाराम, गोरा कुभार इत्यादी सताना देवाने समक्ष येऊन वेळोवेळी मदत केल्याच्या कथा प्रचलित आहेत तशाच नरसी मेहतांविषयीही गुजराथमध्ये कथा ऐकू येतात जुनागडची 'नरसी चोरो' ही इमारत बैठी असली तरी भव्य चौक व आतील दालन मोठे असलेली अशी आहे

या इमारतीत नरसी मेहताचे दैवत श्रीकृष्णाची मूर्ती आहे समोरच एक चौथरा आहे त्यावर बसून नरसी मेहता हे भजन करीत असत नरसी मेहताच्या जीवनातील विविध प्रसग दाखविणारा चित्रसग्रहही जवळच्या दालनात आहे दामोजी व गोपनाथ यांच्या मूर्ती या मदिरात आहेत तसेच सत नरसी मेहता याचीही मूर्ती आहे. तिला काठेवाडी पगडी घातली आहे मदिरात एक मार्गदर्शक आहे, तो नरसी मेहतांचे जीवन व त्या इमारतीचे वैशिष्ट्य याची माहिती सागतो. पूर्वी गुजरातचे राजे आपल्या सरदार-मानकऱ्याचा थट्टेने घोडा, पोपट, माकड, हत्ती वगैरे नावाने बोलवीत असत पुढे तीच त्याची नावे पडली

सक्करबाग वस्तुसग्रहालयाच्या तळमजल्यावरील दालनात जुनी हस्तलिखिते आहेत. त्यात जैन चित्रेक कल्पसूत्र, (अकरावे शतक), १५ व्या शतकातील सचित्र प्राकृत ग्रंथ, नरसी मेहताच्या 'मामेरा' या ग्रथाचे हस्तलिखित, सोळाव्या शतकातील उडिया भाषेतील ताडपत्रे, इ. स १३५० मधील कल्याण मदिर स्तोत्र, इत्यादींनी विशेष लक्ष वेधून घेतले रजपूत व जयपूर पद्धतीची मिनिएचर्स एका दालनात आहेत त्यात १८ व्या शतकातील गोपीवस्त्रहरणाचे चित्र रजपूत शैलीतील आहे तसेच रासक्रीडेचेही रजपूत शैलीतील चित्र आहे मोगल शैलीतील काही लहान चित्रेही आहेत जवळच्याच पुरातत्व विभागात जैन तीर्थंकर, बुद्धाच्या अनेक प्रतिमा, सूर्य, कृपाण, विराज, लक्ष्मी इत्यादी देवदेवताचे पुतळे

उत्तर-पोवार
४६०
२३/११/८२

आहेत नाण्याचा विभाग विशेष प्रेक्षणीय आहे. त्यात पूर्वीची जुनागडची सोन्याची नाणी पाहावयास मिळतात तसेच कुमारगुप्तकालीन नाणीही आहेत. इ स १८१ ते २८८ पर्यंतच्या नाण्याचा भाग आहे दिल्लीचा सुलतान, जामनगरचा राजा व गुजरातचा सुलतान याच्या काळातील सुवर्णनाणीही येथे ठेवण्यात आली आहेत. गुजराती व फारशी लिपीतील शिलालेखही या दालनात आहेत

चादीची पानदाने आणि जुनागडच्या नबाबाना देण्यात आलेल्या मानपत्राच्या नक्षीदार पेट्या व गोलाकार आवरणे एका भागात ठेवण्यात आली आहेत सतार, मोटार, पुस्तक इत्यादी विविध वस्तूच्या आकाराची चादीची पानदाने येथे आहेत स्त्रियाच्या हातातील व पायातील चादीचे अलकार स्त्रियाना विशेष आवडतील असे आहेत. त्याशिवाय चादीची पूजेची भाडी, चादीचा चहाचा सेट, सुरई, गुडगुडी इत्यादी वस्तू या विभागात आहेत. पहिल्या मजल्यावर साडेचार फूट रुद व साडेसात फूट उच असा प्रचड आकाराचा आरसा आहे त्याच विभागात उत्कृष्ट काचसामानाचे नमुने पाहावयास मिळतात. काचाचा फ्रीझ विशेष प्रेक्षणीय आहे. पन्नास हजार रुपयाचे एक प्रचड झुबर अतिशय कलात्मक आहे तसेच विविध आकाराच्या फुलदाण्याही सुदर आहेत सौराष्ट्राच्या वस्त्राचा विभागही सपन्न आहे. रजपूत शैलीचा घागरा, जरीकाम व मोत्याचे नक्षीकाम केलेली वस्त्रे, उत्कृष्ट गालीचे यामुळे जुन्या काळच्या जुनागडच्या समृद्धीची कल्पना येते त्यात बैल व कुत्रे याच्या नक्षीदार झुली लक्षात राहतात लाकडी कोरीव कामाचा विभागही वैशिष्ट्यपूर्ण आहे याशिवाय चिनी मातीची भाडी, पेंढा भरलेले सिंह, वाघ, साबर, गवा, रेडा इत्यादी प्राणी व अनेक पक्षी प्रेक्षणीय आहेत हे वस्तुसग्रहालय रसूलखान नबाब यानी स्थापन केले त्याचे उद्घाटन लॉर्ड नॉर्थकोट याच्या हस्ते १९०१ साली झाले रसूलखान हे जुनागडचे आठवे नबाब होते जुनागडच्या प्राणिसग्रहालयात गीरचे सिह ठेवले आहेत तेही सिहाच्या पैदाशीच्या उद्देशाने या सिंहाचे छावे भारतात व परदेशात प्राणिसग्रहालयाना पाठविण्यात येतात. सिंहाप्रमाणेच वाघ, चित्ते, कोल्हे, सुसरी वगैरे प्राणीही या ठिकाणी आहेत

दिवाणबाग या जुनागडमधील मध्यवर्ती चौकात दरबार म्युझियम नावाचे वैशिष्ट्यपूर्ण वस्तुसग्रहालय आहे त्याची व्याप्ती फार मोठी नाही, पण

त्यातील जुनागडच्या नबाबाच्या दरबारचे दृश्य दीर्घकाल स्मरणात राहणारे असे आहे नवाब महाबतखान याने १८५१ साली ही इमारत बांधली. तो कलाप्रेमी होता आणि जुनागडला कलात्मक रूप देण्यासाठी त्याने योजनापूर्वक प्रयत्न केले हे वस्तुसग्रहालय ही त्याचीच निर्मिती. त्याचे मुख्य आकर्षण म्हणजे नबाबाचा दरबार नबाबाचे चादीचे सिहासन, सरदार व मानकऱ्याच्या चादीच्या खुर्च्या, जमिनीवरचे उची गालीचे व छतावरची बादशाही झुबरे यामुळे वैभवशाली दरबाराचे दर्शन आपल्याला घडले ऐंशी फूट लाब व चाळीस फूट रुद अशा भव्य जागेत हे दरबाराचे दृश्य माडण्यात आले आहे त्याशिवाय जुनागडच्या अनेक नबाबाची व त्याच्या बेगमाची छायाचित्रे, चादीच्या व कट ग्लासच्या कलात्मक वस्तू येथे आहेत नबाबाना मिळालेल्या मानपत्राचे व त्याच्या नक्षीदार चादीच्या डब्याचे प्रदर्शन येथे पाहावयास मिळते अनेक प्रकाराची घड्याळेही येथे ठेवण्यात आली आहेत त्यापैकी प्रचड घटाचे एक मोठे घड्याळ आपले लक्ष वेधून घेते पालखी विभागात अनेक प्रकारच्या अबाऱ्या ठेवण्यात आल्या आहेत त्यात चादीचे नक्षीदार हौदे प्रेक्षणीय आहेत. बेगमाच्यासाठी पडदे लावलेल्या अबाऱ्या आहेत जवळच शस्त्राचा विभाग आहे. त्यात बदुका, तलवारी, ढाली, धनुष्यबाण, पिस्तुले, मशीनगन्स वगैरे शस्त्रे माडून ठेवलेली आहेत

नबाब मोहबतखान याच्या विवाहासाठी घालण्यात आलेल्या प्रचड आकाराच्या मडपाची प्रतिकृती पाहून त्या काळच्या वैभवाचे चित्र नजरेसमोर उभे राहते त्यानतर जुनागड भागातील वस्त्राचा सुशोभित विभाग आहे. मला या दरबार म्युझियममध्ये सर्वात कुतूहलजनक आणि जर काही आढळल असेल तर जुनागडचे शेवटचे नबाब मोहबतखान याची छायाचित्रे व त्यात त्याच्याबरोबर असलेले कुत्रे या त्याने आपल्या अफाट श्वानसेनेसाठी ट्रेनिंग स्कूल्स व शिक्षकही नेमले होते या कुत्र्याच्या अगावर शोभिवत झुली असत. याच मोहबतखानाने १९४७ साली भारतात विलीन न होता पाकिस्तानात विलीन होण्याची घोषणा केली पण प्रचड जनआदोलनापुढे माघार घेऊन त्याने केशोद विमानतळावरून पाकिस्तानकडे विमानाने पलायन केले. ७ नोव्हेंबर रोजी जुनागड भारतात विलीन झाले

❑

# ६. गिरिनार आणि सासनगीर

जुनागडला गेल्यावर गिरिनारला भेट ही अत्यावश्यक असते शहरापासून अडीच मैलावर हा पर्वत आहे पायथ्यापर्यंत रिक्षाने जाता येते नतर पायऱ्या चढाव्या लागतात पुराणात या पर्वताचा उल्लेख उज्जयत, उर्जयत किंवा रैवतक असा केलेला आढळतो नतर गिरिनारायण या नावाने तो ओळखला जाऊ लागला गिरी हा पार्वतीचा भाऊ पार्वती व शंकर याच्या विवाहात या गिरीने सर्व देवादिक पाहुण्यांची उत्तम बडदास्त ठेवल्याने शकराने त्याला आशीर्वाद दिला की, 'सर्व देवाची वस्ती तुझ्या अगाखाद्यावर होईल' गिरिनार पर्वताचा उल्लेख 'सुभद्राहरण' मध्ये आहे कारण या पर्वताची यात्रा चालू असतानाच अर्जुनाने सुभद्रेचे हरण केले. गिरिनार पर्वताची पाच प्रमुख शिखरे आहेत अबाजी, गोरक्षनाथ, गुरू दत्तात्रय, ओघाड आणि कलका गोरखनाथ हे सर्वात उंच म्हणजे समुद्रसपाटीपासून ३,६६६ फूट उच असून सर्वात कमी उच शिखर हे समुद्रसपाटीपासून ६४८ फूट आहे गिरिनारचे क्षेत्रफळ ७० चौरस मैल आहे. पायथ्याजवळ काही दुकाने, लहान देवालये आहेत दुकानात मुख्यत· पूजेचे साहित्य व अबाजी व इतर देवदेवताच्या मूर्ती व फोटोची दुकाने आहेत गिरिनारला एकंदर नऊशे नव्वद पायऱ्या असून ज्यांना या पायऱ्या चढून जाणे शक्य नसते त्यांच्यासाठी डोलीची व्यवस्था आहे उतारवयातील काही लोक चारपाचशे पायऱ्या चढतात व तिथून पुढे डोली करतात. या पर्वतावर जैन. तीर्थंकराची मदिरे आहेत. तशीच हिंदू देवदेवताचीही आहेत त्यामुळे यात्रेकरूत या दोन्ही धर्मांचे लोक आढळतात.

जैनाना हे स्थळ विशेष पवित्र वाटण्याचे कारण असे की, बाविसावे तीर्थंकर नेमिनाथ याच्या जीवनाशी गिरिनार अतिशय निगडित आहे नेमिनाथानी याच ठिकाणी दीक्षा घेतली त्यांना केवलज्ञान येथेच झाले व त्याचे निर्वाणही याच ठिकाणी झाले आपल्याकडे काशी व रामेश्वर अशी जोड यात्रा मानण्यात येते तसेच जैन धर्मात पलिताना येथील शत्रुजयाची यात्रा केल्यावर गिरिनारची यात्रा आवश्यक मानण्यात येते गिरिनारला

सकाळी लवकर किंवा सध्याकाळी ऊन कलडल्यावर गेले तर पायऱ्या चढणे उत्साहवर्धक वाटते कारण भोवताली हिरवीगार झाडी आणि थड वारा यामुळे खुल्या वातावरणाचा अनुभव उत्तेजक ठरतो अधूनमधून विश्राती घेत गेले तर पायऱ्या चढून जाणे चागल्या प्रकृतीच्या माणसाला कठीण जात नाही वाटेत निवाऱ्याच्या जागा व पाणी, चहा वगैरे मिळण्याची ठिकाणे आहेत या पर्वताचा पहिला टप्पा ४१०० पायऱ्याचा व दुसरा ७४० पायऱ्याचा आहे एकदर पायऱ्या ९,९९० आहेत या पर्वतावर ४० प्रकारचे वृक्ष आणि २५ प्रकारच्या वेली आहेत नेमिनाथाचे मदिर हे या पर्वतावरील सर्वात जुने मदिर आहे नेमिनाथ हे श्रीकृष्णाचे चुलतभाई होते. त्याचा विवाह मथुरेच्या राजकन्येशी ठरला होता या विवाहानिमित्त व्हावयाच्या लग्नभोजनासाठी अनेक पशू मारण्यात येणार हे कळताच नेमिनाथ विरक्त झाले आणि विवाहाचा बेत रद्द करून ते गिरिनार पर्वतावर येऊन तपश्चर्या करू लागले सध्याचे नेमिनाथ मदिर अकराव्या शतकातील आहे ते सोळकी राजाच्या पदरी असलेल्या सज्जन नावाच्या एका मत्र्याने बांधले हे मदिर १९० फूट लाब व १३० फूट रुद अशा पटागणात आहे. मुख्य मडपाला २२ चौकोनी स्तंभ आहेत मडपाची लाबी ४१ फूट व रुदी १४ फूट आहे. पश्चिमेकडील सभागृहात १६९४ व १६९५ मधील दोन शिलालेख आहेत त्यातून रगमंडपात जाता येते गाभाऱ्यात नेमिनाथ तीर्थंकराची काळ्या सगमरवराची मूर्ती आहे त्यावर बरेच दागदागिने घातलेले आहेत. रगमडपातील छतावर दहा चौरस फुटाचे स्वस्तिक चिन्ह कोरलेले आहे नेमिनाथ मदिराजवळ ऋषभनाथाचे मदिर आहे त्यातील ऋषभदेवाची मूर्ती बारा फूट उच आहे त्या नजीकच्या पार्श्वनाथाच्या मदिरातील मूर्ती वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण आहे एक देह व अनेक मस्तके असे दत्त वगैरे देव आहेत पण तेथील मूर्तीला एक मस्तक आणि पाच देह आहेत कुमारपालचे मदिर लहान असले तरी प्रेक्षणीय आहे. ते तेराव्या शतकातील आहेत वास्तुपाल याने बाधलेल्या या मदिराचे शिल्प येथील मदिरात श्रेष्ठ दर्जाचे मानले जाते नेमिनाथाच्या पत्नी राजलुदेवी यानी जेथे वास्तव्य केले, ती गुफाही या जैनमदिराच्या समूहात आहे

अबाजी ही गिरिनार पर्वताची रक्षणकर्ती देवता आहे अबाजी हे पार्वतीचेच दुसरे नाव आहे पार्वती या पर्वतावर कशी वास्तव्य करू

लागली याविषयी एक मनोरजक कथा पुराणात आहे पुराणकाळी पर्वताना पख होते व ते उडू शकत होते पण त्या अजस्र पर्वताच्या उड्डाणामुळे देवदेवताच्या मुक्त सचारात अडथळे येऊ लागले तेव्हा देवानी इद्राकडे तक्रार केली इद्राने पर्वताचे पख कापण्यास सुरुवात केली गिरिनार हा सागराच्या तळाशी लपून बसला पण विष्णूने समुद्र हटवून त्याला बाहेर काढले गिरिनारला पुन्हा कसलाही उपद्रव होऊ नये म्हणून पार्वतीने अबाजीच्या रूपाने त्याच्यावर वस्ती केली गिरिनार पर्वतावरती अबाजी मदिर गुप्तकालीन आहे. अबाजी मदिराच्या पुढे आणखी साडेसहाशे पायऱ्या चढल्यानतर गोरखनाथ शिखर लागते. हा शेवटचा टप्पा यात्रेकरूची कसोटीच घेतो येथून पुढे डोलीने जाणारे अधिक लोक दिसतात हे गिरिनारचे सर्वात उच ठिकाण असूनही अशा अवघड जागी दगड नेऊन हे मदिर बाधण्यात आले या ठिकाणाहून दिसणारे आसमताचे हिरवेगर्द दर्शन डोळ्याचे पारणे फेडते.

जुनागडहून गीरच्या जंगलात जाता येते सिंहाना नैसर्गिक वातावरणात जेथे निर्धास्तपणे पाहता येते, असे सबंध आशियातील हे एकमेव ठिकाण आहे जुनागडहून हे ठिकाण फक्त ५८ किलो मीटर्स आहे

सासनगीर म्हणजे कोकणातल्या खेड्याचेच हुबेहुब चित्र आहे. गावातून जाणारा एकमेव ताबडसर रस्ता, बस थाब्याजवळ झोपडीवजा चारसहा उपाहारगृहे, एकदोन सोडालेमनची दुकाने, एखादे पानविडी-सिगरेटचे दुकान, आजूबाजूला झाडीतून डोकावणारी कौलारू, बैठी घरे सासनगीर सुसर उत्पादन केंद्र आहे तेथे लहान लहान जलाशय बाधून काढले आहेत आणि त्यावर ताराची जाळी आहेत आत सुसरीची अनेक पिल्ले एकमेकांवर पडून होती त्याचा एक ढीगच झाला होता किरमिजी, काळसर रगाचे कपडे धुऊन त्याचे पिळे एकमेकावर ठेवून द्यावेत तसे ते दृश्य दिसते सिह सशोधन केद्रात सिंहाची छायाचित्रे आणि माहितीचे पत्रक एका दालनात लावले आहे प्रवाशाना प्रत्यक्ष सिह दाखविण्यापूर्वी या दालनात आणून सिंहांच्याविषयी माहिती देण्यात येते. ११५ चौरस किलो मीटर्सचे जंगल आहे सासनगीर या नावाने मशहूर असले तरी त्यात सासन, जामवाला, दुनगर व जसधर असे चार भाग समाविष्ट आहेत. सासन म्हणजे लहान खेडे आणि गिरी किवा पर्वतावरून गीर हा शब्द 'सासनगीर' झाला आहे

सिंह हा जगातील सर्वात महत्त्वाचा प्राणी असूनही तो नष्ट होत आहे कारण सिंहाची शिकार करणे हे काही लोक मोठ्या पराक्रमाची व भूषणाची गोष्ट मानतात. आशिया खंडात फक्त हे सासनगीर जगलच असे आहे की तेथे सिंहाची वस्ती आहे आणि सरकारतर्फे हे सिंहाचे अभयारण्य म्हणून मानले गेले आहे येथे सिंहाची शिकार करण्याला बदी आहे ब्रिटिश काळात सस्थानिक व ब्रिटिश बडे अधिकारी यांनी शिकार करून बरेच सिंह मारले पूर्वी या जगलात तीनशे सिह होते, १९३६ साली त्याची सख्या २८७ झाली, १९५५ मध्ये २१९ तर १९७४ मध्ये फक्त १८२ झाली.'

या जगलात मालदार जमातीचे लोक राहतात, ते चोरून सिंह मारतात आणि त्याचे कातडे विकतात या मालदाराचा व्यवसाय दुधदुभत्यांचा आहे. ते जगलात गाई-म्हशी चारतात आणि त्यांचे दूध बाहेर गावात नेऊन विकतात सिंहाला इतर शिकार मिळाली नाही, तर तो रात्री या गाई-म्हशींवर हल्ला करतो आणि एखादी गाय किवा म्हैस याचे दावे तोडून तोंडात पकडून जगलात ओढून नेतो आणि खातो सिंह आकाराने म्हशीपेक्षा लहान असला, तरी अत्यत शक्तिमान असतो गाय, बैल, म्हैस असे दाडगे जनावर मानेला जबड्यात घट्ट पकडून तो ओढून नेतो कधी कधी चालत्या बैलगाडीवर हल्ला करून सिंह बैलाची वेसण तोडून त्याला ओढत नेतो दुभते जनावर हे मालसाराचे अन्न देणारे साधन तेच सिंहाने मारले तर सूड म्हणून हे मालदार बाणाने सिह मारतात.

सिंह हा तसा गरीब प्राणी आहे तो आपण होऊन कधी हल्ला करीत नाही फक्त भूक लागल्यावरच तो शिकार करतो. एरव्ही थड जगलात तो पडून राहतो सिंहाचे वजन ४०० ते ४५० किलो असते इतके जड वजन घेऊनही सिह एकदा का शिकारीच्या मागे धावू लागला की, तासी पन्नास किलो मीटर्सच्या गतीने धावू शकतो सध्या सासनगीर जगलात २५० सिंह आहे त्यापैकी ६० नर, १०० सिंहणी, बाकीचे बच्चे आहेत दर पाच वर्षांनी सिंहाची गणती होते रगानी भरलेले फुगे घेऊन माणसे झाडावर चढतात आणि ते फुगे खालून जाणाऱ्या सिंहाच्या अगावर फोडून त्या रगावरून सिंहाची गणना करतात

सफारीच्या कचेरीत शभर रुपये डिपॉझिट घेऊन एक बंद जीप, ड्रायव्हर व गाईड देण्यात येतात जीप बंद असली तरी ती काचानी बद करण्यात

येते त्यामुळे बाहेरचे सारे स्वच्छ दिसते. साग, शिसवी, चदन व इतर झाडानी जगल व्यापले आहे जगलात जाताना एका चेक नाक्यावर जंगल अधिकाऱ्याचा परवाना दाखवावा लागतो रस्ता एखादी मोटार जाण्यापुरताच केला आहे व तोही काही ठिकाणी कच्चा आहे. जंगलात हरणे, सांबर, गवे, रेडा, कोल्हे असे पशू दिसू लागतात.

सिह पाहण्यासाठी आलेले प्रवासी उंचवट्यावर उभे असतात. त्यामुळे सिंहाची त्याना भीती नसते. खाली जमिनीवर झाडाला एक रेडा बाधलेला. संध्याकाळी अधार पडण्यास सुरुवात होण्याच्या सुमाराला सिंह आपल्या जगलातल्या निवाऱ्याच्या जागेपासून इकडे येतात ते रेडा पाहतात पण त्याला खाण्यासाठी जवळ येत नाहीत कारण रेड्याजवळ बदुकधारी दोन गाईड ठेवलेले असतात त्यामुळे सिंह बदुकीच्या भीतीने लाबच थाबतात तेवढ्यात प्रवासी त्याना पाहून घेतात थोड्या वेळाने प्रवासी गेल्यावर बदुकधारी गाईडस् काढून घेतात


❑

# ७ सर्वसाक्षी सोमनाथ

सासनगीरहून सोमनाथला जाण्यास दीड तास लागतो सोमनाथ हे क्षेत्र जगप्रसिद्ध आहे गझनीच्या महमदाने १०२६ मध्ये या क्षेत्रावर स्वारी केली. पन्नास हजार लोक मारले आणि विजयोत्साहाने मदिराच्या चदनी दरवाजातून प्रवेश करून परमपवित्र सोमनाथ शिवलिंग फोडले त्यातून हिरेमाणकांचा खच बाहेर पडला महमंदाने ही कुबेराची सपत्ती उंटाच्या पाठीवरून गझनीला वाहून नेली शाळेत वाचलेल्या या इतिहासाचे अजून स्मरण होत होते सोमनाथाचा इतिहास म्हणजे 'पुनरपि जनन पुनरपि मरणम्' या कालचक्राचाच इतिहास आहे अनेकवार हे मदिर उद्ध्वस्त केले गेले आणि तितक्याच वेळा हिंदूंनी ज्वलत जिद्दीने ते पुन्हा बांधले हजार वर्षे हे कालचक्र चालू आहे या पराभूत आणि तरीही यशस्वी, पराक्रमी सोमनाथाकडे निघाले की, आपल्या चित्तवृत्ती अभिमानाने मोहरून येतात.

सोमनाथचे मदिर प्रभासपट्टणच्या एका टोकाला सागरकिनारी आहे महाभारत कालापासून प्रभास किंवा प्रभासपट्टण हे एक अती पवित्र धर्मस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे महाभारत काळी या ठिकाणी सरस्वती नदी सागरास मिळत होती पाच हजार वर्षांपूर्वी या भागात पशुपती या नावाने शिवाची पूजा होत असे. महादेव किंवा शिव हा पशूचा राजा होता आणि त्या पशूंचे प्रतीक म्हणून त्याच्या पुढे नेहमी नदी असतो सिंधू नदीच्या खोऱ्यात मोहन-जो-दडो येथे प्राचीन सस्कृतीचे जे आवशेष सापडले, त्यात शिवाची तीन मुखाची मूर्ती आहे म्हणजे पाच हजार वर्षांपूर्वी ब्रह्मा, विष्णू, महेश या त्रिमूर्तींची कल्पना अस्तित्वात होती या भागाचे मूळचे नाव कुशावर्त असे होते या कुशावर्तातील धाडसी खलाशी त्या काळी ग्रीसपर्यंत गेल्याचा पुरावा सापडला आहे (मॅके, इडस सिव्हिलिझेशन, पृ ७०) वेदकालातील माहिष्मती हे ठिकाण सध्याच्या भडोचजवळ होते. पुराण काळी या भागात यादवांची वस्ती होती आणि त्याचा अनभिषिक्त राजा श्रीकृष्ण हा द्वारकेहून राज्य करीत होता

शिवाला सोमनाथ हे नाव चंद्रावरून पडले आहे सोम म्हणजे चंद्र एक चंद्र आणि सत्तावीस नक्षत्रे यावरून एक अत्यंत रमणीय आणि उद्‌बोधक कथा पुराणकाली प्रचलित होती ही सत्तावीस नक्षत्रे म्हणजे दक्ष राजाच्या सत्तावीस कन्या चंद्राच्या कक्षेत असलेल्या तारकापुंजाना नक्षत्र असे म्हणतात या सत्तावीस नक्षत्राची म्हणजेच दक्ष कन्याची नावेही मोठी काव्यात्मक आहेत



**सोमनाथाचे मंदिर**

कन्यात रोहिणी ही सर्वात सुंदर होती त्यामुळे चंद्र तिच्याकडे अधिक लक्ष देऊ लागला आणि इतर बायकाची आबाळ करू लागला. तेव्हा त्या बायकानी आपल्या पतीविरुद्ध दक्षराजाकडे जोरदार तक्रार केली दक्ष राजाने चंद्राची त्याबद्दल निर्भर्त्सना केली आणि सर्व बायकाना समान वेळ व समान न्याय देण्याचे आवाहन केले. पण चंद्र रोहिणीच्या सौंदर्याच्या इतका आहारी गेला होता की, तो रोहिणीजवळच राहू लागला व इतर बायकाच्याकडे त्याने पूर्ण दुर्लक्ष केले. दक्षाने चंद्राला शाप देण्याची भीती घातली पण ही पोकळ धमकी आहे, आपल्या जावयालाच कोणता सासरा शाप देईल, या विचाराने चंद्र निर्धास्तपणे रोहिणीशी रममाण होऊ लागला.

संतप्त दक्षाने चद्राला शाप दिला की, ''तुझा दिवसेंदिवस क्षय होईल.''

या शापाप्रमाणे चद्राचा क्षय होऊ लागला आता चद्राला पश्चात्ताप झाला चद्राची ही दयनीय अवस्था पाहून देवानी दक्षाला उःशाप देण्याची विनती केली, त्या वेळी दक्षाने उःशाप दिला की, ''महिन्याच्या एका अर्धात चद्राचा क्षय होईल. पण दुसऱ्या अर्धात त्याची दिवसेंदिवस वृद्धी होईल यापुढे चद्राने सर्व बायकाशी समानतेने वागावे तसेच चद्राने प्रभासतीर्थात स्नान करून महादेवाची पूजा केली, तरच हा उःशाप लागू होईल'' दक्ष राजाच्या या आज्ञेप्रमाणे चंद्राने प्रभासतीर्थ येथे महादेवाची पूजा केली आणि त्याची वृद्धी होऊ लागली. दर अमावस्येला चद्र या ठिकाणी स्नान करून शिवाची पूजा करतो असे येथील पुजारी मानतात सोमाला येथे पुनर्जन्म मिळाला म्हणून शंकराच्या या पिंडीला सोमनाथ हे नाव प्राप्त झाले ऋषी आणि मुनी हे याच प्रभासतीर्थात स्नान करून पावन होत असत इद्र आणि सूर्य यांचे हे अत्यत आदरणीय असे धार्मिक स्थळ होते. पाडवानी या ठिकाणी यज्ञ केल्याचा महाभारतात उल्लेख आहे कृष्ण आणि बलराम यानीही या ठिकाणी धर्मकृत्ये केली आहेत अर्जुन गोकर्णाहून द्वारकेला जाताना प्रभासपट्टण येथे थाबला होता व त्याने तेथे धार्मिक विधी केले होते सुभद्रेचा विवाह दुर्योधनाशी ठरला आहे हे अर्जुनाला प्रभासतीर्थावरच समजले आणि नतर सुभद्राहरण हे प्रकरण घडले जनमेजय परीक्षित राजानेही येथे यज्ञ केल्याचा उल्लेख महाभारतात आहे

भारताच्या एका टोकाला विवेकानद स्मारक हे अत्यंत पवित्र, प्रगल्भ आणि आल्हाददायक स्मारक आहे तसेच पश्चिम टोकाला सौराष्ट्राच्या किनाऱ्यावर सोमनाथ हे दीर्घ परंपरेचे, परमपवित्र व सौंदर्याने नटलेले मंदिर आहे. मदिराजवळ कोणत्याही तीर्थक्षेत्रावर असते तशी फुले, कुंकू, माळा, देवाच्या प्रतिमा व फोटो याची लहान लहान दुकाने आणि काही उपाहारगृहेही आहेत. त्यातून पुढे गेलो म्हणजे मदिराभोवतीचा तट लागतो लाबून पाहताना प्रथमच नजरेत भरली मंदिराची भव्य कमान ही कमान 'दिग्विजय द्वार' या नावाने प्रसिद्ध आहे ही कमान पन्नास फूट उच्च आणि तीस फूट रुद आहे कमानीमागे मदिरावरील भगवा ध्वज पाहताना अतःकरण भरून येते कारण हा ध्वज म्हणजे हिंदू धर्माच्या निरंतर श्रद्धेचे,

जिद्दीचे आणि पराक्रमाचे उच्च प्रतीक आहे. सहा वेळा हे मदिर पाडले गेले, निशाण तोडले गेले, मदिर मूर्तीसकट फोडले. पण हिंदूंनी अपार कष्ट व अपूर्व जिद्द दाखवून सात वेळा हे मंदिर बाधले हे फडफडते निशाण पाहून हिंदू धर्माच्या भवितव्याविषयी एक प्रकारचा आत्मविश्वास आणि निश्चितता आपल्या मनात निर्माण होतात सोमनाथची आणखी एक खासियत आहे ती म्हण। या मदिराला अफाट सागर आणि अनंत आकाश याचे वरदान आहे त्या अनताच्या पार्श्वभूमीवर हे मंदिर एखाद्या अमोल हिऱ्याप्रमाणे शोभून दिसते. तत्त्वचितनासाठी अशी जागा म्हणजे आदर्शच. पढरपूर, तुळजापूर, काशी-विश्वनाथ अशी काही मदिरे अत्यंत पवित्र खरी पण त्याच्या वाटा चिंचोळया व दाटीच्या आहेत याउलट केदारनाथचे मंदिर, सोमनाथ अशी काही मंदिरे ही विस्तीर्ण पार्श्वभूमी लाभलेली आहेत दिग्विजय द्वारातून आत गेल्यावर मदिरात प्रवेश करण्यापूर्वीच समुद्रावरचे आल्हाददायक, थंड वारे आपले स्वागत करतात. त्यामुळे चित्तवृत्ती शात होतात आणि सोमनाथसारख्या प्रथम ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यास योग्य असे वातावरण तयार होते

सोमनाथ मंदिर अत्यत कलात्मक आहे दिग्विजय द्वारही नक्षीदार जयपुरी पद्धतीचे आहे मंदिराभोवती विस्तीर्ण मोकळी जागा आहे मधूनच भक्ताना विश्रातीसाठी तेथे बाके ठेवली आहेत. त्या जागेवरून मदिराकडे पाहिले तर अनेक शिखरांतून वर जाता जाता एकच शिखर दिसते एकात्मतेचे हे प्रतीक आहे. त्याखाली असख्य लहान लहान गोपुराचा समुदाय वर निमुळता होत जाताना दिसतो. मूळ मंदिरासमोर सध्या आणखी एक भव्य सभामडप बाधण्याचे काम चालू आहे, तेही नजरेत भरते. मदिराची नक्षीदार तोरणे व संगमरवरी पायऱ्या ओलाडून आपण आत गेलो की, प्रार्थना मडप लागतो. त्यातील कोरीव काम विलक्षण लोभसवाणे आहे हा मडप पंचाहत्तर फूट लांब व पन्नास फूट रुंद आहे त्याच्या आठ स्तभांवर देवदेवता, यक्ष, किन्नर याच्या देखण्या मूर्ती कोरल्या आहेत. नक्षीदार महिरप आणि छतावरच्या सोळा देवता आपले लक्ष आकर्षित करून घेतात. थोडे पुढे गेल्यावर मोठा सगमरवरी नंदी आहे एका बाजूला गणपती व दुसऱ्या बाजूला हनुमान अशा दोन मूर्ती गाभाऱ्याच्या दोन्ही बाजूला आहेत.

गाभाऱ्याचा चांदीचा दरवाजा व त्यामागे काळ्या पाषाणाचे भव्य शिवलिंग आहे. या शिवलिंगावर ओम् हे अक्षर व उभा नाग गंधाने काढलेला असतो. या शिवलिंगामागे चांदीच्या दिव्याची मंदिरप आणि सोमनाथाचा चांदीचा मुखवटा आहे. सोमनाथाच्या दर्शनाचे महत्त्व सांगणारा श्लोक असा

सोमलिंगम् नरो दृष्ट्वा सर्व पापात् प्रमुच्यते ।
लब्ध्वा फल मनोऽभीष्ट मृतः स्वर्ग समीहते ।।

(सोमनाथाच्या दर्शनाने सर्व पापे नष्ट होतात. ज्याने हे दर्शन घेतले आहे त्याच्या सर्व मनोकामना पूर्ण होऊन तो स्वर्ग मिळविण्यास पात्र होतो.)

सोमनाथाच्या पिंडीवर छाया धरणारी चांदीची शेषाची मूर्ती आहे. शिवलिंगामागे आदिशक्ती पार्वतीचीही मूर्ती आहे. गाभाऱ्याबाहेरच्या सुगंधित, प्रसन्न आवारात तासभर बसून चिंतन करणे हा एक अद्भुत व उदात्त अनुभव आहे

प्रार्थनामंडपाच्या डाव्या बाजूने मंदिराच्या वरच्या मजल्यावर जाण्यासाठी जिना आहे. या तीन मजली मंदिराच्या पहिल्या मजल्यावर अनेक छायाचित्रातून सोमनाथ मंदिराच्या इतिहासाचे दर्शन घडते. मूळ सोमनाथ मंदिराची छायाचित्रे येथे आहेत. तसेच म. गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, पंतप्रधान जवाहरलाल नेहरू इत्यादी ज्येष्ठ नेत्यांनी मंदिराला दिलेल्या भेटींच्या वेळची छायाचित्रेही येथे व्यवस्थित मांडून ठेवली आहेत. त्यावर विजेचा प्रकाश व प्रत्येक चित्राखाली त्याचे वर्णन आहे. भग्नावस्थेतील मूळ मंदिर व त्याच्या काही भागावरील सुंदर नक्षीकाम याचे दर्शन येथे घडते. दुसऱ्या मजल्यावर हाच विषय पुढे चालू करण्यात आला आहे. 'सोमनाथ टेंपल थ्रू द एजीस' असा या विभागावर फलक आहे. महाभारतात सोमनाथाचे अनेक उल्लेख आहेत. त्या काळापासून आतापर्यंत सोमनाथ मंदिराची किती व कशी स्थित्यंतरे झाली, याची उत्कृष्ट कल्पना या विभागातील छायाचित्रे व जुन्या मंदिराचे अवशेष यावरून येते

नव्या सोमनाथ मंदिराजवळच जुना सोमनाथ या नावाने ओळखले जाणारे मंदिर आहे. ते इंदूरच्या अहिल्याबाई होळकर यांनी बांधले आहे.

सोमनाथ मंदिराचा आणि मराठ्यांचा फार जिव्हाळ्याचा संबंध आला आहे औरंगजेबाने सोमनाथ मंदिर उद्ध्वस्त करून त्याला रंग फासला तेव्हाच मराठ्यांनी त्याचा सूड घेण्याचा निश्चय केला धनाजी जाधव यांनी १७०५ मध्ये रतनपूरच्या लढाईत मोगलांचा दारुण पराभव केला आणि त्याच वेळी मराठ्यांचे शक्तिमान हात सोमनाथचे भ्रष्टीकरण दूर करण्याच्या उद्योगाला लागले. 'हरहर महादेव' च्या गर्जनांनी सौराष्ट्राचे आकाश व्यापून गेले दमाजी गायकवाड यांनी सोमनाथवर स्वारी करून मोगलांना जेरीस आणले. सोमनाथवर पुन्हा भगवे निशाण रोवून शिवाची त्या भागात पुन्हा प्रतिष्ठापना करण्यासाठी मराठ्यांचे रक्त सळसळत होते यावेळी सोमनाथ हे ना मशीद ना मंदिर या अवस्थेत होते. कारण ते उद्ध्वस्त झाले होते. प्रभासपट्टण गावाबाहेर एका लहान मंदिरात तेव्हा लोक सोमनाथाची पुजा करीत होते पण या महादेवाची पूर्वीच्या इतमामाने भव्य मंदिरात आणि पूर्वीच्याच जागी पुन्हा प्राणप्रतिष्ठा करावी ही सर्व भक्तांची अपेक्षा होती

यावेळी मराठ्यांची सत्ता वाढत• होती मराठ्यांनी गुजरातचे मोगल सुभेदार आणि गुजराती राजे यांना नामोहरम करून गुजरातेत आपले पाय घट्ट रोवले होते १७५३ मध्ये मराठ्यांनी अहमदाबाद घेतले आणि त्यांचे डोळे पुन्हा सोमनाथकडे लागले १७५९ मध्ये मराठ्यांनी सौराष्ट्रावर आपली सत्ता प्रस्थापित केली पण सोमनाथला पुन्हा मानाचे स्थान येईपर्यंत मराठ्यांना स्वास्थ्य नव्हते. मराठे सतत लढाईत गुंतलेले आणि सोमनाथ मंदिराच्या पुनर्रचनेचे काम तर अफाट खर्चाचे आणि वर्षानुवर्षे लागणारे होते. याच काळात इंदूरच्या अहिल्यादेवी होळकर यांना सोमनाथचा दृष्टांत झाला की, 'माझ्या प्रतिष्ठापनाचे कार्य तुझ्या हातून होईल' अहिल्यादेवींनी लगेच हे जीर्णोद्धाराचे कार्य हाती घेतले मोगलांना मंदिराचा सुगावा लागू नये म्हणून त्यांनी नवे शिवलिंग जमिनीखाली तळघरात नेले तेथे धार्मिक विधीसह १७८३ मध्ये सोमनाथाची पुन्हा प्रतिष्ठापना करण्यात आली औरंगजेबाच्या जुलमी सत्तेचा हा सणसणीत पराभव होता. दगडामातीचे देऊळ उद्ध्वस्त करून कोट्यवधी लोकांच्या मनातील श्रद्धा नाहीशी होत नाही हेच या महान प्रतिष्ठापनेने पुन्हा एकदा दाखवून दिले

इ स १८०० मध्ये सौराष्ट्राचे प्रभुत्व बडोद्याच्या गायकवाडाकडे आले त्यावेळी प्रभासपट्टण हे जुनागडच्या नबाबाच्या क्षेत्रात होते पण

गायकवाडानी त्या नबाबाबरोबर खास करार केला होता की, सोमनाथ मदिराचे पावित्र्य रक्षिले जाण्यासाठी प्रभासपट्टणवर गायकवाडाची सत्ता राहील १८१३ मध्ये सौराष्ट्र हा भूपट्टा ब्रिटिशांच्या ईस्ट इडिया कपनीकडे गेला आणि जुनागडच्या मुस्लिम नबाबाला चिथावणी देण्यासाठी त्यानी नबाबाला जादा सवलती दिल्या त्यामुळे शेफारलेल्या नबाबाने सोमनाथला जाणाऱ्या यात्रेकरूच्या बैलगाड्यावर यात्राकर बसविला. पण बडोद्याच्या गायकवाडानी जुने करार दाखवून सोमनाथ यात्रेकरूवरील हा कर रद्द करविला आणि वसूल केलेला कर परत करवून सोमनाथवर आपली सत्ता अबाधित आहे हे सिद्ध केले त्यानतर अनेक वर्षे जुनागडचा नबाब आणि बडोद्याचे गायकवाड याच्यात सोमनाथवरील हक्काबाबत वादविवाद झाले व एकदा तर हा वाद लडन येथे सेक्रेटरी ऑफ स्टेटपर्यंत गेला

त्यानतर शभर वर्षांनी १९२२ मध्ये कन्हैयालाल मुन्शी सोमनाथ मदिराचे उद्ध्वस्त अवशेष पाहण्यासाठी गेले मदिर उद्ध्वस्त झाले होतेच पण मदिराच्या गाभाऱ्यात एका फौजदाराने आपली घोडी बाधली होती एतद्देशीयाच्या परमपवित्र मदिराची ती अवहेलना पाहून मुन्शींना अत्यत क्लेश झाले कधी ना कधी या ठिकाणी भव्य मदिर बांधायचे आणि त्यात मोठ्या मानाने सोमनाथाची प्राणप्रतिष्ठा करायची असा विचार यावेळी त्याच्या मनात आला भक्त उतावीळ होते पण सोमनाथ त्रिकालदर्शी होता नियतीचे चक्र कसे फिरणार हे त्याला माहीत होते. कारण सोमनाथाने असे अनेक विध्वस पाहिले होते आणि हे विध्वसक लयाला गेलेलेही पाहिले होते. सोमनाथाचा विध्वंस आणि पुनरुज्जीवन याची कहाणी ही जितकी दीर्घ तितकीच स्फूर्तिदायकही आहे फिनिक्स पक्षी सहारातूनच पुनर्जन्म घेतो, तसे प्रत्येक विनाशानंतर सोमनाथाने नवे व अधिक तजेलदार रूप घेऊन पुन्हा अवतार घेतला आहे. पुराणकथानुसार सोमनाथाचे पहिले मदिर वेदकाळात सोमराजाने बाधले, ते सुवर्णाचे होते. सौराष्ट्र हा खोलगट भाग आहे आणि पुराणात ज्याचा उल्लेख 'पाताळ' असा आला आहे, तो हाच भाग आहे असा तज्ज्ञांचा अदाज आहे पाताळ हा नागलोकाचा देश होता तक्षक आणि करकोटक हे महासर्प म्हणजे या नागाच्या राज्यांचे प्रमुख होते शिव हा त्याचा परमेश्वर होता शिवाच्या गळ्यातील नाग आणि सौराष्ट्रातील नागलोक याचा सबध असा प्रस्थापित

होतो सोमराजाने बाधलेल्या सुवर्ण मदिराच्या सोन्याच्या अभिलाषेने लुटारूनी हे मदिर उद्ध्वस्त करून टाकले त्रेतायुगात रावणाने या ठिकाणी चादीचे सोमनाथ मदिर बाधले रावण हा महान शिवभक्त होता रावणाने बाधलेले हे मदिर नष्ट झाल्यानतर श्रीकृष्णाने त्याचा जीर्णोद्धार केला व सोन्या-चादीला लुटारूचे भय असल्याने त्याने तेथे चदनाचे मदिर बाधले, पण तेही कालाच्या ओघात नष्ट झाले.

पुराणकालातील या मदिराखेरीज इतिहासकालातही सोमनाथाची अनेक मदिरे झाली शिव हा हिंदूचा अत्यत वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण देव आहे ऐश्वर्याचा आणि या देवाचा तसूभरही सबध नाही उलट शिव हा स्मशानात राहाणारा आणि अगाला राख फासून बसणारा देव आहे चमत्कार आणि जादू याच्याशी शिवाचा सबध आहे गावोगावचे गावरान गारुडी व जादूगार शिवाचे डमरू हातात धरून व ते वाजवीत गारुड्याचे खेळ करतात एकेकाळी जादूच्या विद्येला सोमविद्या हे नाव होते, ते शिवावरूनच पडले होते कारण सोम म्हणजे चद्र हा शिवाच्या जटात वस्ती करतो ऋषिमुनीत शिवयोगी या नावाचा एक प्रकार आहे प्रभासपट्टण हे हजारो वर्षे या शिवयोगींचे प्रमुख केद्र होते तत्रविद्येत सोम आणि शिव यांना अत्यत महत्त्वाचे स्थान आहे गगा, यमुना व सरस्वती या त्रिवेणी सगमावर सोमेश्वराची अधिसत्ता आहे असा ऋग्वेदातही उल्लेख आहे सौराष्ट्रात शिवाची पूजा पशुपती म्हणून घेत असतानाच एका पशुपतिराजाने प्रभास तीर्थावर इतिहासकालीन पहिले मदिर बाधले हा राजा प्रत्यक्ष शिवाचा अवतार आहे असे त्याची प्रजा मानीत असे ख्रिस्त शतकाच्या सुरुवातीस हे सोमनाथाचे पहिले मदिर बांधले गेले असा अदाज श्री. कन्हैयालाल मुन्शी यानी व्यक्त केला आहे ('सोमनाथ-द श्राईन इटर्नल' पृ १८)

मात्र गुप्त राजाच्या कारकीर्दीत सोमनाथ मंदिर दुर्लक्षिले गेले हा काळ इ स ३२० ते ५०० पर्यंतचा आहे गुप्त घराण्यातील राजे हे विष्णुभक्त होते आणि साहजिकच 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायाने प्रजाही शिवभक्तीकडून विष्णू सप्रदायाकडे वळली या काळात पहिले सोमनाथ मदिर भग पावले व हळूहळू नष्ट पावले मात्र हर्ष राजाच्या कारकीर्दीत सोमनाथाचे मंदिर पुन्हा उभारले गेले. या मंदिरात ब्रह्मी लिपीतील काही

शिलालेख सापडले, ते याच काळातील या मंदिराला सुदर गाभारा आणि विस्तृत सभामडप होता, असे नतर सापडलेल्या अवशेषावरून आढळून आले आहे या काळात (इ स ६४० ते ६४९) धारसेन राजा या भागात राज्य करीत होता दशकुमारचरित्राचा लेखक दडी हा समकालीन होता या काळी प्रभासपट्टण हे आतरराष्ट्रीय महत्त्वाचे बदर होते आठव्या शतकात बदामीच्या चालुक्यानी हा भाग पादाक्रात केला इ. स ७११ मध्ये अरबांची वक्रदृष्टी सौराष्ट्र व गुजरातवर वळली अरब सैन्याने मारवाड, भडोच, सौराष्ट्र या भागावर हल्ले केले या हल्ल्यात सोमनाथचे दुसरे मंदिर नष्ट झाले मात्र चालुक्य घराण्यातील पुलकेशीने अरब सैन्याचा नवसारीजवळ पराभव केला त्याच सुमाराला नागभटाने अरबाना सौराष्ट्रातून हुसकावून लावले नागभट हा गुर्जरदेशाचा राजा झाला नागभटाने कनौजपर्यंत आपली सत्ता प्रस्थापित केली त्याने प्रभासपट्टणला येऊन सोमनाथाची पूजा केली

सोमनाथाला पुन्हा महत्त्व प्राप्त झाले चालुक्य घराण्यातील चौथा धारसेन याने इ स ८०० च्या सुमाराला सोमनाथचे तिसरे मदिर बाधले ते ताबूस रगाच्या दगडाचे होते व आकारानेही पूर्वीच्या तिन्ही मदिरापेक्षा भव्य होते इतकेच नव्हे, तर सोने, हिरे, मोती वगैरे रत्नानी मढवलेले स्तभ व तोरणे मदिरात होती मदिराच्या देखभालीसाठी दहा हजार गावाचे उत्पन्न देण्यात आले होते. हे तिसरे मदिर तेरा मजली आणि दोनशे मौल्यवान स्तभाचे होते असे सागण्यात येते सोमनाथाच्या पूजाअर्चेसाठी एक हजार ब्राह्मण व नृत्य-गायनासाठी साडेतीनशे गायिका व नर्तिका व त्याची प्रमुख चौलादेवी होती या चौलादेवीविषयी अशी कथा प्रचलित आहे की ती मुळात अप्सरा होती पण स्वर्गात विहार करीत असताना तिचा पाय सोमनाथ मदिराच्या उच शिखराला लागला तेव्हा सोमनाथाने तिला शाप दिला त्यातून वाचविण्यासाठी चौलादेवीने सोमनाथाच्या मदिरात नृत्य करून देवाची सेवा केली. ती सेवा करीत असतानाच नरनदी नावाचा एक पुजारी आणि राजा भीमदेव असे दोघेही हिच्यावर प्रेम करू लागले पण 'मी अप्सरा असून मानवाला प्राप्त होणार नाही,' असे ती सागते नरनदी सुडाला पेटतो आणि परकियाना आवाहन करतो की त्यानी येऊन समृद्ध सोमनाथ मदिर लुटून न्यावे राजा भीमदेव मदिराच्या

रक्षणासाठी जिद्दीने लढतो पण नरनदीच्या फितुरीमुळे परकीय विजयी होतात या वेळी निराश झालेला राजा भीमदेव आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो, पण चौलादेवी त्याला नवा उत्साह देते आणि त्या नव्या शक्तीमुळे राजा भीमदेव परकीय हल्लेखोराना परतवून लावतो नरनदीला ठार मारण्यात येते सोमनाथाच्या मदिरावर आघात झाले, तरी ते उद्ध्वस्त झाले नाही

सोमनाथ मदिर हे इ. स ८०० पासून दीडशे वर्षे भारतातील सर्वात महत्त्वाचे मदिर होते. हा काळ सोमनाथाचा सर्वात वैभवाचा होता प्रतिहारी राजे आणि सौराष्ट्रातील त्याचे मानकरी याचे ते दैवत होते. प्रभासपट्टण हे प्रमुख बदर असल्याने सर्व भाविकाचे दैवत सोमनाथ हेच होते कनौजच्या गुजरेश्वरानी सोमनाथ आपले दैवत मानल्याने सपत्ती व राजमान्यता याचा अपूर्व वर्षाव या मदिरावर होत राहिला शेकडो मैलावरून यात्रेकरू येत आणि प्रभासपट्टणचा परिसर सतत गजबजलेला राहत असे इ स ९६० मध्ये शिलाहर राजे सैन्यासह सोमनाथला येऊन त्यानी सोमनाथाची पूजा शाही इतमामाने केली होती सोमनाथ हा गुजरातचा सरक्षक देव होता

गझनीच्या राज्यावर त्याच्या धाकट्या भावाची वारस म्हणून नेमणूक झाली असतानाही महंमदने आपल्या धाकट्या भावाला पदच्युत करून गादी बळकावली मग त्याने इराण व मध्य आशिया या भागावर आक्रमण करण्यास सुरुवात केली इ स १००० मध्ये गझनीच्या महमदाची नजर भारताकडे वळली गझनीच्या महमदाचे सैन्य हे असस्कृत व पाशवी होते त्याची लढाईची कल्पना चेंगीजखानच्या सैन्यासारखीच होती प्रतिपक्षाच्या सैन्याबरोबर धर्मयुद्ध करावे हे लढाईचे मूलतत्त्व बाजूला ठेवून गझनीच्या महमदाने सैन्य लुटालूट, बलात्कार, निरपराधी नागरिकाची कत्तल या अनैतिक मार्गांचा बेगुमान वापर करीत भारतावर तीन वेळा आक्रमण करून कनौजपर्यंत लुटालूट केल्यावर महमदाला सोमनाथ मदिरातील अमाप सपत्तीचा, जडजवाहर व सोन्याचा सुगावा लागला अनेक देश लुटून सात जन्मात मिळणार नाही एवढी सपत्ती एका सोमनाथ मंदिरात आहे हे कळल्यावर महमदाने एखाद्या महायुद्धासारखी अवाढव्य तयारी केली तीस हजार घोडेस्वार आणि तीस हजार उट त्याने सज्ज केले

गझनीकडून सोमनाथला जाताना शेकडो मैल रखरखीत वाळवट ओलांडावे लागेल हे ओळखून त्याने पाण्याच्या पखाली पाठीवर घेतलेल्या उंटाची तरतूद केली होती

सोमनाथच्या वाटेवर महंमदाच्या अफाट सैन्याने मुलतानला मुक्काम केला. या वेळी गुर्जर देशावर भोज राज्य करीत होता आणि सोमनाथावर त्याच्या मांडलिकाचा म्हणजे भीमराजाचा ताबा होता. मंदिराजवळ भोज राजाच्या सैन्याने महमदाबरोबर लढाई केली पण महंमदाच्या अफाट सैन्याने थोड्याच काळात विजय मिळविला. मोढेराहून विजयी महमद झपाट्याने सोमनाथाकडे निघाला वाटेत त्याने देलवाडा लुटले सोमनाथाच्या किल्ल्याच्या तटबंदीजवळ महमद पोचला ती तारीख ६ जानेवारी १०२६ होती सोमनाथच्या संरक्षकांनी अपूर्व शौर्याने लढा दिला. पण महमदाचे सैन्य तरबेज होते, अमानुष होते. त्याने दिसेल त्याची कत्तल करण्यास सुरुवात केली त्यात सैनिक व नागरिक, स्त्री व बालक असा भेद केला नाही सात दिवस चाललेल्या या घनघोर लढाईत पन्नास हजार लोकांनी सोमनाथासाठी आत्मार्पण केले. पण प्रचंड रसद आणि अनेक लढायांनी सरावलेले बळकट सैनिक याच्या जोरावर महंमदाने विजय मिळवला. महमदाने सोमनाथाचा किल्ला घेतला आणि सोमनाथाच्या पवित्र मंदिरात विजयाच्या गजरात तो शिरला त्या वेळी देवाच्या पुजाऱ्यांनी परोपरीने सांगितले की, वाटेल तेवढी संपत्ती घ्या, सोमनाथाच्या पिंडीच्या वजनाइतके सोने आम्ही देतो पण सोमनाथाच्या शिवलिंगाला स्पर्श करू नका पण उद्दाम महमदाने ते ऐकले नाही. त्याच्या सैन्याने प्रचंड हातोड्याचे प्रहार शिवलिंगावर केले ते शिवलिंग फुटले, तेव्हा त्यातून हिरे, माणिके, पाचू अशी रत्ने बाहेर पडली. तेव्हा महमदाला आपल्या स्वारीचे सार्थक झाले असे वाटून त्याने विजयोन्मादाची आरोळी ठोकली

केवळ शिवलिंग फोडून महमदाचे समाधान झाले नाही त्याने त्यातल्या दगडाचे, सुंदर कलाकुसरीचे व देवदेवताच्या मूर्तींचे सबंध मंदिर जमीनदोस्त केले इतकेच नव्हे तर दगड जळणार नाहीत हे जाणून त्याने लाकडाचा प्रचंड ढीग भग्न झालेल्या देवळात आणून त्याना आग लावून दिली सुंदर नक्षीचे दगड काळवंडून गेले, उष्णतेने फुटले, अनेक देश लुटून जेवढी संपत्ती मिळणार नाही तितकी एका सोमनाथ मंदिरात मिळाल्याने

महमदाला हर्षोन्माद झाला त्याने ही सर्व सपत्ती हजारो उटाच्या पाठीवर घातली आणि सोमनाथ परिसरात विखुरलेल्या, सडत चाललेल्या पन्नास हजार लोकाच्या प्रेतातून वाट काढीत ही संपत्ती वाजत गाजत गझनीला नेली जगाच्या इतिहासातील एक अत्यत मोठे विध्वसाचे कुकर्म गझनीच्या महमदाने केले त्याचबरोबर तेरा मजली, रत्नखचित, गुलाबी रगाच्या दगडाचे तिसरे मंदिर नष्ट झाले त्यानतर नऊशे वर्षांनी श्री. मुन्शी यानी उद्ध्वस्त सोमनाथाला भेट दिली, तेव्हाही त्यांना या ठिकाणी गुलाबी मदिराचे आगीत काळवडलेले काही दगड दिसले

❑

# ८. विध्वंसातून पुनर्जन्म घेणारा सोमनाथ

गझनीच्या महमदाने अमाप सहार करून सोमनाथाची अवाढव्य सपत्ती लुटून नेली खरी, पण त्याला हा विजय फार महाग पडला. प्रत्यक्ष लढाईत त्याचेही हजारो सैनिक मारले गेले स्वारीवर निघताना त्याने जशी शिबदीची व पाण्याची जय्यत तयारी केली होती, तशी सोमनाथाहून परत जाताना होऊ शकली नाही त्यामुळे महमदाचे हजारो सैनिक, घोडे, उट परतीच्या वाटेवर अन्नपाण्यावाचून तडफडून मेले या स्वारीमुळे महमदाला एवढी मोठी अद्दल घडली की भारतावर पुन्हा आक्रमण करण्याचा विचार त्याने नतर केला नाही सोमनाथच्या उद्ध्वस्त मदिराचाही लवकरच जीर्णोद्धार झाला गुजरातचा राजा परमदेव आणि भीमदेव यानी हे पुनरुज्जीवन इ स १०३० पासून पुढे दहा वर्षांत केले पुन्हा सोमनाथची कीर्ती भारतात व भारताबाहेर पसरू लागली. यावेळी अलबिरुनी या अरब प्रवाशाने आपल्या वृत्तातात म्हटले आहे की, 'मुस्लिमाना मक्केचे जेवढे महत्त्व तेवढेच हिंदूना सोमनाथाचे महत्त्व आहे.' सोमनाथाचे हे चौथे मदिर तिसऱ्या मदिराएवढे भव्य नव्हते पूर्वीच्या चौथऱ्यावरच पाढऱ्या पाषाणानी हे लहान मंदिर बाधण्यात आले होते

या चौथ्या मदिरानतर पाचवे मदिर झाले, ते चौथ्याच्या विनाशाशिवायच कारण हे नवे मदिर जुन्या मदिराचाच विस्तार होता भाव बृहस्पतीने इ स १८६९ मध्ये चौथ्या मदिराला नक्षीदार स्तभाची जोड दिली, भव्य सभागृह बाधले आणि पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून कृत्रिम तळे तयार केले भावब्रम्हत्ती हा मूळचा बनारसचा म्हणजे काशीचा तो परम शिवभक्त होता परमार या चालुक्य राजाच्या आश्रयाखाली भावबृहस्पतीने शिवाचे स्मारक म्हणून हे पाचवे सोमनाथ मदिर बाधले नतर भीमदेव राजाने सोमनाथ मदिराला मेघनाद मडप आणि सोमेश्वर मडप याचीही जोड दिली पण विध्वस हे सोमनाथच्या नशिबी होतेच आता ही क्रूर कामगिरी केली ती अल्लाउद्दिन खिलजी याने बाराव्या शतकात भावबृहस्पतीने बाधलेल्या सोमनाथ मदिरावर

## अल्लाउद्दिन खिलजीची वक्रदृष्टी वळली

अल्लाउद्दिनने २४२ मध्ये दिल्लीहून माळव्यापर्यंत येऊन भिलसा काबीज केले माळवा आणि वरगळ भागात मोठ्या प्रमाणावर लूटमार करून तो दिल्लीला गेला. त्यावेळी त्याचा काका जलालउद्दिन दिल्लीच्या तख्तावर होता, पण अल्लाउद्दिन खिलजीने आपल्या काकाचा खून करून गादी बळकावली गझनीच्या महमदाने जिंकून अमाप संपत्ती लुटून नेली, त्याच सोमनाथवर पुन्हा स्वारी करण्याचे खिलजीने ठरविले. तो चितोडमार्गे गुजरातवर चाल करून आला. वाटेत लूटमार, जाळपोळ व कत्तल करीत खिलजी प्रभासपट्टणपर्यंत आला यावेळी अलफखान हा त्याचा सरसेनानी होता प्रभातपट्टणचा एक वरिष्ठ अधिकारी माधव याला खिलजीने फितूर करून घेतले आणि मोगली सैन्याला प्रभासपट्टणमध्ये सुलभ प्रवेश मिळाला. अलफखानच्या सैन्याविरुद्ध याही वेळी आपले सैनिक प्राणपणाने लढले, पण त्याच्या अनेकपटीने असलेल्या मोगली सैन्याने त्याचा पराभव केला. अलफ खान सोमनाथ मदिरात विजयोन्मादाने घुसला. त्याने शिवलिंग फोडले आणि ते तुकडे दिल्लीला नेऊन त्याचा आपण दगड फोडून चुना करू अशी दर्पोक्ती काढली गझनीच्या महमदाप्रमाणे अलफखानानेही खिलजीच्या हुकमावरून सोमनाथ मदिर उद्ध्वस्त केले आणि पाचव्या मंदिराचा अत झाला

पण सोमनाथ अमर आहे तो नष्ट झाला तरी पुन्हा नव्या शक्तीने जन्म घेतो. भक्ताच्या दर्शनासाठी पुन्हा अवतार घेतो. १३२५ ते १३५१ या काळात सोमनाथ मदिर आणखी एकदा उभारले गेले सोमनाथाची पुन्हा प्राणप्रतिष्ठा झाली हे सहावे मदिर उभारण्याचे श्रेय जुनागडचा चुडासमा राजा मदियाल आणि त्याचा मुलगा खानगार यांना आहे. पाचव्या सोमनाथ मदिरानंतर शभर वर्षे सौराष्ट्रावर चालुक्य घराण्याचा अंमल चालू राहिला, पण गुजरातवर दिल्लीच्या सुलतानाचा अंमल होता गुजरातचे सुभेदार दिल्लीहून नेमले जात, पण दिल्लीची सत्ता अंतर्गत कलहामुळे कमकुवत होताच गुजरातचे मोगल सुभेदार स्वतत्र झाले त्यापैकी जाफरखान हा कमालीचा हिदुद्वेष्टा होता त्याने सोमनाथवर स्वारी केली, पण ते मंदिर उद्ध्वस्त न करता त्याने चौदाव्या शतकाच्या अखेरीस या मंदिरावरच मशिदीचा घुमट बांधला सोमनाथाला भ्रष्ट करून त्याने मदिराची मशीद

केली. प्रभासच्या हिंदू जनतेला जाफरखानाने सक्तीने बाटवून मुसलमान करण्यास सुरुवात केली तेव्हा हिंदूंनी बंड केले आणि त्यांनी जाफरखानला हाकलून देऊन स्वातंत्र्य पुकारले. सोमनाथाची मशीद पुन्हा पवित्र मंदिर झाले. गुजरातच्या सुलतानात यावेळी एकमेकाचे विश्वासघाताने खून करण्याची मालिकाच सुरू झाली. १४११ मध्ये अहमद शहा याने आपल्या आजोबाला विष घालून ठार केले आणि गादी बळकावली. त्यानेच गुजरातची राजधानी कर्णावती हिचे नाव बदलून अहमदाबाद असे नामांतर केले, ते आजपर्यंत टिकून आहे. अहमदशहाने जुनागडच्या हिंदू संस्थानिकाचा पराभव करून त्याला शरण आणले. मात्र त्याला पदच्युत न करता आपला मांडलिक म्हणून ठेवले.

पंधराव्या शतकात महमद बेगडा हा शक्तिमान व आक्रमक वृत्तीचा सुलतान गुजरातवर राज्य करू लागला. त्याने १४६७ मध्ये जुनागडच्या राजावर स्वारी केली. त्याला निमित्त कोणते मिळाले ? तर जुनागडचा राजा सोन्याची छत्री घेऊन सोमनाथची यात्रा करतो एवढेच. महमद बेगडा याने जुनागडला दोन वर्षे वेढा देऊन राजा राय मांडलिक याला पराभूत केले. राय मांडलिक याने सोमनाथला यात्रेला न्यावयाची सोन्याची छत्री महमद बेगडाला नजर केली. महमद बेगडाला खूश करण्यासाठी धर्मांतर करून तो मुसलमान झाला. इतकेच नव्हे, तर त्याने सोमनाथ मंदिरातील शिवलिंग हलवून त्या मंदिराचे पुन्हा मशिदीत रूपांतर केले. पण सोमनाथच्या परिसरात बहुसंख्य हिंदूच असल्याने अर्धे मंदिर व अर्धी मशीद अशा स्वरुपात या वास्तूचा प्रत्यक्ष वापर मशीद म्हणून झाला नाही. हिंदू लोकांनी आत शिवलिंग स्थापून त्याही परिस्थितीत शंभर वर्षांहून अधिक काळ सोमनाथचीच पूजा केली. मात्र सोळाव्या शतकात दिल्लीच्या तख्तावर सम्राट अकबरासारखा इतर धर्मांची बूज राखणारा शास्ता आल्यावर सोमनाथला उघड प्रतिष्ठा मिळाली. पुन्हा मोठ्या समारंभपूर्वक शिवलिंगाची प्रतिष्ठापना झाली आणि हे हिंदूचे मंदिर असे जाहीररीत्या मानले जाऊ लागले. १५७७ मध्ये अकबराच्या सुभेदाराने जुनागडचा ताबा घेतला तेव्हा हिंदूंना अकबरकडून हे अभय मिळाले. सोमनाथ मंदिर हे जुनागड परगण्यात येत असल्याने जुनागडच्या शासनकर्त्यांशी सोमनाथची व्यवस्था व स्वरूप नेहमीच, अगदी आतापर्यंत निगडित राहिले आहे.

दिल्लीच्या तक्तावर औरंगजेब आल्यावर त्याने काशी-विश्वेश्वरापासून सोमनाथपर्यंत अनेक मंदिरे पाडून त्या जागी मशिदी बांधण्याचे फर्मान काढले त्यावेळी मुहमद अझम हा गुजरातचा सुभेदार होता औरंगजेबचा सोमनाथवर एवढा राग होता की, त्याने महमद अझमला पाठविलेल्या फर्मानात म्हटले होते की, 'सोमनाथ मंदिर असे बेचिराख कर की ते पुन्हा कधीही उभे राहणार नाही' राजपुत्र महमद अझमने ही आज्ञा तंतोतंत पाळली त्याने सोमनाथवर हल्ला केला, शिवलिंग उखडून काढले आणि मंदिरावर पुन्हा मशिदीचा घुमट बांधून हिरवे निशाण रोवले पण मराठ्यांनी औरंगजेबास जेरीस आणले आणि अहिल्यादेवींने सहावे सोमनाथ मंदिर बांधले, ते १८७३ मध्ये.

पण मूळ भव्य मंदिर उद्ध्वस्तच होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर जुनागडचा नवाब महाबतखान याने पाकिस्तानात आपले संस्थान विलीन करण्याचा इरादा व्यक्त केला पण लोकमताच्या प्रचंड उठावामुळे त्याला पाकिस्तानात पळून जावे लागले आणि ९ नोव्हेंबर १९४७ रोजी जुनागडवर भारताचे निशाण फडफडले जुनागड भारतात विलीन होण्यास तयार असल्याचा टेलिफोन गृहमंत्री सरदार पटेल यांना जुनागडहून दिल्लीला आला तेव्हा के एम. मुन्शी त्यांच्याजवळ होते ही आनंदाची बातमी ऐकल्यावर श्री मुन्शी उत्स्फूर्तपणे म्हणाले, ''जय सोमनाथ,'' त्यानंतर सोमनाथच्या पुनरुज्जीवनाच्या महान पर्वाला प्रारंभ झाला

१२ नोव्हेंबर १९४७ रोजी दिवाळीच्या दिवशीच सरदार वल्लभभाई पटेल, काकासाहेब गाडगीळ आणि जामनगरचे जामासाहेब हे जुनागडला गेले. श्री काकासाहेब गाडगीळ यांनी या दोघांबरोबर सोमनाथला गेल्यावर सुचवले की सोमनाथ मंदिराच्या पुनरुद्धाराचे कार्य भारत सरकारने हाती घेतले पाहिजे. सरदार वल्लभभाई पटेल यांनी तात्काळ त्याला मान्यता दिली श्री मुन्शी यांनीही या सूचनेचा पाठपुरावा केला होता सोमनाथच्या भव्य मंदिरासमोरच्या पटांगणात यावेळी जाहीर सभा झाली श्री काकासाहेब गाडगीळ यांनी आवाहन केले, ''आता सोमनाथच्या विध्वंसाचे युग संपले असून पुनर्रचनेचे युग सुरू झाले आहे. हे मंदिर पुन्हा उभारून सोमनाथची प्राणप्रतिष्ठा करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला आहे जनतेनेही या कार्याला मदत करावी'' जामनगरच्या जामसाहेबांनी त्याच

दिवशी आपली एक लाख रुपयाची देणगी जाहीर केली सामळदास गाधी यानी जुनागडच्या प्रशासनाच्या वतीने ५१ हजार रुपयाची देणगी जाहीर केली. सरदार पटेल यानीही भारत सरकारचा हे मदिर पुन्हा बाधण्याचा निर्णय जाहीर केला

जानेवारी १९४८ मध्ये गुजरात साहित्य परिषदेचे अधिवेशन जुनागडमध्ये होते श्री मुन्शी हेच या संमेलनाचे अध्यक्ष होते त्यावेळी ते सोमनाथला गेले आता नवे मदिर उभारायचे ते आतरराष्ट्रीय कीर्तीचे, सोमनाथच्या हजारो वर्षांच्या परपरेला शोभणारे असे भव्य असले पाहिजे, असे त्यानी ठरवले सोमनाथचा पुनरुद्धार हे श्री मुन्शींनी आपले जीवितकार्य मानले होते सोमनाथाची प्राणप्रतिष्ठा हा त्यानी आपल्या प्रतिष्ठेचा प्रश्न केला आणि दोन महिन्यात पचवीस लक्ष रुपयाच्या देणग्या मिळविल्या या पुनर्रचना समितीत दोघे महाराष्ट्राचे होते एक काकासाहेब गाडगीळ आणि दुसरे सौराष्ट्राचे त्यावेळचे आयुक्त श्री दत्तात्रय वामन रेगे. नवे मदिर बाधण्यापूर्वी जुन्या मदिराचे जे अवशेष मातीत गाडले गेले होते, ते काढण्यासाठी उत्खननाचा विस्तीर्ण कार्यक्रम हाती घेण्यात आला

मूळ मदिराच्या जागीच नवे मदिर उभे करायचे होते त्यामुळे मूळ सोमनाथ मदिर नक्की कोठे आहे याचा शोध उत्खननाने घ्यावा लागला चाळीस फूट वाळू व जमीन खोदली, तेव्हा कुठे मूळ मदिराचा पाया लागला या पायाच्या खाली आणखी चार स्तर लागले प्रत्येक स्तराला गोमुख होते अखेर पूर्वी ज्या खोबणीत शिवलिंग बसविले होते ती खोबणी लागली, तेव्हा मूळ सोमनाथाची नक्की जागा सापडली म्हणून सयोजकांना अत्यानद झाला गाभाऱ्याच्या खुणाही त्याभोवती आढळल्या निरनिराळ्या देवता, देव, पशू, पक्षी याच्या काही भग्न तर काही अखड मूर्ती सापडल्या त्या मंदिराच्या नक्षीकामापैकी होत्या. दहाव्या व अकराव्या शतकातील वेषभूषा केलेल्या पौरजनाच्या मूर्तीही सापडल्या सुमारे आठशे वर्षे त्या मातीत गाडल्या गेल्या होत्या, त्यांना आता मुक्तता मिळाली वल्लभी कालखडातील एक शिलालेख सापडला. ब्रम्ही लिपीतील हा शिलालेख सहाव्या शतकातील होता गेल्या आठशे वर्षांत मदिराचा पाया खचला नव्हता गाभाऱ्याखाली तेरा फूट खोल ब्रम्हशिला सापडली आजूबाजूच्या भागातही इतर लहान-मोठ्या मदिराचे अवशेष वाळूत गाडलेले सापडले

गणपती मंदिरातील गणपतीची मूर्ती अखड आणि जराही धक्का न लागलेली अशी आढळली हा एक चमत्कारच बाकी सूर्य मदिर उद्‌ध्वस्त झाले असतानाही सुखकर्त्याची मूर्ती जशीच्या तशी होती

दरम्यान नव्या मदिरासाठी पाच फूट उंच शिवलिंग तयार करण्याचं काम मदिराच्या आवारात चालू होतं त्यासाठी रघुवीरशिळा या नावाने विख्यात असलेल्या शिळेची निवड करण्यात आली होती हा दगड निळसर काळा होता मदिराची उभारणी चालूच होती काही ठिकाणी मोगलानी लादलेल्या मशिदींचे घुमट लागले, ते काढून टाकण्यात आले एक मशीद तर सूर्यमंदिराच्या डोक्यावरच बांधण्यात आली होती । त्या घुमटाखाली मूळ सूर्यदेवाची मूर्ती आणि सूर्यमदिराचे अवशेष मिळाले. प्रभाशकर सोनपुरा यानी नव्या मदिराचे भव्य बाधकाम दोन वर्षांत पूर्ण केले श्री मुन्शी, सरदार वल्लभाई पटेल आणि श्री काकासाहेब गाडगीळ याची अशी जिद्द होती की, ज्या दिवशी गझनीच्या महमदाने मदिर उद्‌ध्वस्त करून शिवलिंग फोडले, त्याच दिवशी, त्याच वेळी सव्वानऊशे वर्षांनी नव्या मदिरात नव्या सोमनाथाची प्राणप्रतिष्ठा करायची जुनी कागदपत्रे पाहता ही तारीख व वेळ सापडली म्हणून ११ मे १९५१ रोजी सकाळी ९ वाजून ४६ मिनिटानी भारताचे राष्ट्राध्यक्ष ऋषितुल्य डॉ राजेद्रप्रसाद यांच्या शुभहस्ते नव्या सोमनाथाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली तेव्हा 'जय सोमनाथ' च्या गर्जनानी आकाश आणि सागर भरून गेले. सव्वानऊशे वर्षांचा अन्याय, कलक पूर्णपणे धुतला गेला आणि भारताचा रक्षक सोमनाथ पुन्हा आपल्या आसनावर विराजमान झाला

कोणत्याही महान कार्यात अडचणी येतात, तशा याही कार्यात आल्या या प्राणप्रतिष्ठेचा धार्मिक विधी शकराचार्यांच्या हस्ते करावयाचा होता पण हे मदिर अस्पृश्याना खुले राहणार असे कळल्यावर त्यावेळी त्यानी या कामास नकार दिला ! होमहवन व इतर धार्मिक विधी तर करायलाच हवे होते म्हणून धर्म व ज्ञानाच्या क्षेत्रातील शकराचार्यांच्या इतकेच अधिकारी असूनही पुढारलेल्या मताचे आचार्य केवलानंद सरस्वती याची निवड करण्यात आली ब्रम्हीभूत केवलानद सरस्वती यानी धार्मिक विधींचे नेतृत्त्व करण्याचे मान्य केले या विधीचे पौरोहित्य त्याचे शिष्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी याच्याकडे आले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी

म गांधींच्या मुलाच्या विवाहाचे पौरोहित्य पूर्वी केले होते इतिहासकाळी सोमनाथाच्या रक्षणास महाराष्ट्राने महत्त्वाचे योगदान दिले, तसेच वर्तमानकाळीही सोमनाथाच्या प्राणप्रतिष्ठेत महाराष्ट्राने सिंहाचा वाटा उचलला वेदमूर्ती काशिनाथ व दत्तभट महाबळेश्वरकर यानी प्रमुख ऋत्विज म्हणून कार्य केले प्राणप्रतिष्ठेच्या वेळी सर्व राजे, सरदार, लहान-मोठे नागरिक नम्रभावनेने, अपार श्रद्धेने, अनवाणी जमा झाले होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी याना पौरोहित्याबद्दल दहा हजार रुपये दक्षिणा आणि शाल मिळाली त्यानी सोमनाथाचा अनुग्रह म्हणून फक्त शाल ठेवून घेतली आणि दक्षिणा सोमनाथचरणी अर्पण केली

या प्राणप्रतिष्ठेच्या भव्य महोत्सवासाठी सप्तसागराचे पाणी आणले होते व तसेच जगातील सर्व महत्त्वाच्या नद्यांचे पाणी व त्या त्या देशातील माती आणली गेली होती त्याचे अवशेष व नमुने आजही सोमनाथ मदिराजवळच्या म्युझियममध्ये पाहायला मिळतात हे पाणी व माती निरनिराळ्या देशातील भारताच्या राजदूतानी पाठविले होते तेही अर्थातच सरकारी खर्चाने प नेहरू हे बुद्धिवादी होते त्याना राष्ट्राध्यक्षानी या कार्यात भाग घ्यावा व सरकारी खर्चाने परदेशातून पाणी व माती आणावी हे आवडले नाही मत्रिमडळाच्या एका बैठकीत प नेहरूनी या खर्चाला आक्षेप घेतला, तेव्हा श्री काकासाहेब गाडगीळ यानी त्याचे जोरदार समर्थन केले मत्रिमडळात या विषयावर चर्चा होऊन खर्चाला पूर्वसमती घेतली होती, हे त्यानी पूर्वीच्या नोंदीवरून दाखवून दिले मौलाना आझाद यानीही त्याना पाठिबा दिला शेवटी प. नेहरूनी तो खर्च मान्य केला

सोमनाथ मदिराच्या आवारातील पार्वती मदिर आजही भग्नावस्थेत आहे मदिरापासून म्युझियमच्या रस्त्यावर एका लहानशा उद्यानात सरदार वल्लभभाई पटेल याचा पुतळा आहे सोमनाथाचा जीर्णोद्धार सरकारतर्फे अधिकृतपणे करण्यासाठी सरदार पटेलानी जे धाडसी पाऊल उचलले त्यामुळेच आज सोमनाथाचे सातवे मदिर उभे आहे त्यामुळे सरदार पटेलाच्या पुतळ्याला या ठिकाणी विशेष महत्त्व आहे इतकेच नव्हे, तर त्यानी जुनागड सस्थानच्या विलीनीकरणासाठी जलद उपाययोजना केली नसती तर वेगळेच चित्र निर्माण झाले असते जुनागडच्या भारतीयाना वाचविण्याचे पुण्यकर्म केले ते गृहमत्री असलेल्या पोलादी पुरुषाने, सरदार

वल्लभभाई पटेल यांनी या पुतळ्यापासून जरा पुढे गेले की, लहानशा रस्त्यावरच प्रभासपट्टणचा भाजीबाजार भरतो त्याच्या मध्येच डाव्या हाताला वस्तुसग्रहालय आहे. सुरुवातीला कमान व पडीकशी वास्तू लागते. नतर एका विस्तीर्ण पटागणात सोमनाथच्या अनेक जुन्या मदिराचे अवशेष ठेवलेले आहेत आजच्या सोमनाथ मदिरातील शिवलिंगाच्या प्रतिष्ठापनेसाठी आणलेल्या पाण्यापैकी डॅन्यूब, हेन्स, गंगा, सिंधू, मिसिसिपी, सीन अशा अनेक नद्याचे उरलेसुरले पाणी बाटल्यांत भरून त्या त्या नद्याच्या नावासह येथे ठेवले आहे तसेच विविध देशाची मातीही काचेच्या बाटल्यात भरून ठेवली आहे

या वस्तूसंग्रहालयात जुन्या मदिराचे जे अवशेष आहेत त्यावर सागराच्या खाऱ्या पाण्याचा व शेकडो वर्षांच्या ऊन, पाऊस व वारे याचा परिणाम होऊन ते अशत· झिजून गेले आहेत. अनेक मूर्ती विध्वसकाच्या प्रहारानी खडित झाल्या आहेत सोमनाथ मदिराच्या उभारणीपूर्वी जे उत्खनन झाले त्यात सापडलेले हे अवशेष आहेत त्यात नक्षीचे दगड, कमानीचे दगड, देवदेवताच्या मूर्ती, पशुपक्ष्याच्या मूर्ती इत्यादींचा समावेश आहे नटराजाची मूळ अतिशय देखणी असलेली एक मूर्ती विध्वसकांनी भग्न केलेल्या अवस्थेत येथे पाहावयास मिळते या उत्खननात सापडलेले काही शिलालेखही या वस्तुसग्रहालयात ठेवण्यात आले आहेत नवव्या शतकातील एका शिलालेखात म्हटले आहे की, 'शंकराच्या आशीर्वादाने सोम (चद्र) विकास पावो' हे शिलालेख भद्रकाली मदिराच्या आवारात सापडले आहेत राजा कुमारपालाच्या काळातील अनेक शिलालेख येथे आहेत व त्यापैकी बहुतेकावर हे शिलालेख कोणी खोदले त्याची नावे आहेत

प्रभासपट्टणचा परिसर सोमनाथ मदिरामुळे सर्व हिंदूना वद्य आहेच, पण या परिसरात आणखी एक विशेष आहे तो म्हणजे श्रीकृष्णाचा अत येथे झाला लहानपणी खोड्या करणारा, दूध-लोणी चोरून खाणारा, तारुण्यात तारुण्यसुलभतेने वावरणारा, प्रौढपणी गीता सागणारा आणि अखेर मरण आल्यावर ते नियतीचे देणे देणारा कृष्ण हा आपला जिवलग मित्र आहे श्रीमती दुर्गा भागवत यानी म्हटले आहे की, 'व्यासाच्या प्रतिभेने ज्या भव्य व जिवत व्यक्तिरेखा भक्ताच्या मनावर कोरून ठेवल्या, त्यात कृष्ण ही

सर्वात मध्यवर्ती आकृती आहे' (व्यासपर्व, पृ २१) त्या त्या वयाला साजेशा सर्व गोष्टी सर्वसामान्य माणसाप्रमाणे करूनही अलौकिक असलेला कृष्ण हा पूर्ण पुरुष आहे. कृष्ण बालगोपालातला आहे, आपल्याला जवळचा आहे सरस्वतीने हाती अवघड वीणा घेतली, पण श्रीकृष्णाने गुराख्याचा लाकडी पावा घेतला आणि त्यात जगाला मोहित करणारे स्वर भरले. रामाने महायुद्ध केले, लढाया तर अनेक केल्या, पण भारतीय महायुद्धात श्रीकृष्णाने 'न करि शस्त्र धरी मी' असे सागूनही सपूर्ण युद्धाचा कर्ता करविता तोच राहिला

कितीही खटाटोप केला तरी नियती कोणाला चुकवता येत नाही, हेच श्रीकृष्णाने जगाला दाखवून दिले

भारतीय युद्धात पाडव विजयी झाले, पण सुखी झाले नाहीत, कृष्णाने डावपेच करून युद्ध जिंकले आणि कौरव कुळाचा नाश केला, याचा विखार गाधारीच्या पोटात धुमसत होता म्हणून कृष्ण जेव्हा युद्धसमाप्तीनतर तिच्याकडे गेला तेव्हा गाधारीने शाप दिला, 'कौरवाचा जसा पूर्ण नाश झाला, तसा तुझ्या यादव वशाचा होईल' श्रीकृष्णाने ही शापवाणी ऐकून घेतली हे असे व्हायचेच ही नियती होती आता नियतीने अताचा फक्त मार्ग शोधायचे काम राहिले होते

हा मार्ग यादवाच्या उद्दामपणाने दाखवला अखेरच्या दिवसात यादवांनी आपसात भाडून एकमेकाची कुचाळकी, ज्येष्ठ ऋषिमुनींची कुचेष्टा यातच वेळ घालविला श्रीकृष्णाचा मुलगा साब गोजीरवाणा होता तेव्हा यादवांनी त्याला गर्भार स्त्रीचे कपडे चढवले त्याला घेऊन ते विश्वामित्र, दुर्वास इत्यादी ऋषींच्याकडे गेले. मोठ्या मानभावीपणाने यादवानी या ऋषीना विचारले, ''या गर्भार मुलीला मुलगा होईल की मुलगी ?'' त्यातील कोणतेही उत्तर दिले तरी ऋषीवचन खोटे व्हावे व ऋषींची टिंगल करता यावी, हा यादवाचा डाव होता पण त्रिकालदर्शी मुनींनी ही कुचेष्टा ओळखली ही मुलगी नसून मुलगा आहे हेही ओळखले त्यानी शाप दिला, ''हिला मुसळ होईल हे मुसळ यादव कुळाचा सर्वनाश करील'' ऋषीच्या वाणीतील तेजाची यादवाना कल्पना होती ते अत्यत भयभीत झाले सांबाला जेव्हा ऋषींच्या शापामुळे मुसळ झाले, तेव्हा यादवानी त्या मुसळाचे तुकडे केले, मग त्याची भुकटी केली आणि ती समुद्रात टाकली.

हेतू हा की आता मुसळापासून आपल्याला धोका नसावा मात्र मुसळाच्या वर जे लोखडी कडे होते त्याची भुकटी न करता ते नुसते चेपून त्यानी समुद्रात टाकले पण तरीही नियतीने आपले काम केलेच हे चेपलेले मुसळाचे कडे एका माशाने गिळले तो मासा एका भिल्ल शिकाऱ्याने पकडला. तेव्हा त्याच्या पोटातून हा तुकडा निघाला

भिल्ल.ने लोखंडी तुकड्याचा फाळ केला आणि तो बाणाच्या टोकाला लावला यावेळी यादवाच्या कलहाला कटाळून श्रीकृष्ण द्वारकेहून प्रभास तीर्थाला आले होते. यादव आळशी, मद्याच्या आहारी आणि कलहप्रिय झाले होते, हे श्रीकृष्णाला त्यांचा कटाळा येण्याचे कारण होते सोमनाथपासून काही अतरावर नदीकाठी एका पिंपळाच्या झाडाखाली श्रीकृष्ण विश्रांती घेत होते त्यानी एक पाय वर दुमडला होता व त्यावर दुसरा पाय आडवा ठेवला होता याच वेळी तो भिल्ल शिकारीसाठी बाहेर पडला होता लाबून श्रीकृष्णाचा गुलाबी तळवा हरणाच्या डोळ्यासारखा दिसला. त्याने माशाच्या पोटात सापडलेला लोखडी फाळाचा बाण अचूक नेम धरून मारला. तेव्हा बाण श्रीकृष्णाच्या तळव्याला लागून ते भयकर जखमी झाले शिकार घेण्यासाठी म्हणून भिल्ल धावत त्याच्याजवळ आला, तेव्हा आपल्या हातून प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्यावर बाण सुटला हे पाहून तो पश्चातापदग्ध झाला त्याने हात जोडून श्रीकृष्णाची क्षमा मागितली

श्रीकृष्ण म्हणाले, ‘हे सर्व नियतीच्या नियमाला अनुसरूनच झाले. हे असेच घडायचे होते मी जेव्हा रामजन्म घेतला, तेव्हा तू वाली होतास मी तुझा नाहक वध केला होता रामजन्मातच मी तुला वचन दिले होते की, कृष्णजन्मात माझा वध तुझ्या हातून होईल. हे भिल्ला, माझ्यावर बाण मारणे ही तुझी चूक नसून मी पूर्वजन्मात केलेल्या नाहक हत्येचे हे प्रायश्चित्त तू मला दिले आहेस तू केवळ नियतीच्या हातातील खेळणे आहेस तुला क्षमा करणारा मी कोण ?’’

ज्या जागेवर श्रीकृष्णाला भिल्लाचा बाण लागला ती जागा भालक तीर्थ म्हणून प्रसिद्ध आहे श्रीकृष्ण जखमी झाल्याचे अर्जुनाला कळताच तो तेथे आला त्याने श्रीकृष्णाला जवळ हिरण्य नदीच्या काठी पिंपळाच्या झाडाखाली आणले श्रीकृष्णानी त्याच ठिकाणी देहत्याग केला. ही जागा देहोत्सर्ग म्हणून प्रसिद्ध आहे दुर्गा भागवत यानी श्रीकृष्णाच्या देहत्यागाचे

अत्यंत काव्यमय शब्दात मूल्यमापन केले आहे ' या अनासक्त योगेश्वराला उचित मरण समाधीचे ! पण याही पारंपरिक भूमिकेचा त्याने त्याग केला त्याला मरण आले विजनात व्याधाचा बाण लागून मुलगा, सवगडी, भाऊ, वादक, प्रियकर, योद्धा, पती, राजकारणपटू, वक्ता, तत्त्वज्ञ या साऱ्या भूमिकांत अपरंपार रस ओतून कृष्णाने शेवटी या साऱ्याची परमावधी साधा माणूस म्हणून मरण पत्करण्यातच गाठली ! डुकराचे मांस खाल्ल्याने अतिसार झाल्यामुळे गौतम बुद्धांना मरण आले यातही सामान्य मानवाच्या शरीराची नियती योगात सिद्धी मिळविलेल्याच्याही वाट्याला येते, हेच आढळून येते तीच कथा कृष्णाच्या लीन मरणाची' (व्यासपर्व, पृ २५)

अर्जुनाने श्रीकृष्णाचा पार्थिव देह जेव्हा चितेवर ठेवला तेव्हा कृष्णाचे हातपाय जळून गेले कारण त्यांनी पुण्य केले होते बाकीचे धड तसेच राहिले ते हिरण्य नदीस अर्पण करण्यात आले यादवेश्वराचाच अंत झाला, मग यादवांचे काय ? कलहप्रिय यादवांना श्रीकृष्णाने प्रभासतीर्थात स्नान करण्याची आज्ञा केली होती त्याप्रमाणे यादव द्वारकेहून प्रभासला आले तेथे त्यांचा काळ त्यांची वाटच पाहात होता कारण यादवांनी मुसळाचे जे चूर्ण समुद्रात टाकले होते ते यादवांचा नाश करण्यासाठी प्रभासच्या किनारी एकवटले होते यादव प्रभासतीर्थाच्या यात्रेत भरपूर मद्य प्याले आणि विश्रांतीसाठी समुद्राच्या किनाऱ्यावर आले तेथे लव्हाळी उगवली होती. यादवांनी आपसात भांडणे सुरू केली. एका यादवाने लव्हाळे उपटले तेव्हा ऋषींच्या शापाने मुसळाचे जे चूर्ण पाण्यात मिसळले होते त्याने त्या लव्हाळ्याचे शस्त्र झाले आधीच यादवांत कलह त्यात आता ही आयती शस्त्रे हाती आली यादवांनी लव्हाळ्यांची झालेली शस्त्रे घेऊन एकमेकांवर वार केले आणि त्यातच यादवकुळाचा अंत झाला

सोमनाथापासून तीन किलो मीटर्सवर आजही भालकतीर्थ पाहायला मिळते तेथे भिल्लाचे मंदिर आहे या मंदिरात श्रीकृष्ण झाडाच्या बुंध्याला टेकून पडलेले असून त्यांच्या तळव्याला भिल्लाचा बाण लागला आहे, असे दृश्य दाखवणारी मूर्ती आहे शेजारीच क्षमा-याचना करणारा भिल्लही आहे. मंदिराचे आवार विस्तीर्ण व स्वच्छ आहे या आवारात मंदिराजवळ एक मोठा पिंपळवृक्षही आहे या ठिकाणाहून देहोत्सर्ग हे ठिकाण सोमनाथच्या

दिशेला एक किलो मीटरवर आहे देहोत्सर्गवर एका झाडाखाली, हिरण्य नदीच्या काठी श्रीकृष्णाच्या सगमरवरी पादुका आहेत जवळच लक्ष्मी-नारायण मदिरही आहे. बलराम गुफेत बलरामाची मूर्ती आहे या ठिकाणी बलरामाचे निधन झाले बलराम हा शेषाचा अवतार असल्याने त्याने या बलराम गुफेत माणसाचा अवतार सपवून शेषाच्या रूपाने पाताळात गमन केले, असे तेथील पुजाऱ्यानी सांगितले. जवळच एक खोल भुयार आहे त्या भुयारातून बलराम शेषाच्या रूपात पाताळात गेला, असे पुजारी सांगतात. . . सोमनाथ व देहोत्सर्ग याच्यादरम्यान शंकराचार्यांचे शारदापीठ आहे या मठात आद्य शकराचार्यांचे छायाचित्र आहे. वेदपठण व इतर धार्मिक कृत्ये या मठात चालतात.

अशा तीर्थक्षेत्रांच्या भेटीने सर्वांनाच काही ना काही लाभ होतोच. अशा स्थळांशी ज्या महामानवाचे जीवन व कार्य निगडित आहे त्याचे स्मरण व चिंतन करण्याची सधी व सवड अशा ठिकाणी मिळते आपल्या दैनदिन, रूक्ष जीवनातील हा मोठा स्फूर्तिदायक निवारा आहे, यात शका नाही

❑

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भ-प्रवास
दा. क्र. ८५८
२८९४८
शाखा

# ९. सुदामनगरी आणि बेटद्वारका

वेरावळहून पोरबंदरला सुमारे साडेचार तासांनी पोचता येते. शहरात जात असतानाच जाणवते की, पोरबदर हे अत्यत स्वच्छ व प्रसन्न असे गाव आहे सुरुवातीलाच एक बाजूला एका मोठा कारखाना आहे. दुसऱ्या बाजूला अथांग समुद्र आहे रस्त्यापासून चार फूट उचीवर दहाबारा अत्यत देखणे असे बैठे बगले आहेत त्याच्यासमोर झाडे व लहानशा बागा आहेत. अशा निवात, सुदर बगल्यात राहणे किती सुखद असेल, किती मौज येईल असा विचार मनात येतो सहकारी सर्किट हाऊसचे हे बगले आहेत

पोरबदर हे पुराणकाळी व आधुनिक काळी दोन महापुरुषामुळे प्रसिद्ध आहे भगवान श्रीकृष्णाचा गरीब मित्र सुदामा याचे हे गाव. श्रीकृष्णाचा काळ पाच हजार दोनशे वर्षांपूर्वीचा मानला जातो त्यानतर एकदम एकोणिसाव्या शतकात, १८६९ साली म गांधींचा जन्म याच पोरबदर शहरात झाला थोडा गमतीचा योगायोग म्हणजे पाच हजार वर्षांहून अधिक वर्षांचे अतर या दोघा महापुरुषात असूनही या दोघाचा वेष अगदी शभर टक्के सारखा । पचा, हातात काठी आणि एक जानवे एवढ्याच त्याच्या वेषाच्या खुणा सुदाम्याचे मूठभर पोहे हजारो वर्षे गाजत आहेत तर गाधीजींनी उचललेल्या मूठभर मिठाने सबध ब्रिटिश साम्राज्य हादरून टाकले त्याकाळी हे गाव सुदामपुरी या नावाने ओळखले जात असे. आता पोरबदर या गावाजवळच्या खाडीत पोरवाई देवीच्या मदिराचे जुने अवशेष सापडले. ते सुमारे हजार वर्षांपूर्वीचे असावेत गावकऱ्यांनी तीच ग्रामदेवता मानून गावाचे नाव पोरबदर असे ठेवले.

गावातील सुदाम मदिर फार भव्य नाही दगडी नक्षीकामाचा सरजामही नाही गरीब सुदाम्याला शोभणारे असे हे मदिर आहे त्यात सुदामा व त्याची पत्नी याच्या मूर्ती आहेत पण त्या मुख्य मूर्ती नाहीत. कारण सुदामा हा श्रीकृष्णाचा मित्र व भक्त म्हणून राधाकृष्णाच्या मूर्ती मुख्य आहेत भजनकीर्तनासाठी गरूड मडप आहे मंदिरासमोर मोठे आवार आहे मदिराची परिस्थितीही सामान्यता काहीशी दुर्लक्षित अशी आहे

सोमनाथ, तिरूपती, मीनाक्षी अशा सधन मंदिरांपैकी हे सुदाम मंदिर नाही. तरीपण आपल्या पुराणग्रंथातील अमर मित्रप्रेमाची कथा या मंदिरामुळे उजळली जाते. श्रीकृष्ण द्वारकेला राज्य करीत असताना त्याचा बालमित्र सुदामा हा या गावी राहत होता दारिद्र्याचे कढ अगदीच असह्य झाले, तेव्हा सुदाम्याची पत्नी सुदेष्णा त्याला म्हणाली, 'द्वारकेचा राजा श्रीकृष्ण हा तुमचा मित्र. त्याला भेटून तुम्ही काही मदत मागा तरच आपले दारिद्र्य दूर होऊन आपण पोटभर जेवू शकू' बायकोच्या म्हणण्याप्रमाणे सुदामाने द्वारकेला जायची तयारी केली इतक्या वर्षांनी मित्राला भेटायला जायचे तर रिकाम्या हातानी कसे जायचे ? म्हणून काही भेटवस्तू देता येईल का असा विचार सुदेष्णा करू लागली. पण घरात फुटकी कवडीही नव्हती होते फक्त चार मुठी पोहे ते तिने पतीच्या फाटक्या उत्तरीयात बाधून दिले सुदामा ते घेऊन द्वारकेला गेला श्रीकृष्णाने आपल्या बालमित्राचे हार्दिक स्वागत केले स्वत: स्वभक्तीने सुदाम्याचे पाय धुतले त्याला उत्तम मेजवानी दिली सुदाम्याने प्रेमाने दिलेले पोहे श्रीकृष्णानी अत्यंत आवडीने खाल्ले पण सुदामा इतका भिडस्त होता की ज्यासाठी त्याने एवढ्या लांबचा प्रवास केला, ते काम सांगण्याचे धाडस काही त्याच्याने झाले नाही श्रीकृष्णाने आपल्याला काही मदत करावी हे सांगण्यास त्याला संकोच वाटला श्रीकृष्णाचा पाहुणचार घेऊन तो आपल्या गावी आला आता बायको आपल्याला दोष देईल या काळजीत तो आपल्या घराजवळ आला पण तेथे त्याची जुनी पडकी झोपडी त्याला दिसेना त्याऐवजी त्या जागी एक सोन्याचा भव्य प्रासाद उभा होता इतक्या श्रीमंती वाड्यात शिरण्यास त्याला भीती वाटू लागली तोच त्याची पत्नी सुदेष्णा आतून आली आणि म्हणाली, 'अहो हेच आता आपले घर. तुमच्या मित्राने-श्रीकृष्णाने-आपल्या आयुष्याचे सोने केले'

मराठीतील आद्य विनोदी लेखाचा संग्रह 'सुदाम्याचे पोहे' या नावाने श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यानी लिहिला आहे याचीही आता या मंदिराच्या पायरीवर बसल्या बसल्या आठवण होते ज्या ठिकाणी पुराणकाळी सुदाम्याची झोपडी, त्याच जागेवर हे मंदिर बांधले गेले आहे असे तेथील लोक सांगतात

पोरबदरचे मुख्य आकर्षण म्हणजे म  गाधींचे कीर्तिमदिर. या शहरातील सुदामा आणि म  गाधी हे दोन कीर्तिमान महापुरुष होते, पण या दोघातील आर्थिक परिस्थितीत जमीन-अस्मानाचे अतर होते  सुदामा हा गरीब होता तर गांधीजींचे वडील हे पोरबदरचे दिवाण असल्याने ते गर्भश्रीमत होते. कीर्तिमदिर ही गाधीजींच्या घराला जोडून बाधलेली इमारत अलीकडची म्हणजे १९५० सालची आहे. गाधीजींच्या वडिलाचे घर २०९ वर्षांचे जुने असले तरी तीन मजली व प्रशस्त आहे  या घरात २१ खोल्या आहेत. गांधीजींचे वडील करमचद हे पोरबदरचे दिवाण होते  तेव्हा या घरात ४५ लहानमोठ्या व्यक्ती राहत होत्या  या घराच्या देवघरात दशावतारांचे शभर वर्षांपूर्वीचे चित्र आजही पाहावयास मिळते  जवळच कस्तुरबाचे घर आहे  त्याचे वडील पोरबदरचे नगरशेठ होते  या दोन धनाढ्य व बड्या घरचा लग्नसबध जुळून आला, तेव्हा गाधीजींचे वय तेरा वर्षांचे व कस्तुरबांचे तेरा वर्षांचेच पण थोडे दिवस अधिक होते. या घरात ज्या खोलीत गाधीजींचा जन्म झाला, तेथे स्वस्तिक काढलेले असून सूत काढत असतानाचे गाधीजींचे एक छायाचित्र आहे  एका भिंतीवर गाधीजींचे वडील करमचद व आई सौ  पुतळाबाई याची छायाचित्रे आहेत.

गाधीजींचा अशा भव्य स्मारकाला विरोधच होता  म. गाधी हे पुणे येथे आगाखान पॅलेसमध्ये बदिवासात असताना पोरबदरचे एक श्रमिक व राष्ट्रभक्त व्यापारी श्री  नानजीभाई मेहता यानी ही स्मारकाची कल्पना मांडली  त्यासाठी त्यानी चार लक्ष रु  ची देणगी दिली पण गाधीजींची अनुमती मिळेना. तेव्हा त्याच्या निकटवर्तीयांनी गाधीजींना सागितले की, हे स्मारक बाधून गाधीजींचा गौरव करावा असा उद्देश नाही, तर गाधीजींचे जन्मस्थान सुरक्षित राखावे, गांधीजींच्या विचारांचा सग्रह असणारे ग्रथालय ठेवावे व लोकाना त्यामुळे राष्ट्रभक्तीची प्रेरणा मिळावी हा या स्मारकाचा उद्देश आहे  अखेर गाधीजींनी परवानगी दिली  १९४७ साली दरबार गोपाल दास याच्या हस्ते पायाभरणी झाली व १९५० साली सरदार वल्लभभाई पटेल याच्या हस्ते कीर्तिमदिराचे उद्‌घाटन झाले  गाधीजींचे आयुष्य ७९ वर्षांचे होते, त्याचे स्मारक म्हणून हे ७९ फूट उंचीचे शिखर बाधले आहे



गाधीजींचे स्मारक

गाधीजींच्या जन्मजागी त्याचे काही स्मारक असावे ही त्याच्या अनुयायाची इच्छाही रास्तच होती ही स्मारकाची इमारत सगमरवरी असून पुढील भव्य कमानीतून आत शिरल्यावर एक प्रशस्त चौक लागतो त्याच्या बाजूना अठ्ठावीस सगमरवरी कोरीव काम केलेले स्तभ आहेत त्यातील एका खाबावर 'वैष्णव जन तो तेणे कहिये' हे गाधीजींना अत्यत आवडणारे नरसी मेहताचे भक्तिगीत कोरले आहे. आत ग्रथालय असून त्यात गाधीजींचे साहित्य आहे एका मदिराच्या आकाराच्या मखरात म. गाधी व कस्तुरबा याची छायाचित्रे आहेत. गाधीजींचे अनुयायी श्री मगनलाल गाधी आणि चिटणीस श्री देवभाई देसाई याची स्मारके तळमजल्यावरच्या

दोन खोल्यात आहेत

वाधेरा भागात पोरबदरचे प्लॅनिटोरियम आहे त्यासमोरच भारतमाता मदिर आहे पोरबदर येथील भारतमाता मंदिर हे लक्षात राहण्यासारखे व वैशिष्ट्यपूर्ण मंदिर आहे बनारस येथेही मी एक भारतमाता मदिर पाहिले होते. त्यात भारताचा एक मोठा 'रिलीफमॅप' उंचसखल प्रदेश दाखविणारा नकाशा आहे एवढेच बनारसचे हे भारत मंदिर अतिशय दुर्लक्षित व पडझड झालेले काहीसे केविलवाणे दिसणारे आहे पोरबंदर त्याच नावाचे मदिर मात्र अत्यत स्वच्छ, नीटनेटके, विविधतापूर्ण व सपत्र आहे या मंदिरातही भारताचा रिलीफ मॅप आहे, पण सभोवती देशाच्या निरनिराळ्या भागातील साधूसत, नेते, आध्यात्मिक क्षेत्रातील कार्यकर्ते, योद्धे याचे पुतळे व चित्रे आहेत ती अविस्मरणीय आहेत. विक्रमादित्य, परशुराम, योगी अरविंद, छ. शिवाजी महाराज, चितोडचा राणा प्रताप, राम, श्रीकृष्ण, कालडी येथील आद्य शकराचार्य, रामकृष्ण परमहस, रामदास, नरसी मेहता, सुदामा, भगवान बुद्ध, सत तुकाराम, कस्तुरबा, म गाधी, जिजामाता, कौसल्या, महारथी कर्ण, श्रद्धानद, खडानंद यांच्या अतिशय सुदर प्रतिमा या मदिरात आहेत विशेष म्हणजे पुराणातील किंवा इतिहासातील या महान व्यक्ती भारताच्या कोठल्या भागातून आल्या, हेही लिहिले आहे उदा अयोध्या-कौसल्या तसेच काशी, अयोध्या, द्वारका इत्यादी तीर्थक्षेत्राची चित्रे व सतवचनेही येथे आहेत. मदिराचे आवारही मोठे असून तेथे पटागण व लहानसे उद्यान आहे. त्यामुळे आध्यात्मिक कार्याला योग्य असे हे स्थळ झाले आहे.

बेट द्वारका हे सौराष्ट्रातील एक महत्त्वाचे तीर्थस्थान आहे ते ओखा बदराजवळ आहे हे गाव नावाप्रमाणेच एक बेट असल्याने तेथे नावेतून जावे लागते आपल्याकडील नृसिंहवाडीसारखे हे गाव आहे. देवस्थानजवळचे दृश्य नेहमीचेच आहे. माळा, फुले, हळद, कुकू, गुलाल, बुक्का, प्रसाद, देवाला घालण्यासाठी वस्त्रे, मेवामिठाई याची सातआठ दुकाने आहेत मदिराचे व मूर्तीचे फोटोही तेथे विक्रीसाठी असतात

पन्नास वर्षांपूर्वी श्रीमती सीताबाई गाडगीळ यानी महाराष्ट्रातून द्वारकेचा प्रवास केला होता त्यांनी बेट द्वारकेचे वर्णन करताना 'चित्रमयजगत्' मध्ये लिहिले आहे, ''बेट द्वारकेला मधोमध श्रीकृष्णाचे

मदिर असून भोवती जाबुवती, राधिका, सत्यभामा वगैरे पट्टराण्याची मदिरे आहेत त्या सर्वांच्या पाकशाळा वेगळ्या असून आळीपाळीने प्रत्येक पट्टराणीकडून देवाला नैवेद्य पोचविला जातो. एका दिवसास असे तेरा नैवेद्य येतात नैवेद्य नेण्यासाठी एक ब्रम्हचारी ब्राम्हण आहे तो हातात गोठ, पाटल्या घालून व डोकीवरून पदर घेऊन देवाच्या मदिरात नैवेद्य घेऊन जातो मग अर्धा तास देवाचा दरवाजा बद असतो शेवटचा नैवेद्य जांबुवंतीकडून येतो तो बटा व दुधाचा पेला जवळ ठेवतात. रात्री देवाला भूक लागली तर ही तरतूद उपयोगी पडावी असा त्यात उद्देश असतो.''

सुप्रसिद्ध लेखिका श्रीमती दुर्गाबाई भागवत या फार वर्षांपूर्वी मिठापूरला होत्या त्याचे वडील मिठापूर येथे टाटा कंपनीत काम करीत होते ओखा बदर बाधायचे म्हणून त्या जमिनीवर पहिली कुदळ मारली ती वडिलानी त्यावेळी हा भाग अगदी ओसाड होता कपनीचे कर्मचारी व बदराच्या बाधणीसाठी असणारे मजूर एवढीच लोकवस्ती होती

बेट द्वारकेत रणछोडरायचे मदिर दुकानापासून पाव फर्लांगपर्यंत आहे कच्छच्या खाडीत हे बेट आहे याची वस्ती साडेबारा हजार आहे त्याला बेट द्वारका किंवा बेट शखोद्धार असेही म्हणतात ब्रम्हदेवाच्या मुखातून वेद बाहेर पडले, तेव्हा शंकासूर नावाच्या राक्षसाने ते वेद मधल्यामध्ये काढून घेतले आणि देवाची धर्मकृत्ये होऊ नयेत म्हणून त्याने वेद समुद्राच्या तळशी लपवून ठेवले देवाना वेद मिळाले नाहीत व त्यांना धार्मिक कृत्ये करता येईनात, म्हणून देवानी ब्रम्हदेवाकडे तक्रार केली ब्रम्हदेवाने विष्णूचा धावा केला तेव्हा विष्णूने मत्स्यावतार घेऊन समुद्रातून वेद बाहेर काढले. हे वेद या ठिकाणी बाहेर काढले गेले म्हणून या बेटाला शंखोद्धार म्हणतात श्रीकृष्णाचा पुत्र प्रद्युम्न याने या शखासुराचा वध केला व या बेटावर वस्ती केली या बेटावर राधेचे मदिर आहे या बेटाचा आकारही शखासारखा आहे म्हणून त्याला शखोद्धार असे नाव पडले, अशी एक उपपत्ती आहे यादव जेव्हा श्रीकृष्णाच्या आज्ञेवरून द्वारका सोडून प्रभासपट्टणला सोमनाथाच्या यात्रेसाठी गेले, तेव्हा त्यानी सरक्षणासाठी आपल्या बायका व मुले या बेटावर ठेवली होती

बेट द्वारकेवरील मुख्य मदिर रणछोडरायाचे आहे श्री वल्लभाचार्यांजी याचा जन्म १५३५ मध्ये झाला ३५ व्या वर्षी ते बेट द्वारकेला आले व

त्यानी हे रणछोडरायाचे मदिर बाधले ज्या जागेवर हे मदिर बाधले आहे त्या जागेवर श्रीकृष्णाचे अत पूर होते सवत् १७८० मध्ये जामनगरच्या महाराजांनी बेट द्वारकेवर सत्यभामा मंदिरानजीक बालमुकुद प्रभूंचे मदिर बाधले तसेच त्यानी लक्ष्मी मदिराजवळ राधेचे मदिर बाधले बेट द्वारकेवर गेल्या तीनशे वर्षांत २० विष्णूमंदिरे, २७ महादेव मदिरे, ८ हनुमान मदिरे व कुशेश्वर नीलकठ, धिंगेश्वर, कपिलेश्वर अशी एकदर ८० च्या वर मदिरे आहेत त्यात सर्वात प्राचीन मदिर शखोनारायणाचे आहे पण मुख्य रणछोडरायाचे व इतर दोनतीन सोडली तर बाकीची मदिरे पडीक अवस्थेतील व दुर्लक्षित अशी आहेत

बेट द्वारकेचे रणछोडरायाचे मदिर भव्य आहे मदिराच्या लाकडी भागांना भडक रग आहेत गाभाऱ्यात रणछोडरायाची सुबक मूर्ती आहे ती सुमारे अडीच फूट म्हणजे मदिराच्या विस्ताराच्या मानाने लहानच आहे ती काळ्या पाषाणाची उभी मूर्ती आहे तीवर राजवस्त्रे चढवलेली असतात. मदिराच्या आवारात लक्ष्मी, जांबुवंती, सत्यभामा, राधा अशी इतर अनेक लहान मदिरे आहेत शेजारच्या माडीवर 'सोन्याची द्वारका' म्हणून जे दृश्य आहे, त्यात सोनेरी रंगाच्या इमारती व मूर्तींच्या प्रतिकृती आहेत सत्यभामेचा महाल, दुर्वास ऋषी, राम, सीता, हनुमान, अर्जुन, लक्ष्मीनारायण इत्यादींच्या मूर्तीही आहेत. तळमजल्यावर राजभाग भाडार आहे, तेथे रणछोडरायाची वस्त्रे व इतर वस्तू ठेवण्यात येतात.

❑

# १० श्रीकृष्णाची द्वारका

हजारो वर्षांची परंपरा असलेल्या द्वारकेसारख्या तीर्थक्षेत्रात आल्यावर एक अद्‌भुत आनद होतो कारण राधेपासून सत मीरेपर्यंत आणि आद्य शकराचार्यांपासून ज्ञानेश्वर- तुकारामासारख्या शेकडो संतमहतांनी पवित्र केलेल्या मार्गावरून आपण जात आहोत ही अभिमानाची जाणीव होते. हे महात्मे आणि आपण सर्वसामान्य ससारी लोक याच्यात काही दुवा सापडतो, त्याच्याशी जवळीक मागण्यास आपण धजू शकतो या सतांत कबीर, गुरू नानाक, नरसी मेहता, रामानुजाचार्य असे विविध धर्मांचे अनुयायी आहेत आणि ते सर्व 'परमेश्वर एकच आहे' या भावनेने द्वारकाधीशाला शरण जात आहेत. आधुनिक जगात असूनही द्वारका शेदोनशे वर्षांपूर्वीच्या पढरपूर किंवा देहू-आळदीसारखी वाटते. याच द्वारकेत कृष्णाचा गरीब मित्र सुदामा फाटक्या पचातून दोन मुठी पोहे घेऊन आला असेल, याच द्वारकेच्या मदिरात सत मीरा कृष्णभजन करताना अनंतात विलीन झाली कृष्णभक्त बोडाणाने इथूनच कृष्णाची मूळ मूर्ती डाकोरला नेली, या विचाराने आपण भारावून जातो. एखादी वास्तू अविस्मरणीय होते, ती तिच्याशी निगडित असलेल्या आठवणींनी शिवछत्रपतींचा राज्याभिषेक जेथे झाला व मृत्यूही जेथे झाला, तो रायगड इतर किल्ल्यासारखाच एक किल्ला पण हे दोन महान प्रसंग त्याच्याशी निगडित झाले म्हणून त्या दगडा-मातीच्या वास्तूला चिरतनत्व प्राप्त झाले.

या सुवर्ण नगरीचा इतिहास मन पटलापुढे तरळू लागतो हिंदूना सात मोक्षदायक गावे (पुरी) व चार पवित्र धामे आहेत ती म्हणजे १. अयोध्या, २ मथुरा, ३ मायावती, ४ काशी, ५ कांची, ६. अवतिका व ७ द्वारका तसेच बद्रिनाथ, जगन्नाथ, द्वारका व रामेश्वर ही ४ धामे या दोन्हीतही द्वारकेचा समावेश होतो श्रीकृष्णाने कसाचा वध केल्यानतर मथुरा ही राजधानी केली, पण जरासध व कात्यायन यांच्या मथुरेवर वारवार स्वाऱ्या होऊ लागल्या म्हणून श्रीकृष्ण आपल्या यादवाच्या सेनेसह रेवाटाऊ पर्वताकडे गेले. त्या पर्वताच्या पायथ्याशी त्यांनी विश्वकर्म्याकडून

द्वारकानगरी वसवली असे पुराणात म्हटले आहे द्वारावती, द्वारिका, वनमालिनी इत्यादी नावाने ही नगरी तेव्हा ज्ञात होती या नगरीभोवती उच्च व चुन्याने रंगवलेले तट होते व या तटाना अनेक दारे होती म्हणून या नगरीचे नाव द्वारिका असे पडले. या तटाजवळ सरक्षणासाठी खदक होते व तटावर तोफा, चक्रे वगैरे शस्त्रास्त्रेही होती असे 'हरिवशा'त वर्णन आहे त्या काळी द्वारकेचा विस्तार शभर योजने होता (एक योजन म्हणजे चार कोस किंवा नऊ मैल) या धनाढ्य नगरीत अनेक श्रीमत सावकार राहत व त्याच्या वाड्याचे कळसच सोन्याचे किंवा सोनेरी होते म्हणून तिला 'सोन्याची द्वारका' हे नाव पडले यादवामध्ये कलह माजल्यावर त्याच्या पापाचा अतिरेक झाला म्हणून श्रीकृष्ण द्वारकेहून प्रभासतीर्थाला (सोमनाथ) गेले व तेथेच त्याचा अत झाला त्यानंतर सागराने द्वारका नगरी बुडविली श्रीकृष्णाचा नातू वज्रनाथ याने पुन्हा द्वारका उभारली, तीच आजची द्वारका आहे असे पुराणाभिमानी लोक मानतात पण आधुनिक उत्खननात सापडलेल्या पुराव्यानुसार आजची द्वारका ही तिसरी आहे

पुणे येथील डेक्कन कॉलेजचे तज्ज्ञ डॉ. ह धी साकलिया याच्या मार्गदर्शनाखाली गुजरात सरकारने १९६३ मध्ये द्वारकेत मोठ्या प्रमाणावर उत्खनन केले त्या उत्खननात असे आढळून आले आहे की द्वारकेत किमान दोन हजार वर्षे लोकवस्ती आहे इ स च्या आरभापूर्वी येथील समुद्रानजीकच्या खडकावर लोक राहत होते. पण सागराच्या आक्रमणाने ही पहिली द्वारका बुडाली तेथील इमारतीवर वीस फूट उचीचा वाळूचा थर बसला या थरावर पुन्हा लोकवस्ती झाली या लोकाचा ग्रीकाशी संबध आला होता ग्रीक लोक जहाजामार्गे येथे येऊन गेले होते त्याचा पुरावा म्हणजे ग्रीसमधील मद्याचे चषक व इतर भाडी येथील उत्खननात सापडली आहेत पण ही द्वारकाही कालातराने नष्ट झाली आठव्या शतकात याच जागेवर पुन्हा तिसरी द्वारका उभारली गेली. पूर्वीच्या ठिकाणीच उभारली गेली येथे केलेल्या उत्खननात वीस ते तीस फूट खोलीवर मदिरे व घरे याचे अवशेष सापडले आहेत

द्वारकेच्या त्रैलोक्यसुदर जगन्मदिराचा इतिहास इ. स पूर्व १४०० पासून सुरू होतो. या वेळी वज्रनाथाने आपल्या आजोबाच्या स्मरणार्थ येथे


हरिमदिर व छत्री बांधली इ स पूर्व १०० मध्ये या मदिराचा पूर्वेकडचा भाग बाधला गेला या भागात सापडलेल्या ब्राम्ही भाषेतील शिलालेखात तसा उल्लेख आहे त्यानतर तीनशे वर्षांनी मूळ छत्रीखाली श्रीकृष्णाची मूर्ती स्थापन करण्यात आली. इ स. आठशे मध्ये आद्य शकराचार्यांनी द्वारकामदिराचा जीर्णोद्धार केला तसेच त्यांनी मदिरात आदिशक्तीची स्थापना केली उत्खननशास्त्रातील ज्येष्ठ तज्ज्ञ श्री साकलिया यांनी असे सिद्ध केले आहे की, इ. स. ८०० ते ९५० पर्यंत द्वारकेतील श्रीकृष्ण मदिर उभे होते पण पुढे ते पडू लागले नंतर इ स. ११२० मध्ये मीनलदेवींनी या मदिराचा जीर्णोद्धार केला. इ स. ११५२ मध्ये उदयपूरचा राजा भीमासिंह याने या मदिराच्या व्यवस्थेसाठी सात हजार बिघे जमीन दिली व मदिराची डागडुजी केली इ स ११५६ मध्ये भक्त बोडाणाने मंदिरातील मूर्ती डाकोराला नेली. त्याचे नाव विजयसिंह असे होते.

या स्थलातराची कथा अतिशय रोमाचकारी आहे डाकोर हे गाव बडोद्यापासून चाळीस मैलावर आहे तेथे बोडाणा नावाचा श्रीकृष्ण भक्त राहत होता तो दरवर्षी डाकोरहून अडीचशे मैलावरच्या द्वारकेला दर्शनासाठी जात असे पण तो बहात्तर वर्षांचा झाला तेव्हा थकला त्यावर्षी तो द्वारकेला जाऊ शकला नाही म्हणून अत्यत दु:खी झाला, पण श्रीकृष्णाने त्याला दृष्टात दिला, ''यापुढे तुला द्वारकेचा लाबचा प्रवास करावा लागणार नाही मीच तुझ्याजवळ येऊन राहीन तू बैलगाडी घेऊन ये मी त्या गाडीतून डाकोरला येईन'' भक्त विजयसिह बोडाणाने घरदार विकून बैल व गाडी खरेदी केली. भगवानाची मूर्ती नेण्यासाठी बोडाणा येत आहे असे द्वारकेच्या श्रीकृष्ण मदिरातील पुजाऱ्याना कळले, तेव्हा मंदिराची दारे बद करून, दरवाजाना मोठमोठी कुलपे लावून ते रात्रदिवस पहारा करीत राहिले पण त्या सर्वांना चुकवून श्रीकृष्ण मदिरातून बाहेर आले व रात्री भक्त बोडाणाच्या गाडीत बसून डाकोरला आले. सकाळी पुजाऱ्याना मूर्ती नाहीशी झालेली दिसली तेव्हा ते तातडीने डाकोरला गेले. बोडाणाने मूर्ती गोमती नदीत लपवली. तेव्हा सतापलेल्या पुजाऱ्यानी बाण मारून बोडाणाचा अत केला त्याबरोबर नदीतील मूर्तीच्या अगाला बाणाच्या जखमा झाल्या व नदीचे पाणी रक्ताच्या रंगाचे झाले. श्रीकृष्णाने बोडाणाच्या पत्नीला दृष्टात दिला व सागितले, ''द्वारकेचे पुजारी लोभी झाले आहे

म्हणून त्याना सोडून मी येथे आलो आहे. तू त्याना मूर्तीच्या वजनाइतके सोने दे म्हणजे ते परत जातील व मग माझी मूर्ती नदीतून काढून तिची डाकोरमध्ये प्रतिष्ठापना कर.''

बोडाणाच्या कानात एका कर्णफुलाशिवाय इतर काहीही नव्हते पण श्रीकृष्णाच्या कृपेने त्या लहानशा कर्णफुलाचे वजन मूर्तीच्या वजनापेक्षा अधिक भरले ते कर्णफूल हा दैवी प्रसाद मानून पुजारी ते घेऊन द्वारकेला गेले व नवी मूर्ती त्यानी मंदिरात स्थापन केली मूळ मूर्ती डाकोर येथे राहिली अजूनही डाकोर हे एक परमपवित्र व जाज्वल्य धर्मक्षेत्र आहे इ स १२४१ मध्ये अहमदाबादच्या महंमदशहाने द्वारकाधीश मदिर फोडले व उद्ध्वस्त केले त्या वेळी त्याच्या सैनिकाच्या बरोबर लढताना पाच पुजारी मरण पावले त्याची समाधी नतर मदिराजवळच बाधली गेली. इ स १५०४ मध्ये श्रीवल्लभाचार्यांनी या मंदिरात श्रीद्वारकाधीशाची मूर्ती स्थापन केली इ स १५५८ मध्ये शकराचार्यांनी मंदिराचा विस्तार करून काही नव्या मूर्तीची स्थापना केली. १७३० मध्ये मदिर पुन्हा मोडकळीस आले तेव्हा शकराचार्य श्रीपरमानद यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला दरम्यान, इग्रजांच्या हल्ल्यात मदिराची बरीच पडझड झाली म्हणून १८५१ मध्ये खडेराव महाराजानी मदिराची दुरुस्ती केली १९०३ मध्ये बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजानी जगन्मदिरावर सोन्याचा कळस चढवला. १९६५ च्या भारत-पाक युद्धाच्या वेळी एक पाकिस्तानी युद्धनौका द्वारकेजवळ आली आणि तिने मदिराच्या दिशेने तोफा डागून मदिरे उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. पण भारतीय नौदलाच्या जागरूकतेमुळे त्या युद्धनौकेला पळ काढावा लागला १९५० पासून भारत सरकारने मदिराची दुरुस्ती करून नवा भव्य मडप बाधण्याचे काम केले आहे.

द्वारकाधीश मदिराकडे जाणारा रस्ता लहानच आहे, पण काशीच्या विश्वेश्वर मदिराकडे जाणाऱ्या बोळकडयाइतका लहान नाही मदिराबाहेर भव्य व उच कमान आहे तेथून मात्र मदिराचा आपल्यावर प्रभाव पडू लागतो मदिराच्या आवारात शिरता शिरताच श्रीकृष्ण आणि शकर याच्याविषयीची एक पुराणकथा आठवते श्रीकृष्णाला उद्धव विचारतो, ''शकर हा कफल्लक देव, पण त्याचा भक्त रावण हा महाप्रतापी, वैभवसपन्न



**द्वारकाधिशाचे मंदिर**

राजा तू मात्र सर्व भोग व ऐश्वर्य भोगणारा असून तुझे भक्त मात्र दरिद्री. असे का ?''

श्रीकृष्ण म्हणाले, ''शंकराने रावणाला सपत्ती आणि ऐश्वर्य दिले पण त्याचा परिणाम काय ? तर रावण उन्मत्त झाला त्याने सर्व देवांना बंदिवासात ठेवले रामाची पत्नी नेली ऐश्वर्याची हीच अखेर असेल तर माझ्या भक्ताना ऐश्वर्य नको. त्यांना दारिद्र्य आणि दु:ख मिळाले तरच ते मोक्षाचा मार्ग शोधतील आणि परम सुखाचे धनी होतील सपत्ती आणि ऐहिक सुखे ही भक्ताच्या आणि देवाच्या आड येत असतात'' या कथेने आपल्याला एक महान विचार दिला आहे या जाणिवेनेच आपण द्वारकाधीश मदिराची भव्य, रक्तवर्णीय कमान ओलाडतो या कमानीला मोक्षद्वार हे सार्थ नाव आहे. कारण द्वारकेच्या श्रीकृष्णाचे दर्शन मिळणे हा मोक्ष आणि तिकडे नेणारे हे मोक्षद्वार

जगत्मदिर किंवा द्वारकाधीश मदिराजवळ आद्य शकराचार्यांनी स्थापन केलेले शारदापीठ आहे. या पीठात शकराचार्यांच्या पादुका आहेत केरळमधील कालाडी आणि केदारनाथ अशी आद्य शकराचार्यांचा जन्म व निर्वाण याची दोन ठिकाणे मी पाहिली आहेत, त्याची या वेळी मला आठवण झाली आद्य शकराचार्यांचे जीवन अवघे बत्तीस वर्षांचे. पण या लहानशा वयात त्यानी अद्भुत कार्य केले प जवाहरलाल नेहरू यानी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' मध्ये त्यांच्या कार्याविषयी म्हटले आहे-

''त्यानी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतचा भारतवर्ष एकसध केला आणि हिदू धर्माच्या अतूट धाग्यानी समाजाला एकत्र आणले अनेक जन्मात होणार नाही अशी अफाट कामगिरी शकराचार्यांनी अवघ्या बत्तीस वर्षात करून दाखविली देशाच्या चार दिशाना चार मठ स्थापून त्यानी हिंदू धर्माची पताका फडफडवत ठेवली, ती आजही कायम आहे.'' शकराचार्य लहानपणापासून प्रखर बुद्धिमत्तेचे होते पाचव्या वर्षी त्याची मुज करून विद्याभ्यासासाठी गुरूगृही पाठविण्यात आले तेथे फक्त तीन वर्षांत त्यानी वेद, तत्त्वज्ञान, व्याकरण, तर्कशास्त्र, पुराणे इत्यादी आत्मसात केली नतर त्यानी गोविंदाचार्य मुनींच्याकडून सन्यासाची दिक्षा घेतली आणि अद्वैत मताच्या प्रचारार्थ भारतभर दौरा केला त्या वेळी हिदू धर्मावर अनेक सकटे आली होती सम्राट अशोक, कनिष्क, हर्षवर्धन या राजानी बौद्ध धर्मावर अनेक प्रसार चालू केला होता, त्याशिवाय जैन, निरिश्वरवाद, शक्तिपंथ, गाणपत्य असे अनेक धर्म व पंथ उदयाला आलें होते. शकराचार्यांनी या सर्व

हिंदूविरोधी मताचे वादविवादात खडन केले त्यात मंडनमिश्र व शकराचार्य याच्यातील वाद विशेष महत्त्वाचा आहे मडनमिश्र हे बौद्ध धर्माचा प्रसार करणारे होते या वादात मडनमिश्राची विद्वान पत्नी सरस्वती हीच न्यायाधीश म्हणून होती तिने या वादात मडनमिश्र हरल्याचे जाहीर केले पण हिचा अभिमान जाज्वल्य होता पती हरल्यानतर स्वत· सरस्वतीने शकराचार्यांबरोबर वाद केला त्यात ती हरली तेव्हा तिने जलसमाधी घेतली. मडनमिश्रानी शकराचार्याचे शिष्यत्व पत्करले शकराचार्यांनी त्यांचे नाव सुरेश्वराचार्य असे ठेवले आणि याच शारदापीठाचे पहिले अधिपती म्हणून त्याना अधिकार दिले या पीठात सस्कृत अकादमी, भारतीय सशोधन मदिर, वेदभवन, कला महाविद्यालय, आयुर्वेदीय दवाखाना इत्यादी लोकोपयोगी सस्था चालविण्यात येतात.

जगत्‌मदिराची शैली समिश्र आहे हिंदू, बौद्ध व जैन अशा त्रिविध शैलींचा हा मनोरम सगम आहे जगत्‌मदिर हे पिवळसर धुरकट रगाच्या दगडांचे बाधले आहे ७२ नक्षीदार बळकट स्तभावर हे उभे आहे सभामडप व गर्भगृह असे मदिराचे दोन भाग आहेत गोमती नदी जेथे समुद्रास मिळते, त्या सगमावर समुद्रासपाटीपासून चाळीस फुटावर हे मदिर बाधले आहे ते पश्चिमाभिमुख आहे सध्याचे मदिर अकबरकालीन असावे (१६ व्या शतकाच्या आसपासचे), असा तज्ज्ञाचा अंदाज आहे या जगत्‌मदिराची उची २५७ फूट आहे त्याचे शिखर शभर फूट उचीचे आहे व त्यावर ६५ फुटाचा ध्वजदड आहे त्यामुळे खूप लाबूनही मदिराचे शिखर व ध्वज दिसतो दरवर्षी मकर सक्रातीला ध्वज बदलण्यात येतो मंदिराची पूर्व-पश्चिम लाबी नव्वद फुटाची व रुदी ७२ फूट आहे या जगत्‌मदिराभोवती कोट आहे त्याला दोन दारे आहेत ते दक्षिणेस गोमती नदीच्या किनाऱ्याला लागून आहे त्याला ५६ पायऱ्या आहेत त्याला स्वर्गद्वार म्हणतात उत्तरेचा दरवाजा मोक्षद्वार म्हणून ओळखला जातो सभामडपाला साठ खाब आहेत कालियामर्दन, रासक्रीडा, अर्जुनाला रणागणावर कृष्ण गीता सागत आहे इत्यादी चित्रे या सभामडपात आहे हा सभामडप आठ मजली उच आहे चौथ्या मजल्यावर शक्तिमातेचे मदिर आहे जेव्हा द्वारका बुडाली तेव्हा मजला पाण्याखाली बुडाला होता असे सागण्यात येते. पाचव्या मजल्यावरील लाडव मदिर मात्र पाण्यावर राहिले

होते पाचव्या मजल्यावरून सुदर विहंगमदृश्य दिसते त्यात एका बाजूला अथाग सागर व दुसऱ्या बाजूला द्वारकानगरी दिसते. जगत्मंदिराच्या तुलनेने द्वारकेतील इतर सर्व इमारती अगदी बुटक्या दिसतात.

गर्भगृहाचा दरवाजा चादीचा आहे. आत द्वारकाधीश कृष्णाची मूर्ती आहे. ही मूर्ती सव्वादोन फूट उचीची व काळ्या गंडकी पाषाणाची आहे या चतुर्भुज मूर्तीच्या हाती गदा, चक्र, शंख व पद्म आहेत. ही मूर्ती डुंगरपूरहून आणली आहे द्वारकाधीश मदिराच्या आवारात लक्ष्मी-नारायण, नृसिंह, महिषासुर मर्दिनी, ब्रह्मा, सावित्री इत्यादींच्या मूर्ती व लहान मंदिरेही आहेत दिल्ली, मथुरा इत्यादी भागातील मदिरातील मूर्तींच्या मानाने बेट द्वारका व द्वारका यातील मूर्ती लहान आहेत

आपण स्वर्गद्वाराच्या पायऱ्या उतरून गेलो की गोमती नदीचा घाट लागतो या घाटावर सगम नारायण, चक्रनारायण, गोमतीमाता, श्यामलाक्ष भगवान इत्यादी मदिरे आहेत. त्यात सगम नारायणाचे मदिर विशेष लक्षणीय आहे. गोमती नदी आणि समुद्र यांच्या संगमाचे ते प्रतीक आहे द्वारकेतील इतर मदिरात सूर्यमदिर व कुकलास कुड याना खास महत्त्व आहे सूर्य मदिर हे यादवांच्या सूर्यभक्तीचे निदर्शक आहे कुकलास कुडात स्नान केल्याने नागराजाला मोक्ष मिळाला अशी या कुंडाची पार्श्वभूमी आहे सिद्धेश्वर महादेव, गोपी तलाव, नागेश्वर महादेव ही द्वारकेच्या परिसरातील इतर तीर्थस्थाने आहेत.

द्वारकाधीशाची पहिली मगलारती सकाळी सात वाजता होते. त्यानतर लगेच ७। वाजता दूध व लोणी याचा भोग होतो ८ ते ९ पर्यंत अभिषेक पूजा व ९ ते ९।। पर्यंत शृगारदर्शन, नतर अभिषेक भोग, शृंगारभोग, राजभोग हे दुपारी १२ पर्यंत चालतात. मग बंटाभोग होऊन १२-३० वाजता दर्शन बद होते सायकाळी ५ वाजता उत्थापन दर्शन, उत्थापन भोग, सध्या भोग होऊन रात्री ७।। ते ७।।। पर्यंत सध्यारती होते. ८।। ते ८।।। पर्यंत शयनआरती व बटा भोग होऊन रात्री ९।। वाजता दर्शन बंद होते कृष्णाष्टमी हा मुख्य उत्सव असतो

ज्या दगडानी जगत्मंदिर बाधण्यात आले आहे, तो दगड त्या भागात समुद्रकाठी विपुल प्रमाणात सापडतो. तो खोदण्यास आदर्श असा मऊ आहे पण खारा वारा व पाऊस यामुळे तो झिजतो त्यामुळे मंदिराची वारंवार

डागडुजी करावी लागते. श्रीकृष्णाच्या द्वारकेपूर्वी या ठिकाणी चक्रतीर्थ नाथाची नगरी होती आजही द्वारकेत समुद्र जवळ असूनही गोड्या पाण्याच्या विहिरी आहेत या विहिरी श्रीकृष्णकालीन आहेत, असे सांगण्यात येते.

द्वारकाधीश मंदिराखेरीज या पवित्र ठिकाणी इतरही अनेक प्रसिद्ध मदिरे आहेत कुशेश्वर महादेव मदिर हे त्यांपैकीच एक. कुश नावाच्या दैत्याने द्वारकेवर स्वारी केली, तेव्हा विष्णूने त्याचा पराभव केला, कुश दैत्याला पाताळात गाडले आणि ज्या जागेवर महादेवाची प्रतिष्ठापना केली. म्हणून हे कुशेश्वर महादेव मंदिर उदयास आले काशीविश्वनाथ मदिर ही काशी येथील विश्वनाथ मदिराची प्रतिकृती आहे प्रद्युम्न मदिर हे कामदेवाचे मदिर आहे प्रद्युम्नाला शांबर नावाच्या दैत्याने लहानपणीच पळवून नेले होते. पण प्रद्युम्नाने तरुणपणी दैत्याचा नाश केला व मायावतीला घेऊन द्वारकेला आला. तिच्याशी विवाह करून प्रद्युम्न येथेच राहिला पुराणातील प्रसिद्ध उषा-अनिरुद्ध कथेतील अनिरुद्धाचे येथे मदिर आहे बाणासुराची मुलगी उषा हिच्याशी त्याने विवाह केला व तो द्वारकेत राहिला अनिरुद्ध हा श्रीकृष्णाचा पणतु. त्याची पत्नी उषा हिच्या नावावरून ओखा हे नाव अपभ्रंश होऊन आले असावे असा काही तज्ज्ञाचा अदाज आहे दर तीन वर्षांनी एकदा येणारा अधिक मास हा भारतीय पंचागात पुरुषोत्तम मास म्हणून प्रसिद्ध आहे. या पुरुषोत्तमाचे मदिर द्वारकेत आहे सत्यभामा मदिराची कथाही पुराणात आहे

मुख्य द्वारकाधीश मदिरासमोर श्रीकृष्णाची आई देवकी हिचे मदिर आहे. त्याच मंदिरात दर्शनमडपाच्या एका भागात श्रीकृष्णाचा भाऊ बलराम याचे मंदिर आहे राधा-कृष्ण मदिर हे राधेच्या एकनिष्ठ भक्ताचे प्रतीक आहे माधवरायजी मदिर हे श्रीकृष्णाचेच मदिर आहे नूतनपरिणित जोडपी येथे श्रीकृष्णाचा आशीर्वाद घेण्यासाठी येतात गुरुदत्तात्रय मदिरात दत्ताची मूर्ती आहे गिरिनार पर्वतावर दत्ताच्या पादुकाची पूजा होते तर येथे दत्ताच्या मूर्तीची पूजा करण्यात येते. जाबुवतीच्या मदिरात जाबुवतीची मूर्ती आहे याशिवाय लक्ष्मी, सरस्वती, लक्ष्मीनारायण, त्रिविक्रमजी, कोळवा भगत, दुर्वास इत्यादी अनेक मदिरे द्वारकेत आहेत

द्वारकेचे रुक्मिणी मदिर हे श्रीकृष्णाच्या जगत्मदिराजवळ नाही तर येथून दीड किलोमीटर अतरावर एकाकी आहे. भागीरथी गगा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समुद्राच्या खाडीच्या काठावर हे लहानसे पश्चिमाभिमुखी मदिर आहे श्रीकृष्णाच्या आठ राण्यापैकी रुक्मिणी ही पट्टराणी तरीही हिचे मदिर इतके दूर का असा साहजिकच प्रश्न पडतो. तेथील पुजारी त्याची पार्श्वभूमी सागतात, ती अशी ·

श्रीकृष्णाच्या सर्व राण्यात आपला अग्रक्रम आहे याचा रुक्मिणीला गर्व झाला हिचा हा गर्व नाहीसा करण्यासाठी कृष्णाने कोपिष्ट दुर्वास मुनींचे साहाय्य घेतले कृष्ण व रुक्मिणी यानी दुर्वासाना जेवणाचे निमत्रण दिले. त्या वेळी दुर्वास ऋषी म्हणाले,

''तुम्ही दोघे माझा रथ ओढणार असाल तर मी येईन. रथ वाटेत कोठे थाबता कामा नये''

दोघानीही ही अट मान्य केली दुर्वास ऋषी रथात बसले कृष्ण व रुक्मिणी रथ ओढू लागले काही अतर गेल्यावर नाजुक रुक्मिणी दमली तिला तहान लागली व ती थाबली कृष्णाने पायाचा अंगठा जमिनीत रुतवला व पाणी निर्माण केले रुक्मिणीने पाणी घेतले पण तोपर्यंत रथ थाबून राहिला म्हणून शीघ्रकोपी दुर्वास ऋषींनी तिला शाप दिला-

''मला न विचारता तू रथ थाबवलास. याचे प्रायश्चित म्हणून तू बारा वर्षे कृष्णापासून दूर राहा व तपश्चर्या कर'' रुक्मिणी मग या ठिकाणी कृष्णापासून दूर येऊन राहिली व तिचा अहकार गेला.

कृष्ण व रुक्मिणी याचा विवाह या ठिकाणी झाला असे सागून तेथील पुजारी सप्तपदीचा चौथरा व तोरणाचा मडप दाखवितात हा मडप साडेसहा फूट उच आहे चार लांब चौरस खाबावर आधारलेला आहे त्याची लाबी नऊ फूट व रुदी पाच फूट आहे जवळच रुक्मिणीचा भाऊ रुक्मी याचे व हनुमानाचे मदिर आहे. रुक्मिणी मदिराचे गर्भागार बारा फूट रुद व बारा फूट लाब असे चौकोनी आहे रुक्मिणीच्या मूर्तीचे आसन भद्रपीठ घाटाचे असून त्याची उची तीन फूट व लाबी दहा फूट आहे. त्याखाली विविध देवाची शिल्पे आहेत वर अर्धवृत्ताकार छत व मध्यभागी पद्मशिलाची रचना आहे दाराच्या मध्यभागी गणेश मूर्ती व दोन्ही बाजूना उपासक युगले आहेत. मंदिराच्या भिंतीवरील शिल्पे अत्यत प्रेक्षणीय व

देखणी आहेत गर्भगृहाच्या पूर्वेस नरसिंहाची सत्रपाद अवस्थेतील सुदर मूर्ती आहे. दक्षिणेस अष्टभुजा वैष्णवीची मूर्ती आहे स्थापत्य शास्त्रज्ञांच्या मते हे रुक्मिणी मंदिर बाराव्या शतकात बाधले गेले असावे. मात्र गर्भगारातील रुक्मिणीची मूर्ती अर्वाचीन काळातील आहे ही मूर्ती चतुर्भुज आहे. रुक्मिणीचे हे मदिर साधे, काहीसे दुर्लक्षित व द्वारकाधीश मदिराच्या तुलनेने जवळजवळ नगण्य वाटते. पण त्याचा महिमा पुराणकालातील सदर्भामुळे मोठा आहे बरेच यात्रेकरू गावापासून इतक्या लाब येण्याचे टाळतात, त्यामुळे रुक्मिणी मंदिराचे उत्पन्न कमी आहे व देखभालही यथातथातच आहे. द्वारकाधीशाच्या वैभवाच्या तुलनेत त्याच्या पट्टराणीचे हे मदिर उपेक्षित व काहीसे केविलवाणे वाटते द्वारकेपासून पाच किलो मीटर्सवर साबलक्ष्मणाचे मदिर आहे ते राम-लक्ष्मण मंदिर या नावानेही ओळखले जाते ते समुद्रकाठी आहे या प्राचीन मदिराचे नक्षीकाम अतिशय सुदर आहे त्याला गर्भगृह, मडप व घुमट आहे पण मुख्य जगत् मदिरापासून लांब असल्याने रुक्मिणी मदिरापेक्षाही हे अधिक उपेक्षित आहे

रुक्मिणी मदिर, जगत मदिरे यांच्यामध्ये गीता मदिर आहे हे बिर्ला यांनी बाधले आहे त्यात श्रीकृष्ण अर्जुनाला गीता सागत आहेत व अर्जुन कृष्णचरणी बसून श्रवण करीत आहे अशा मूर्ती आहेत. मंदिराच्या भिंतीवर गीतेतील अठरा अध्यायातील निवडक भाग कोरला आहे मदिराच्या आवारात सुदर उद्यान असून, सपूर्ण आवार स्वच्छ व नीटनीटके ठेवले आहे. त्यामुळे तेथील वातावरण पवित्र व प्रसन्न आहे. गुजरातच्या समुद्रकिनारी वेरावळ, पोरबदरप्रमाणेच द्वारकेलाही दीपगृह आहे द्वारकेचे दीपगृह सव्वाशे फूट उंच आहे, तीस किलो मीटरपर्यंत त्यातील दिव्यांचा प्रकाश दिसू शकतो जहाजाना मार्गदर्शन हा त्याचा एक उद्देश आहेच. पण हा किनारा पाकिस्तानपासून जवळ असल्याने संरक्षणाच्या दृष्टीने हे दीपगृह महत्त्वाचे आहे.

❑

# ११. जामनगर आणि सुरत.

द्वारकेहून जामनगर हे अंतर १४८ किलो मीटर्सचे आहे. जामनगरच्या प्रेक्षणीय स्थळात सर्वात महत्त्वाचे व मशहूर ठिकाण लखोटा पॅलेस व रजमल तलाव हे आहे हा तलाव म्हणजे जामनगरचे मध्यवर्ती ठिकाण व प्रमुख आकर्षण आहे. रजमल तलाव हा सुदर व विशाल असून मध्यभागी लखोटा किल्ला आहे दोन्ही बाजूनी हा वाडा दगडी पुलानी काठाला जोडला आहे जामनगर हे शहर ४५० वर्षांपूर्वी जामसाहेबांनी वसवले. याची आखणी उत्तम शहररचनाकारानी केलेली असल्याने शहराला चागले रग, रूप व आकार आहेत, याची एक साक्ष म्हणजे हा तलाव व त्यातील किल्ला विशेषत: चांदण्या रात्री हा अतिशय काव्यमय दिसतो लखोटा किल्ल्याजवळच शस्त्रास्त्राची कोठी आहे तसेच तलावाच्या मध्यभागी वस्तुसंग्रहालय आहे त्यात सौराष्ट्रातील कलात्मक वस्तू आहेत जुन्या मूर्ती, सौराष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण वस्त्रे, वीणकाम-भरतकामाचे नमुने, चिनीमातीची नक्षीदार भाडी इत्यादींचा हा सग्रह आहे. ९ ते १८ या शतकातील काही शिल्पे विशेष लक्षात राहण्यासारखी आहेत घुमली, घोटेलिया, पोछावर या खंड्यांतील उत्खननात या वस्तू सापडल्या आहेत. तलावाच्या काठी प्रशस्त असे सत्यनारायण महादेव मदिर आहे. जवळच बालाजी हनुमान सकीर्तन मदिर व श्रीकृष्ण मंदिर आहे. सध्याकाळी तलावावरून थंड वारे येत होते व त्यात या अखड भजनाचा प्रासादिक आवाज उत्साह आणतात याच तलावाच्या काठी जामसाहेबाचा सोनेरी रंगाचा पुतळा आहे तलाव व वाडा यावर नजर ठेवणारा हा पुतळा प्रभावी वाटतो या पुतळ्यावर महाराजाचे नाव असे घालण्यात आले आहे- 'श्रीमन्महाराज जामश्री ७ रणजितसिंह महोदय.' त्याच्या राज्य शासनाच्या रौप्यमहोत्सवानिमित्त १९३८ साली हा पुतळा बसविण्यात आला आहे

जामनगर ही नवानगर सस्थानाची राजधानी नवानगर हे सौराष्ट्रातील महत्त्वाचे संस्थान होते ज्युवेल ऑफ काठेवाड हे सार्थ नाव त्याला होते. या शहरात इतकी मंदिरे आहेत की 'छोटी काशी' या नावानेही ते ओळखले

जाते त्यात भीडभजन महादेवाचे देवालय ख्यातनाम आहे तसेच चांदी बाजारमधील जैन मदिर हे उत्कृष्ट जैन शिल्पकलेचा नमुना आहे जामनगरच्या महाराजांचा विभ्रा विलास पॅलेस किंवा जाम बगलाही वास्तुशिल्पकलेच्या दृष्टीने उत्तम आहे. पण बडोद्याच्या किवा राजस्थानच्या काही राजवाड्याचा काही भाग प्रेक्षकांना पाहावयास मिळतो तसा तेथे खुला नसल्याने उत्सुक प्रेक्षकांची निराशा होते. अशीच निराशा करणारे आणखी एक स्थळ म्हणजे सोलेरियम सूर्यप्रकाशाच्या साहाय्याने उपचार करण्याची प्रयोगशाळा म्हणून हिची जाहिरात करण्यात येते. जामनगरला जरीकाम केलेल्या साड्या, गालिचे व नक्षीचे अडकित्ते भरपूर व विविध प्रकारचे मिळतात

जामनगरच्या स्मशानाला 'मुक्तिधाम' असे नाव देण्यात आले आहे जुनागडच्या स्मशानाप्रमाणेच हेही सुंदर व प्रसन्न असे ठेवण्यात आले आहे. श्रद्धानद, रामकृष्ण परमहंस, योगी अरविंद, रवींद्रनाथ टागोर, रामानुज, म गांधी, राणाप्रताप, छ. शिवाजी महाराज इत्यादी साधुसत व राष्ट्रपुरुष याचे पुतळे येथे आहेत छ शिवाजी महाराजाचे वर्णन 'हिंदुराष्ट्र प्रणेता, महाराष्ट्र केसरी,' असे केलेले आहे या 'मुक्तिधाम' मध्ये भगवान बुद्धाचा एक पुतळा असून त्यामागील गोलाकार कमानीवर 'जन्म, शिक्षण, विवाह, वैभव, वृद्धावस्था व मृत्यू' मानवाचे 'ससारचक्र' काढण्यात आले आहे. स्मशानात अनेक मदिरे आहेत त्यात काशीविश्वेश्वर मदिर विशेष लक्षात राहते

क्रीडाक्षेत्रात जामनगरचे प्रिन्स रणजी याच्यामुळे हे गाव कीर्तिवान झाले आहे प्रिन्स रणजी हे आतरराष्ट्रीय कीर्तीचे क्रिकेटियर होते त्यांचा जन्म १८७२ मधील. ते मूळ राजघराण्यातील नव्हते. पण नवानगरच्या महाराजांनी त्याना दत्तक घेतल्याने ते राजपुत्र झाले राजकोटमध्ये ते राजकुमार कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते तेव्हाच क्रिकेटचा त्यांना छंद लागला व नतर त्यानी अतिशय श्रम घेऊन या छदाची जोपासना केली क्रिकेट हे त्याचे जीवनसर्वस्व झाले कसोटी सामन्यात इग्लडबरोबर खेळणारे पहिले भारतीय म्हणून ते क्रिकेटच्या इतिहासात अमर झाले आहेत त्यानी एकदर २४,६९२ धावा काढल्या त्यापैकी १४ द्विशतके व एकदर ७२ शतके होती. रणजी १९३३ साली जामनगर येथे निधन पावले.

त्यांच्या सन्मानार्थ अद्यापही रणजी करंडक सामने चालतात.

सुरत हे गुजरात मधील एक महत्त्वाचे शहर आहे औरंगजेबनंतर दिल्लीची हुकमत दुर्बळ झाली व तिचा साहजिकच परिणाम सुरतवर होऊन तेथील नबाबही निष्प्रभ झाले कारण दिल्लीचा पाठिंबा हाच त्यांचा हुकमी एक्का होता. दिल्लीच्या तख्तासाठी यादवी माजल्यावर सुरतच्या नबाबला कोण विचारतो ? १७५९ साली मियाँ अच्चन हा सुरतचा नबाब झाला आता जमीन मऊ आहे हे ओळखून इंग्रज पूर्वी आपल्या वखारीपुरतेच सीमित होते, त्यानी साहस करून सुरतच्या किल्ल्यावर हल्ला केला व त्यावर आपले निशाण रोवले नबाब मियाँ अच्चनचाही झेंडा किल्ल्यावर होता हे दोन्ही झेडे एकाच वेळी फडकत असले तरी नबाब उतरणीवर आहे व इग्रज चढणीवर आहेत याची सुरतच्या जनतेला पूर्ण कल्पना होती यावेळी सुरत समृद्ध होते त्याची लोकसख्या सात लाख होती. भव्य प्रासाद, उद्याने, पेढ्या, दुकाने यानी सुरतची भरभराट सिद्ध होत होती. त्या वेळी बक्षी, शेख, काझी, सिद्दी, एड्रूस ही विविध जातींची घराणी मालदार म्हणून प्रसिद्ध होती भयाराम भन्साळी, लक्ष्मीदास, बुलाचद या पेढ्या मोठ्या मातबर होत्या मोदी, रुस्तुम, हिरजी, वाच्छा, धनशा, नेकशतखान ही पारशी कुटुंबं धनाढ्य व धर्मपरायण म्हणून प्रसिद्ध होती सुरत हे तेव्हा लक्षाधीशाचे व कोट्यधीशाचे सपन्न शहर होते

नबाब मीर नसिरुद्दिनचा अमल सुरतवर होता. त्या वेळी इग्रज इतके बलशाली झाले की त्यांनी नबाबला गुडाळून ठेवून सुरतचा कब्जा घेतला तेव्हा सुरतमध्ये टाकसाळ होती व चागाशाही रुपयाचे चलन होते त्या काळी बदाम व कोडीही चलनात होती (कोडी हे बहुधा कवडीचे रूप असावे ) आता सुरतची वस्ती आठ लाख झाली होती मजुराला दोन आणे मजुरी मिळायची हारा किवा मोठी टोपली भरून भात दोन रुपयाना मिळत असे गव्हाचा दर चार आणे मण होता साखर दोन रुपये मण होती एक आण्याला मणभर लाकूड मिळत असे. या स्वस्ताईची आता कल्पनाही करता येत नाही, इतका वस्तूच्या किमतीत फरक झाला आहे १८१० साली अबदुल रेहमान नावाच्या मुस्लिमाने काही गावठी सैन्य जमवून इग्रजाच्यावर हल्ला केला. पण सर्व आधुनिक साधनानी युक्त असलेल्या इंग्रजानी हे बड सहज चिरडून टाकले १८२५ साली डचांनी काढता पाय

घेतला व सुरतमधील आपल्या वखारी बद केल्या त्यापाठोपाठ १८४७ साली पोर्तुगीजांनीही आपल्या वखारी बद केल्या.

१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याच्या वेळी सुरतेत फार मोठी हालचाल झाली नाही त्याचे केंद्र मीरत सुरतपासून फार लाब होते व दळणवळणाच्या अडचणी ही त्यांची प्रमुख कारणे होती काही मुसलमानानी शेख सैय्यद याच्या नेतृत्वाखाली इंग्रजाच्या विरुद्ध उठाव करण्याचा प्रयत्न केला, पण इग्रजानी तो मोडून काढला. १८६४ साली सुरत ते मुंबई ही रेल्वे सुरू झाली. त्यामुळे एक नवे युग अवतरले. १८८६ साली सुरतमध्ये कापडाच्या तीन गिरण्या सुरू झाल्या. हा सुरतेतील उद्योग पर्वाचा प्रारभ होता १८२६ साली दलपतराम भगुभाई यानी सुरतमध्ये पहिली इग्रजी शाळा सुरू केली हळूहळू तेथे मिशनरी शाळाही सुरू झाल्या १८५० नतर सुरतमध्ये छापखाने सुरू झाले तसेच 'सुरत समाचार', 'देशीमित्र', 'सूर्यप्रकाश', 'गुजरात दर्पण' ही वर्तमानपत्रेही निघाली १८५२ साली सुरत नगरपालिकेची स्थापना झाली व त्याच वर्षी एड्रूस ग्रथालयही सुरू झाले. मात्र कापडधद्यात अहमदाबाद व अनेक उद्योगधद्यात मुबई यांच्या प्रभावापुढे सुरतचे महत्त्व कमी कमी होऊ लागले

सुरतच्या प्रेक्षणीय स्थळांत किल्ल्याला सर्वात अधिक महत्त्व आहे त्याला ऐतिहासिक महत्त्व तर आहेच, पण आजही सुरत जिल्ह्याच्या सरकारी कचेऱ्या या किल्ल्यात आहेत. १५४६ साली बांधण्यात आलेल्या या किल्ल्याभोवती अठरा मीटर उच तटबदी आहे. तसेच किल्ल्याभोवती शहराच्या बाजूला तीस फूट असा खदक आहे आता बऱ्याच ठिकाणी हा खदक बुजण्यात आला आहे काही ठिकाणची तटबदीही ढासळली आहे. ब्रिटिशानी १७६० साली किल्ल्याची डागडुजी केली. चारशे वर्षांपेक्षा अधिक काळ सुरतचे रक्षण करणारा हा भव्य किल्ला मनावर प्रभाव टाकतो

डच सीमेटरी (स्मशान) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या कबरी सोळाव्या शतकातील आहेत डच उद्यानातील या कबरी डचांच्या धर्मगुरूच्या आहेत फारद एम्ब्रोझ व जॉर्ज ऑक्सनुन यांच्या या कबरी आज दुर्लक्षित आहेत, पण चारशे वर्षांपूर्वीच्या वास्तुशिल्पकलेचे नमुने म्हणून त्या पाहण्यासारख्या आहेत सुरतला भेट देणाऱ्या प्रवाशाना कौतुकाने जर

एखादी गोष्ट दाखवीत असतील तर ती म्हणजे फिरते हॉटेल शहरातील प्रमुख ठिकाणी असलेले हे 'रिव्हॉल्विंग हॉटेल' म्हणजे लडनचे बिगबेन घड्याळ किंवा अमेरिकेचा स्वातत्र्यदेवीचा पुतळा यासारखे सुरत शहराचे प्रतीक आहे या हॉटेलचा उच मनोरा व त्यावरील चौकोनी घड्याळ खूप दूरवरूनही दिसते. हे भारतातील पहिले फिरते हॉटेल आहे असे सुरतवासी सागतात. सुरतची चौपाटी व तेथील उद्यान सौंदर्यपूर्ण आहे नगरपालिकेने या ठिकाणी मुलाना खेळण्यासाठी अनेक सोयी उपलब्ध केल्या आहेत.

मुस्लिम पद्धतीच्या बाधणीची सुरत महापालिकेची इमारत जुनी व पाहण्यासारखी आहे हिचे नाव हुमायू सराई असे आहे सुरत नगरपालिकेची स्थापना १८४८ साली झाली सुरतमधील हिऱ्याचा उद्योग हा भारतातील एक अत्यत महत्त्वाचा उद्योग असून आगामी काळात त्याचे महत्त्व अधिकच वाढणार आहे एके काळी सुरत हे कापड उद्योगाचे, विशेषत· रेशमी कापड उद्योगाचे, प्रमुख केंद्र होते अलीकडच्या काळात नायलॉन, पॉलिस्टर अशा कृत्रिम धाग्यानी रेशीम व सूत याना शह दिला आहे या पार्श्वभूमीवर सुरतमधील हिरेउद्योगाने भाडवल गुतविणाऱ्याचे आणि कामगाराचे लक्ष वेधून घेतले कच्च्या हिऱ्याची कातणी व त्याना पैलू पाडणे हे सुरतच्या हिरेउद्योगाचे स्वरूप आहे या उद्योगाच्या दीड हजारांवर लहानमोठ्या कार्यशाळा सुरतमध्ये असून त्यात एक लाखाहून अधिक कुशल व अकुशल कामगार काम करतात. हिऱ्याची निर्यात हा भारताला परकीय चलन मिळवणारा एक महत्त्वाचा उद्योग आहे. १९८५-८६ साली भारतातून १३४४ कोटी रु. हिऱ्याची निर्यात झाली, यावरून या उद्योगाच्या मोठ्या आवाक्याची कल्पना येईल एक दशकात हा उद्योग आठ पटीने वाढला असून वाढीचा इतका वेग दुसऱ्या कोणत्याही उद्योगात नाही

या वाढत्या व्यवसायाला पद्धतशीर स्वरूप द्यावे म्हणून सुरतपासून पधरा मैलावरील सचिन या रेल्वे स्थानकाजवळ 'डायमड पार्क' ही भव्य वसाहत स्थापन करण्यात येणार आहे. अठ्ठेचाळीस कोटी रु. ची ही योजना ब्याण्णव हेक्टर जागा व्यापून दोन हजार यत्रशाळाची सुविहित उभारणी करील हिऱ्याच्या सशोधनासाठी तेथे एक डायमड इन्स्टिट्यूट उभारण्यात येणार आहे या डायमडपार्कची व्यवस्था सुरतच्या हिरेव्यापाऱ्याच्या

सहकारी संस्थेकडे राहील. भावी काळात सुरत शहर वाढून डायमंड पार्कपर्यंत जाईल असाही अंदाज काही तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे

सरदार पटेल म्युझियम हे सुरतचे एक आकर्षण आहे. हुमायू सराई व किल्ला याच्या जवळच हे वस्तुसंग्रहालय आहे पूर्वी हे विंचेस्टर म्युझियम या नावाने मशहूर होते. विंचेस्टर हा सुरतचा एक नायब कलेक्टर होता. त्याच्या स्मरणार्थ १८९० साली हे संग्रहालय लहान प्रमाणावर सुरू झाले प्रथम त्यात नकाशे व शालोपयोगी साहित्य होते गेल्या सुमारे शंभर वर्षांत त्याची भरीव वाढ होऊन आता तेथे दहा हजार वस्तू आहेत त्यात गुजरात, कच्छ व काठेवाड या भागातील नक्षीच्या वस्तू, लाकडाचे कोरीव काम, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनाशी निगडित अशा वस्तू, वीणकाम, भरतकाम इत्यादींचा समावेश आहे गांधीबागेच्या पश्चिम बाजूला रंग उपवन हे खुले नाट्यगृह आहे त्यात चार हजार प्रेक्षकांची बसण्याची सोय आहे चौपाटी या भागात उद्यान व मुलांना खेळण्याची व्यवस्था आहे अंबिका मंदिर व नेहरू पार्क ही सुरतची इतर प्रेक्षणीय स्थळे आहेत. सुरत हे रेशमी व जरी कापडाबद्दल मशहूर आहे आजही रेशमी कापडाच्या अनेक गिरण्या येथे असून 'सिल्क मार्केट' या खास व्यापारीपेठेत रेशमी साड्या व कापड याचा ठोक व्यापार मोठ्या प्रमाणावर होतो सुरतला भेट देणाऱ्या महिलांच्या दृष्टीने हे विशेष आकर्षण आहे. मक्काई पूल हे सुरतचे एक भूषण आहे शहरात अनेक जैन मंदिरे आहेत, तसेच बाळकृष्ण मंदिर, प्रणामी मंदिर, इत्यादीही प्रेक्षणीय आहेत

सुरत हे गुजरातमधील एक प्रमुख व्यापारी केंद्र असल्याने अनेक धर्मांचे लोक येथे एकत्र आले आहेत. सबंध गुजरातचे हे धार्मिक सहकार्याचे प्रतीकच आहे गुजरातमध्ये धार्मिक संघर्ष फारसे झाले नाहीत यादृष्टीने गुजरातची धार्मिक रचना पाहण्यासारखी आहे.

गुजरातमध्ये हिंदू, जैन, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन अशा अनेक धर्मांचे लोक राहतात. गुजरातमध्ये व्यापार मोठ्या प्रमाणावर चालतो त्यामुळे वैश्यांचा समाजावर प्रभाव आहे कुणबी, काछिया, खमाटी, सतवारा इत्यादी जाती मुख्यत शेती करतात. राजस्थान व गुजरायमध्ये सूर्याचे उपासक अनेक पंथ आहेत. मोढेरा व इतर अनेक ठिकाणी सूर्यमंदिरे आहेत चातुर्मासात सौराष्ट्रात सूर्यव्रत करण्याची परंपरा आहे राजस्थान या

नजीकच्या राज्यातील अनेक राजे सूर्यपूजक आहेत. सम्राट अशोकाच्या कालापासून गुजरातेत बौद्ध धर्म आला. जुनागडजवळ गिरिनारच्या पायथ्याशी जे अशोकाचे शिलालेख आहेत, त्यावरून बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी अशोकाने केलेल्या प्रयत्नाची साक्ष पटते मिनाडर हा राजपुरुष ग्रीसमधून गुजरातेत आला, त्यानेही बौद्ध धर्माची दिक्षा घेतली मिनाडरने मिलिंद हे नाव घेतले व इ स पूर्वी १५० वर्षे सौराष्ट्र व आसपासच्या भागावर राज्य करून बौद्ध धर्माचा प्रसार केला. जुनागड, साना वगैरे भागांत आजही बुद्ध विहारांचे व बौद्ध लेण्याचे अवशेष सापडतात.

इसवीसनापूर्वी चौथ्या शतकापासून गुजरातमध्ये जैन धर्माचा प्रसार होण्यास सुरुवात झाली. सध्या वडनगर नावाने ओळखले जाणारे बदर त्या काळी वलभी या नावाने प्रसिद्ध होते. वलभी येथे जैन विद्यापीठ होते देवधर्गिणी या जैन मुनींनी जैन ग्रंथ लिखितस्वरुपात आणण्याची प्रथा सुरू केली. तोपर्यंत ते मौखिक पद्धतीनेच चालत आले होते. दिगंबर आणि श्वेतांबर हे जैनाचे दोन पथ आहेत त्यापैकी श्वेताबर पथ गुजरातेत मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाला. भीमदेव सोळकी याचा सेनापती विमलशहा हा जैन होता जयसिंह सिदराजच्या कारकीर्दित जैन धर्माची खूपच भरभराट झाली. हेमचद्र सुरी ही जैन पडित 'कलिकाळ सर्वज्ञ' म्हणून ओळखले जात होते जयसिहानतर गादीवर आलेला कुमारपाल हा जैनाच्या मदतीने राज्यावर आल्याने त्याने जैन धर्मप्रसारासाठी मोठ्या प्रमाणावर सहाय्य केले.

झरतुष्टी किंवा पारशी हे गुजरातमधील महत्त्वाचे नागरिक आहेत त्याची संख्या लहान असली तरी टाटा, नवरोजी याच्यासारखे दिग्गज या धर्मात झाले व एकंदरीत या धर्माचे लोक सधन व लोकसेवाबुद्धीचे असल्याने गुजरातच्याच नव्हे तर सबध भारताच्या लोकजीवनावर व विशेषत· उद्योगधद्यावर पारशी लोकांचा प्रभाव पडला व आजही पडत आहे इ स आठव्या शतकात इराणवर मुसलमानानी आक्रमण केले तेव्हा झरतुष्ट धर्माचे अग्निपूजक जहाजात बसून भारतात आले ते प्रथम गुजरातच्या किनाऱ्यावर उतरले दीव, उदवाडा, भडोच, सजाणा, बिलिमोरिया, गणदेवी, नवसारी या भागात ते वस्ती करून राहू लागले मोबेदच्या नेतृत्वाखाली हे पारशी इराणमधून भारतात आले होते झेंद

अवेस्ता हा त्याचा धर्मग्रंथ आहे

अल्लाउद्दिन खिलजी व अहमदशहाच्या काळापासून गुजरातेत मुसलमानांचाही बराच प्रभाव आहे गुजरातचे प्रमुख हे शेकडो वर्षे मुसलमान सुलतान असल्याने साहजिकच त्याच्या धर्माचा सुलभतेने प्रसार झाला खिश्चनाची सख्या त्यामानाने कमी आहे. पोर्तुगिजांनी व ब्रिटिशांनी सुरतेत आपल्या वखारी उघडल्या त्या सोळाव्या व सतराव्या शतकांत. तेव्हापासून खिश्चन धर्म या भागात आहे पण जैन व हिंदू या धर्मांच्या प्रखर प्रभावामुळे गुजरातेत खिश्चन धर्म मर्यादित प्रमाणातच राहिला

या शहराचा इतिहास संमिश्र आहे स्कद पुराणात सूर्यपूर, तापीपूर, ब्रह्मपूर, ब्रह्मारण्य, बहनपूर अशा विविध नावानी त्याचा उल्लेख आढळतो कातारेश्वरने येथे तप केले व त्याच्या पुत्रांनी-अश्विनीकुमारानी-अश्विनीपुरात राहून अभ्यास केला असे पुराणात म्हटले आहे हे कातारेश्वर आजही कतार या नावाने अस्तित्वात आहे ज्या तापी नदीच्या काठी सुरत वसले आहे, ती पूर्वी सूर्यपूत्री या नावाने विख्यात होती. त्यामुळे पुराणकाळी सुरत हे सूर्यपूर नावाने मशहूर होते असा निष्कर्ष काढला जातो या सूर्यपूरचे सुरत केव्हा व का झाले याबद्दल अनेक मते आहेत. रूमी नावाच्या एका तुर्की सौदागराची पत्नी सुरता तिच्यावरून हे नाव आले; कामरेजच्या राजाची सुरतवाडी नावाची वाडी होती तिच्यावरून किंवा सुरतजी नावाचा कोळ्याचा एक प्रमुख होता त्याच्यावरून हे नाव पडले अशीही मते आहेत. अकराव्या शतकात हे गाव वसले. रांदेर हे सपन्न गाव नाश पावले व तेथून निघालेल्या लोकानी तापीच्या काठी हे नवे गाव वसविले.

तापी ही नदी सातपुड्यात उगम पावते आणि चारशे पन्नास मैलांचा प्रवास करून सुरतपासून दहा मैलावर डूमसजवळ अरबी समुद्राला मिळते. नदी व समुद्र ही दोन्ही नजीक असल्याने सुरत हे जलवाहतुकीला व आंतरराष्ट्रीय व्यापाराला आदर्श शहर होते. एकेकाळी हे बंदर एवढे महत्त्वाचे होते की, तेथे चौऱ्याऐंशी देशांचे बावटे होते मुबई बदराचा विकास होण्यापूर्वी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील सर्वात महत्त्वाचे बंदर म्हणून सुरतचाच मान होता. मक्का व हाजला जाणारे मुसलमान यात्रेकरू सुरत बंदरातूनच जात. सुरतच्या खाडीवरील पुलाला आजही 'मकाई पूल'

किंवा 'मक्काबारी' हे नाव आहे. बदर असल्याने सुरुवातीला येथे कोळ्यानी वस्ती केली मग इतर हिंदू, मुसलमान, पारशी वगैरे आले डच, फ्रेंच, इग्रज इत्यादी परकीयही मग आले सोळाव्या शतकात सुरतची इतकी भरभराट झाली की, त्या वेळी या शहराची वस्ती आठ लाख होती ! पण तापी नदीला वारवार येणारा पूर ही या शहरावरची फार मोठी आपत्ती होती पूर, दुष्काळ, प्लेग वगैरे कारणानी सुरतची लोकसख्या झपाट्याने घटत गेली मुबई बदराचा विकास झाल्याने अनेक बडे व्यापारीही मुबई या सुरक्षित बदराकडे गेले.

-११९४ साली कामरेज हे मोठे बदर होते त्या वेळी सुरत हे कामरेजच्या रजपूत राजाच्या सत्तेखाली होते पण पुढे तापी नदीनेच आपला प्रवाह बदलला व ती सुरतच्या बाजूला वळली. त्यामुळे सुरत हे बंदर होऊन कामरेज मागे पडले तेराव्या शतकात सुरत तुघलक वशातील बादशहाच्या ताब्यात होते मोगलाची ही सत्ता १७ व्या शतकापर्यंत टिकली. १७५९ साली इग्रजांनी येथे व्यापाराला सुरुवात केली या व्यापारात वाढ होऊन १६१२ मध्ये त्यानी येथे वखार सुरू केली. कारखाना व व्यापाराची कचेरी असे या वखारीचे स्वरूप होते. वास्तविक, १७५९ साली इग्रजानी सुरतमध्ये पाय रोवला तेव्हा दिल्लीच्या मोगलांची सत्ता येथे होती, पण ती दुबळी झाली होती त्याच वर्षी इग्रजानी सुरतचा किल्ला घेतला पण आश्चर्य असे की, मोगलाच्या नबाबाचा ते पूर्ण पाडाव करू शकले नाहीत म्हणून या किल्ल्यावर काही काळ इग्रजाचा व नबाबाचा असे दोन झेंडे फडकत होते । पण इंग्रज हे आधुनिक शस्त्रांनी परिपूर्ण होते व अत्यत धूर्त होते त्यानी हळूहळू नबाबाला नामोहरम करून १८०० साली सर्व सत्ता आपल्या हाती घेतली.

सुरत शहर लुटण्याचे प्रकार अनेकदा झाले. महमद तुघलक याने तेराव्या शतकात सुरत लुटले. तेव्हा सरक्षणाच्या दृष्टीने १३७३ मध्ये सुरतला पहिला किल्ला बांधण्यात आला १४९६ ते १५२१ या काळात गोपी नावाच्या नेत्याने सुरतच्या विकासासाठी खूप श्रम केले त्याने बाधलेले गोपी तलाव, राणी तलाव आजही प्रसिद्ध आहेत. बादशहाने गोपीला मलिक व त्याच्या पत्नीला राणी असे किताब दिले होते. पोर्तुगिजानी १५१२ साली सुरत शहराला तीन वेळा आग लावली तेव्हा

बादशहाचे सैन्य सुतरवर चालून आले या सैन्याने सहा आठवडेपर्यंत सुरतला वेढा घातला होता गोपी तलावाच्या काठावर बादशहाने तळ ठोकला होता. अखेर पोर्तुगीज शरण आले व बादशहाने किल्ला व सुरत ताब्यात घेतले या वेळी सुरतच्या आधिपत्याखाली ९९३ खेडी होती व सालिना उत्पन्न पाच लाख चागशाही रुपयांचे होते.

समुद्रमार्गे या संपन्न गावावर हल्ला करणे सुलभ होते म्हणून पंधराव्या शतकाच्या अखेरीस व सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला पोर्तुगिजांनी तीन वेळा सुरतवर हल्ले केले पण अहमदाबादच्या अधिकाऱ्यांनी ते परतवून लावले. १५४६ मध्ये सुरतच्या संरक्षणासाठी गावाभोवती भक्कम किल्ला बांधण्यात आला तुर्कांनी तो बांधला दिवाण गोपीने तेथे एक सुंदर तलाव बांधला होता १६२१ साली ब्रिटिशांनी भारतातील आपली वखार सुरतमध्ये सुरू केली. ही वखार म्हणजे एक कारखाना होता १६१२ साली सुरत येथे भारताच्या औद्योगीकीकरणास सुरुवात झाली असे सार्थपणे म्हणता येईल

बार्बोसा या पोर्तुगीज प्रवाशाने १५१४ साली लिहिलेल्या प्रवास वर्णनात म्हटले आहे की, 'सुरत हे हिंदुस्थानच्या मालाचे संपन्न कोठार आहे' उत्तम प्रतीचे रेशमी, जरी व सुती कापड, सभा- समारंभात वापरण्याची नक्षीची भांडी, उत्कृष्ट मिठाई, जडजवाहार ही त्या काळापासून सुरतची वैशिष्ट्ये होती आजचे सुरत म्हणजे नव्या-जुन्याचा संगम आहे वस्ती सुमारे दहा लाख आणि विस्तार ३६ चौरस किलो मीटर्स आहे पूर्वी पावसाळ्यात तापीचे पाणी गावात मोठ्या प्रमाणावर शिरत असे व गावाला पुराचे तडाखे बसून अपरिमित नुकसान होत असे. पण आता अनपेक्षित पुरावर नियंत्रण घालण्यात आले आहे

शहाजहान बादशहा गादीवर आला तेव्हा म्हणजे १६२७ साली सुरत हे संपन्न व भरभराटीचे शहर झाले होते या शहरात यहुदी, तुर्की, अरब, इराणियन, आर्मेनियन अशा अनेक वंशाचे लोक व्यापार करीत होते तेव्हा भारतातील इतर कोणत्याही शहरांत इतके विविध देशाचे परकीय एकत्र नव्हते कारण तेव्हा सुरतहून समुद्रमार्गाने युरोप, आफ्रिका, इराण, श्रीलंका, अरबस्थान, मलाक्का, सुमात्रा वगैरे भागात मोठ्या प्रमाणावर भारतीय मालाची निर्यात होत असे या मालात हिरे, मोती, माणिक,

प्रवाळ, ताब्या-पितळेची भाडी, सगमरवरी दगड व वस्तू, नीळ, साबण, कागद, अफू, धान्य, रेशीम, सुती व रेमशी कापड इत्यादी वस्तू असत सुरतेचे गहू व कापड जगात वाखाणलेले असे त्या काळात सुतरेचे जरीकाम, गालिचे, नक्षीकाम, लाकूडकाम, जहाजबाधणी, हस्तिदंती कारागिरी इत्यादी श्रेष्ठ दर्जाची होती हा माल परदेशी निर्यात होत असे, तसेच तो खरेदी करण्यासाठी हजारो मैलावरून देशोदेशीचे व्यापारी सुरतेत येत असत

१६५८ साली औरंगजेब दिल्लीच्या तख्तावर आला हाज यात्रेकरू सुरतहून जात असत त्यामुळे व्यापाराला बरकत आली पण औरगजेबाच्या धर्माधतेचा दुष्परिणाम थेट सुरतपर्यंत पोचला होता व हिंदू प्रजेचा छळ चालू होता सुरतचा नबाब अकर्तृत्ववान व दुर्बळ होता नागरिकाच्या सुरक्षिततेची व्यवस्था नव्हती. देशोदेशीचे लोक येथे येत ते फक्त व्यापारासाठी त्याना शहराविषयी महत्त्व नव्हते अशा परिस्थितीत शिवाजी महाराजानी १६६४ साली सुरतवर पहिली चढाई केली त्या काळी दिल्लीच्या खालोखाल सुरतला महत्त्व होते. दक्षिणेत शिवाजी महाराजाची कोंडी करण्याचा मोगलांचा डाव होता त्याला तोडीस तोड म्हणून महाराजानी सुरतवर हल्ला करून दिल्लीची पादशाही हादरवली इनायत खान हा या वेळी सुरतमध्ये औरगजेबाचा प्रतिनिधी होता तो सावध होऊ नये म्हणून शिवाजी महाराजांनी अशी हूल उठवली की आपण औरगजेबाचे सरदार असून अहमदाबादच्या वाटेवर आहोत ही हूल इनायत खानाला विश्वसनीय वाटून तो अधिक बेसावध राहिला तो दिवस चार जानेवारी १६६४ असा होता व महाराज त्या वेळी घणदेवीहून उधना येथे आले हे ठिकाण सुरतपासून फक्त दोन कोसांवर होते

नबाब गाफील होता, तरीही शिवाजी येऊन सुरत लुटणार या वार्तांनी शहरावर भीतीची छाया पडली होती व्यापारी आपल्याबरोबरचे जडजवाहर घेऊन इनायत खानाच्या आश्रयाला किल्ल्यात जाऊन बसले शिवाजी महाराज बुऱ्हाणपूर दरवाजात आले आणि त्यांनी आपले सत्य स्वरूप उघड करून इनायत खानाकडे खंडणीची मागणी केली मोगलानी पुणे विभागात लुटालूट व जाळपोळ केली होती तीबद्दल मोगलाना अद्दल घडवणे जरूर होते इनायत खानाने खंडणी देण्यास नकार देताच

महाराजांनी आपल्या सैन्याला सुरत लुटण्याचा हुकूम दिला. पण फकीर, साधू, पाद्री याना उपद्रव देऊ नका, गोरगरीबावर अन्याय करू नका, धार्मिक स्थानांचे पावित्र्य कायम ठेवा, स्त्रियाना हात लावू नका असे कडक इशारेही दिले शिवाजी महाराजाचे सैन्य सुरतेत घुसले तेव्हा व्यापारी व धनिकानी जीव बचावण्यासाठी पैशाच्या थैल्या त्याच्या स्वाधीन केल्या. इंग्रज व ` ँ यांच्या वखारी लुटण्यात आल्या. इनायत खानाने आपल्या अधिकाऱ्याला वकील म्हणून महाराजांच्याकडे वाटाघाटीला पाठवले. त्याने दगाफटका केला आणि बोलणी चालू असताच लपवून आणलेली कट्यार काढून महाराजांच्यावर हल्ला करण्यासाठी कट्यार घेतलेला हात वर केला पण महाराजाचे रक्षक सावध असल्याने त्याचा तो विश्वासघातकी हात वरच्यावर हवेतच छाटला गेला ! आता इनायत खानाच्या सुरतेला दयामाया दाखवायची नाही असा महाराजांच्या सैन्याने निश्चय केला. त्यांनी तीन दिवस सुरत लुटली तीन हजार पोती भरून सोने, चादी, हिरे, दागिने, मोती घेऊन शिवाजी महाराज सुरतहून विजयी होऊन परतले. शिवाजी महाराजानी सुरत सोडल्यानंतर आठ दिवसानी औरंगजेबचा सरदार मोठ्या सैन्यानिशी सुरतला आला, पण त्याला उच हवेल्यांची राखच पाहायला मिळाली. शिवाजी महाराजानी सुरतहून तीन कोटी रुपयाची दौलत लुटून आणली होती. शिवाजी महाराजानी सुरत लुटले, पण फादर एम्ब्रोझ या पाद्र्याला त्यानी अभय दिले तसेच डचाचा दलाल मोहनदास पारेख हा अत्यत चारित्र्यवान व लोकाना मदत करणारा होता, त्याची संपत्ती कोट्यवधी रुपयाची असूनही तिला महाराजानी धक्का लावला नाही.

छ शिवाजी महाराजानी १६७० साली पुन्हा सुरतेवर हल्ला केला. या वेळी जजिऱ्याच्या सिद्दीबरोबर महाराजांच्या लढाया चालू होत्या. इंग्रज व डच हे सिद्दीला मदत करीत होते. त्याना धडा शिकवून रसद बद पाडणे हा शिवाजी महाराजाच्या या मोहिमेचा उद्देश होता. २ ऑक्टोबर १६७० रोजी मराठ्याच्या फौजा सुरतेच्या प्रवेशद्वारावर धडकल्या तेव्हा अनेक धनिक व व्यापारी आपल्या मूल्यवान वस्तूंसह बदरात लपून बसले सुरतेच्या सुलतानाने प्रथम प्रतिकाराचा प्रयत्न केला, पण हार होणार ही खात्री पटताच तो लपून बसला. या वेळी काशगरचा तार्तर राजा अबदुल्ला खान

हा मक्केहून मोठ्या डामडौलाने येऊन सुरतेत उतरला होता तो सोन्याच्या पलगावर झोपत असे व सोन्याच्या पालखीतून फिरत असे ३ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री महाराजाचे सैन्य त्याच्या सराईत शिरले तेव्हा अबदुल्ला खान आपल्या लवाजम्यासह किल्ल्यात पळून गेला आणि त्याचा सोन्याचा पलग, पालखी व जडजवाहर मराठा सैन्याने लुटून आणले हा दिवस लक्ष्मीपूजनाचा होता त्या मुहुर्तावर मराठी सैन्याने सुरतेतून दोन कोटी रुपयाचे धन लुटून महाराजाना दिले ब्रिटिश वखारवाल्यानी बदुकाच्या गोळ्याच्या बळावर मराठी सैन्याचा प्रतिकार केला, पण मग त्याना शहाणपणा सुचला. कारण मराठी सैन्य सख्येने पधरा हजारावर होते व त्यापुढे इग्रजांचा पाडाव लागला नसता इग्रजानी शिवाजी महाराजाना नजराणा देऊन अभय मागितले व महाराजानी ते त्याना दिले. ७ ऑक्टोबर रोजी प्रचड लूट घेऊन शिवाजी महाराज राजगडला परत गेले त्यानतर महिनाभर सुरत निर्नायकच होते या काळात अनेकदा शिवाजी महाराजाच्या फौजा पुन्हा येत असल्याच्या अफवा उठत आणि घबराट पसरून पळापळ होई

जैनाची जगप्रसिद्ध मदिरे पालिताना येथे आहेत ती पाहण्यासाठी भावनगर येथे मुक्काम करणे सोयीचे असते 'सौराष्ट्राच्या पूर्व किनाऱ्यावरील हे बदराचे गाव १७३४ साली भावसिगडा गोहित या सूर्यवशी रजपूत राजाने वसविले त्याचे पूर्वज मारवाडचे होते १९४७ साली भावनगर सस्थानचे विलीनीकरण झाले भावनगर शहराची लोकसख्या साडेचार लाख आहे. गौरीशकर तलाव, गाधी स्मृती, सरदार स्मृती, तप्तेश्वर मंदिर ही येथील काही प्रेक्षणीय स्थळे आहेत भावनगरपासून चाळीस मैलावर अलाग येथे 'शिव ब्रेकिंग' हा उद्योग मोठ्या प्रमाणावर चालतो जुन्या बोटी मोडण्याचे हे आशियातील सर्वात मोठे केन्द्र आहे' श्री दीपक शाह हे स्थानिक रोटरी क्लबचे अध्यक्ष व सौराष्ट्र चेम्बर ऑफ कॉमर्स इडस्ट्रीजचे अध्यक्ष आहेत

भावनगरमध्ये १६ जैन मदिरे असून त्यापैकी दोन दिगबर पथाची व १३ श्वेतावर पथाची आहेत दोन स्वामी नारायण मदिरे, दोन चर्च, २५ मशिदी व एक पार्शी अगियारी आहे. द्वारकाधीश, कृष्णनगर, गोवर्धननाथ इत्यादी आठ हवेल्या व मदिरे आहेत सौराष्ट्राविषयी खालील श्लोक प्रसिद्ध

आहे-

सौराष्ट्रे पच रत्नानी नदी, नारो, तुरगामाम् ।
चतुर्थ सोमनाथश्च पंचम हरिदर्शनम् ॥

(नदी, नारी, घोडे, सोमनाथ आणि द्वारका ही सौराष्ट्राची पंचरत्ने आहेत )

त्यात भावनगर या सहाव्या रत्नाचा समावेश केला पाहिजे, असे भावनगरचे नागरिक सागतात. भावनगरचे गुहिल वशीय राजे हे प्रजाहितदक्ष व अभिरुचिसपन्न होते. त्यात भावसिंहजी व तरसिंहजी, विजयसिंहजी, जसवतसिंहजी, तख्तसिंहजी, कृष्णकुमारसिंहजी इत्यादींचा सामवेश आहे. त्यांच्या दिवाणानीही भावनगरच्या विकासासाठी खूप परिश्रम घेतले. त्यामुळे सामळदास कॉलेजसारखी शभर वर्षांहून जुनी व प्रगतशील शिक्षण सस्था अद्यापिही कार्यरत आहे लेखक, कलावत, उद्योगपती, शिक्षणतज्ज्ञ याचा सहवास या शहराला सतत लाभला आहे.

'गाधी स्मृती' या मध्यवर्ती जागेतील भव्य दगडी इमारतीत तळमजल्यावर सरकारी म्युझियम आहे. त्यात दगडावरच्या नक्षीकामाचे नमुने, मूर्ती, पेंढा भरलेले सिंह व इतर प्राणी, तिकिटाचा संग्रह, खेळ, बालकदिनाची चित्रे, जरीकामाचे नमुने, शेतीची औजारे, भांडी वगैरे आहेत त्यातल्या तिकिटाचा येथील सग्रह विशेष लक्ष वेधून घेतो कारण निरनिराळ्या देशानी फळाची, प्राण्याची, पक्ष्याची वगैरे चित्राची काढलेली तिकिटे विभागवार लावून ठेवलेली आहेत सौराष्ट्री पद्धतीचे लाकडी नक्षीचे कामही प्रेक्षणीय आहे पहिल्या मजल्यावर म गाधींच्या स्मृतीशी निगडित अशा अनेक वस्तू व छायाचित्रे आहेत. गांधी स्मृती हे सास्कृतिक केन्द्र भावनगरचे महाराज कृष्णकुमार सिंहजी आणि बळवंतराव मेहता यानी १९५५ साली स्थापन केले त्याचे उद्‌घाटन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यानी केले म गाधींच्या विचाराचा प्रसार आणि त्यांच्या विधायक कार्यास चालना हे केन्द्राचे मुख्य उद्देश आहेत त्यादृष्टीने येथे गांधी ग्रथालय असून त्यात म गाधींची व त्यांच्याविषयी ३५,००० पुस्तके आहेत गाधी म्युझियम हा या केन्द्राचा भाग असून त्यात गांधीजींच्या जीवनातील निवडक प्रसगाची २११ छायाचित्रे आहेत कला व हातकला सग्रहालयात गुजरात व परप्रातातील कलांचे व हातकलांचे निवडक नमुने

आहेत खादी व ग्रामोद्योग विभागात खादी, चर्मोद्योग, मसाले, तेल, बेकरी इत्यादी उद्योगधद्यात चार हजार लोकाना रोजगारी मिळते व वार्षिक ६० लक्ष रुची विक्री होते गोशाळेत ७५ गाई आहेत शिवाय या केन्द्रातर्फे कुष्ठरोग्यासाठी एक रुग्णालय चालविण्यात येते. संस्थेचे योगाचे वर्गही आहेत या गाधी स्मृतीसमोरच सरदार स्मृतीचीही मोठी दगडी इमारत आहे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनाशी निगडित अशा वस्तू व छायाचित्रे तेथे ठेवण्यात आली आहेत.

तप्तेश्वर महादेवाचे मदिर मध्य भावनगरपासून पाच किलो मीटर्स अतरावर आहे तेथून भावनगर शहराचे उत्तम विहंगम दृश्य दिसते. भरतगावाजवळ एक लहानसे अभयारण्य आहे त्यात थोडा वेळ निसर्ग व पशुपक्ष्याच्या सगतीत चांगला जातो. शिवाय नीलमबाग महल, गौरीशंकर तलाव, बर्टन ग्रथालय, आयुर्वेदिक महाविद्यालये, ओदियार माताजी मदिर, केन्द्र सरकारची मीठ व मरीन सशोधन संस्था, टाऊन हॉल हा पाहण्यात तास- दीड तास चागला जातो

❑


ग्रंथालय ठाणे
दा. क्र. ६५६
२७१९८

# १२. परमपूज्य धर्मक्षेत्र मृत्युंजय

जैनाची पाच मुख्य तीर्थे किवा धर्मस्थळे आहेत . १ शत्रुंजय (सौराष्ट्र), २. संमेत शिखर किंवा पार्श्वनाथ पर्वत (बिहार), ३ अर्बुदा किंवा अबू (राजस्थान), ४ गिरिनार (सौराष्ट्र) आणि चंद्रगिरी (हिमालय) त्यात शत्रुंजय हे सर्वात महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. मदिरे बांधण्याची जैन धर्माची परपरा फार जुनी आहे इ स ३१३ मध्ये बांधलेल्या काही जैन मंदिरांचे अवशेष आजही गिरिनार पर्वतावर पाहावयास मिळतात शत्रुजय हे जैनांचे सर्वात महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असण्याचे कारण असे की जैनांच्या चोवीस तीर्थंकारापैकी पहिले तीर्थंकर श्री आदिनाथ ऊर्फ ऋषभदेव हे याच ठिकाणी निर्वाणाप्रत गेले. शत्रुजय याचा अर्थ शत्रूवर विजय मिळविणारा मात्र हे शत्रू म्हणजे कोणी व्यक्ती नसून मानवाच्या विकारावर विजय मिळविणे अशा अर्थी हा शब्द रूढ आहे समुद्रसपाटीपासून दोन हजार फूट उंच असलेल्या या शत्रुंजय पर्वतावर जैनांची ८६३ मदिरे आहेत. इतकी मदिरे एकाच ठिकाणी असलेले हे एकमेव क्षेत्र आहे

पालिताना हे पूर्वी एक संस्थान होते. मोगल अमदानीत पालिताना हे परगण्याचे मुख्य ठाणे होते. पालितानाचे संस्थानिक हे गोहित घराण्यातील शाहजीच्या वशातील आहेत. जुनागडच्या राजाने शाहजी गोहितच्या बहिणीच्या लग्नात पालिताना ही जहागीर बक्षीस म्हणून दिली, तेव्हापासून हे स्वतंत्र सस्थान झाले १९४७ साली भारत स्वतत्र झाल्यानतर इतर संस्थांनाच्या बरोबरच पालितानाही भारतात विलीन झाले पालिताना हे लहानसेच, दहा हजार वस्तीचे गाव आहे मुख्य गावापासून एक किलो मीटर अंतरावर शत्रुजय पर्वत आहे. जन्मात एकदा तरी शत्रुजय पर्वत चढून आदिनाथाचे दर्शन घ्यावे, अशी प्रत्येक जैन धर्मियाची इच्छा असते- जशी जन्मात एकदा तरी काशीला जावे अशी प्रत्येक हिंदूची इच्छा असते काही जैन श्रावक तर वर्षातून एकशे आठ वेळा हा पर्वत चढतात व उतरतात जैनाच्या पर्युषण पर्वात हे श्रावक उपास करीत असतानाही पर्वत चढतात आषाढ पौर्णिमेपासून [illegible]

पर्वत चढत असताना देवकीच्या सहा मुलाच्या मूर्ती लागतात देवकीच्या पोटी आपला सहारक येणार आहे या भविष्यवाणीने भयग्रस्त झालेल्या कसाने या सहा मुलाची हत्या केली होती या मुलाच्या मूर्ती काळया सगमरवरी दगडाच्या आहेत. पर्वताच्या माथ्याच्या अलीकडे हनुमानाचे मंदिर लागते या ठिकाणी रस्ता दुभगतो उजवीकडचा फाटा उत्तरेकडील मदिराच्या समूहाकडे जातो आणि डावीकडील फाटा दक्षिणेकडील मदिराच्याकडे जातो एक उंच कमानीतून आपण आत प्रवेश करतो तेव्हा एक अतिभव्य दृश्य आपल्याला स्तिमित करते. कारण शेकडो मदिराची शिखरे व त्यावर हजारो लहान लहान शिखरे पाहून आपले डोळे दिपून जातात ही सर्व मदिरे अत्यत स्वच्छ आहेत पर्वताच्या शिखरावर असल्याने त्याना अत्यत मनोहर अशी पार्श्वभूमी लागली आहे मंदिरे पाहून आपण एकदम एका उच्च, उदात्त पातळीवर जातो पर्वताच्या माथ्यावर या प्रचड मदिर-समूहाभोवती तट आणि बुरुज असल्याने किल्ला आणि मदिरे याचे हे वेगळेच मिश्रण झाले आहे.

ज्या तीर्थंकराच्या मूर्ती या मदिरसमूहात पूजिल्या जातात, त्याची प्रथम माहिती घेऊ जैनांचे चोवीस तीर्थंकर असे आहेत : १ ऋषभदेव आणि आदिनाथ, २ अजितनाथ, ३ सभव, ४ अभिनदन, ५ सुमती, ६ पद्मप्रभा, ७ सुपर्श्व, ८ चद्रप्रभा, ९ पुष्पदत, १० सितला, ११ श्रेयास, १२ वसुपूज्य, १३ विमल, १४ अनत, १५ धर्म, १६ शातिनाथ, १७ कुंभुनाथ, १८. अरा, १९. मल्लि, २० मुनिसुव्रत, २१ नामी, २२. नेमिनाथ, २३ पार्श्वनाथ, २४ वर्धमान

या चोवीस तीर्थंकरांच्या मूर्ती वेगवेगळ्या रगाच्या असतात आणि प्रत्येक तीर्थंकराचे स्वतत्र चिन्ह असते हे चिन्ह मूर्तीच्या पायथ्याशी कोरलेले असते चोवीसपैकी सोळा तीर्थंकराच्या मूर्ती पिवळसर रंगाच्या, दोन रक्तवर्णीय, दोन निळ्या आणि दोन काळ्या रगाच्या असतात. ऋषभनाथ किंवा आदिनाथाचे चिन्ह वृषभ किंवा बैल हे आहे. अजितनाथाचे हत्ती, सभवचे घोडा, अभिनदनचे वानर, सुमतीचे शख, पद्मप्रभाचे कमळ, चद्रप्रभाचे चद्र, पुष्पदताचे सुसर, शातिनाथाचे हरण, मल्लिनाथाचे कुभ, वर्धमानाचे सिंह अशी काही चिन्हे आहेत

शत्रुंजय पर्वताच्या सपाट माथ्यावर आणि जवळच्या दरीत पांढऱ्या शुभ्र मंदिराची जी मालिका दिसते, तिला उद्देशून जेम्स ब्रजेस या ब्रिटिश लेखकाने म्हटले आहे की, "It is truly a wonderful, unique city place, a of temples Such a place is surely without a match in the world." (हे विलक्षण, एकमेव असे शहर केवळ मंदिरानी भरले आहे. असे दृश्य जगात इतर कोठेही दिसत नाही यात संशय नाही) शत्रुंजय पर्वताच्या उंचावर उभे राहून अग्नेयेकडे पाहिले तर आदिश्वर भगवान मंदिराचे उच्च, नक्षीदार शिखर एकदम नजरेत भरते हे शत्रुंजयवरील सर्वात महत्त्वाचे मंदिर त्याच्या पूर्वेला पुंडरिकाचे मंदिर दिसते. त्याच्याजवळ जोधपूरच्या मनेत नयनमताजी यानी १६२९ साली बांधलेले मंदिर दिसते त्याला नक्षीदार स्तंभाचा भव्य मंडप आहे त्याजवळच दिगंबर मंदिराचा भव्य घुमट दिसतो. मग अनेक लहान लहान मंदिरे आहेत. वाघनो पोलच्या (वाघ दरवाजा) पलीकडे दमणच्या हिराचंद रायकरण यानी १८०३ साली बांधलेले मंदिर दिसते त्याजवळच ईश्वर कुंड आहे. त्यानंतर सुगाला दरवाजा दिसतो त्यापलीकडे मोहिशा टूक आहे टूक म्हणजे मंदिराचा समूह लांबून पाहणाऱ्याला बालाभाई मंदिर आणि राम दरवाजाही दिसतात पर्वताच्या पायथ्याशी शत्रुंजय ही नदी वाहताना दिसते उत्तरेकडून दिसणाऱ्या विहंगम दृश्यात चौमुख मंदिर हे प्राधान्याने दिसते. जवळच सप्रती राजाने बांधलेला मंदिराचा समूह आहे पुंडरिक दरवाजाच्या दोन्ही बाजूला हत्तीचे पुतळे आहेत या दरवाजापलीकडे जो समूह आहे, त्याला खडतरवासी टूक म्हणतात. या चौकाला सोमजी चौक म्हणतात शवा सोमजी हा अहमदाबादचा धनिक श्रावक होता हा समूह १६१८ साली बांधण्यात आला आहे

पुंडरिक दरवाजाजवळ चौमुख मंदिर हे या पर्वतावरील एक अतिशय लक्षणीय असे भव्य मंदिर आहे पुंडरिक हा आदिश्वराचा गणधर होता या मंदिराचे मूळ मंदिर हे विक्रमादित्याने बांधले होते, पण पुढे ते नष्ट झाले सध्याचे मंदिर सुलतान नूरउद्दिन जहांगीर याच्या कारकीर्दीत सोमजी विजय राजा याने १६१८ साली बांधले या मंदिराचा चबुतरा दोन फूट उंच, ५७ फूट रुंद आणि ६७ फूट लांब आहे पूर्वेला एक मंडप आहे त्यापुढे ३१ फूट लांबीचे सभागृह आहे. कीर्तन, भजन यासाठी हे वापरण्यात

येते बारा नक्षीदार स्तभावर हे आधारलेले आहे त्यापैकी आठ स्तंभावर मदिराचा घुमट उभा आहे कलात्मक दृष्टीनेही हे मदिर अत्यत महत्त्वाचे आहे. बाहेरून पाहणाऱ्यावर सगमरवरी कोरीव कामाची चागलीच छाप पडते या मदिराच्या कळसाला जयपूर पद्धतीच्या नक्षीदार खिडक्या आहेत. स्तभावर गधर्व, किन्नर इत्यादींच्या सुबक मूर्ती कोरल्या आहेत माउट अबू येथील विमल शहा मदिराच्या धर्तीवर या मदिराची उभारणी करण्यात आली आहे मदिराचे गर्भगृह २३ फूट लाब व तितकेच रुद आहे मुख्य मूर्तीसाठी सगमरवरी सिंहासन करण्यात आले आहे त्याची उची दोन फूट व लाबीरुदी प्रत्येकी बारा फूट आहे या चबुतऱ्यावर आदिनाथांच्या चार मूर्ती एकमेकाना पाठीस पाठ लावून बसविण्यात आल्या आहेत म्हणून त्याला चौमुख मदिर म्हणतात मकराना येथील सगमरवरी दगडाच्या मूर्ती आहेत या मूर्तींना सोन्याचे मुकुट आहेत तसेच अगावरही सोने व हिरे चिकटवले आहेत मूर्तीच्या पायथ्याशी वृषभ हे आदिनाथाचे चिन्ह आहे गाभाऱ्याच्या भिंतीत आदिनाथाच्या ४४ लहान मूर्ती आहेत

खडतरवासी हूक या नावाने प्रसिद्ध असलेल्या मंदिराच्या समूहात १६१८ पासून दोनशे वर्षांच्या काळातील मदिरे आहेत. त्यापैकी शातिनाथाच्या मदिरात ४८ मूर्ती आहेत. ही मदिरे खिमजी सोमजी आणि लालाजी शिव या अहमदाबादच्या शाह लालाराज यांनी बाधले आहे या समूहातील एक मदिर- सहावे- हे अहमदाबादच्या शाह लालाराज याने बाधले आहे या मदिरात आदिनाथाच्या १९ मूर्ती आहेत जैन तीर्थंकराच्या सर्व मूर्ती जवळजवळ सारख्याच दिसतात. आपल्या देवात राम वेगळा, श्रीकृष्ण वेगळा, शकर वेगळा असे सहज लक्षात येते कारण त्या प्रत्येकाची वेगळी वैशिष्ट्ये आहेत. पण मूर्तीच्या पायथ्याचे चिन्ह वगळले, तर जैन तीर्थंकराच्या मूर्तीत फारच थोडा फरक असतो खडतरवासी हूकमध्ये एका मदिरात अडीच हजार पादुका आहेत एका मंदिरात पार्श्वनाथाच्या सहा मूर्ती आहेत हे मंदिर शाह हुकूमचद गगादास यानी बांधले आहे जिनदत्त सुरी यांच्या पादुका असलेले एक लहान मदिरही या हूकमध्ये आहे जैसलमेरचे भन्साळी पुनसी यानी बाधलेल्या मदिरात आदिनाथाच्या १४५२ पादुका आहेत. मूर्ती आणि पादुका याच्या या मोठ्या आकड्यामुळे ही मंदिरे कलात्मकदृष्ट्या बरीचशी एकसारखी वाटतात



## पालितानाची जैन मंदिरे

शत्रुंजय पर्वताच्या नैऋत्येला पांडवांची लहान मंदिरे आहेत. भीम, युधिष्ठिर, अर्जुन, नकुल व सहदेव यांच्याबरोबर द्रौपदी आणि कुंती यांचीही मंदिरे येथे आहेत. ही मंदिरे शाह दलीचंद किकावाला यांनी १७२१ साली बांधली. त्याजवळच्या मंदिरात सहस्रकूट पर्वताच्या १०२४ प्रतिमा आहेत. त्या १८०३ साली सुरतच्या शाह खुशालचंद यांनी स्थापन केल्या. त्यानंतर अहमदाबादच्या शेठ शंकरचंद यांचे टूंक आहे. शत्रुंजय पर्वतावर मंदिरे बांधणे हे जैनांना महापुण्यप्रद वाटत आसल्याने अनेक धनिकांनी या पर्वतावर जेथे जागा मिळेल, तेथे लहान-मोठी मंदिरे बांधली आहेत. शेवटी सर्व पर्वतमाथा मंदिरांनी भरून गेल्यावर मोतीशा यांनी पर्वताची दरीही

मदिरानी व्यापून टाकली

चौमुखच्या दक्षिणेस चिपवासी हूक आहे ही तीन मदिरे असून १७३१ सालाची आहेत. सकरचद प्रेमचद हूकच्या दक्षिणेस अहमदाबादच्या हेमभाई वावरचद याचा मदिरसमूह आहे त्यातील मुख्य मदिर नदिश्वर द्वीप हे आहे या समूहाच्या बाहेर मोदी प्रेमचद आणि रतनचद जव्हेरचद याचा मदिरसमूह आहे त्यातील मध्यवर्ती मदिर हे भव्य आकाराचे असून ते जरी जैन मदिर असले तरी त्याच्या मडपात भवानी, गणपती आणि इतर हिंदू देवदेवताच्या मूर्ती आहेत या मदिरात आदिश्वराच्या ६८ मूर्ती आहेत. १७८६ सालचा हा मंदिरासमूह आहे झवेरचद रतनचंद यानी बांधलेले हे मदिर निळसर सगमरवराचे असून अतिशय देखणे आहे. जमीन काळया व पांढऱ्या सगमरवराची आहे बारा नक्षीदार स्तभावर मुख्य मडप उभारला आहे.

या पर्वतावर लक्षात राहण्यासारख्या ज्या काही मूर्ती आहेत, त्यात आदिबुद्धाची चौदा फूट उंच मूर्ती आहे. एक प्रचड खडक कोरून ही मूर्ती तयार करण्यात आली आहे हा खडक अठरा फूट उंच आहे ही मूर्ती पाढऱ्या रगाने रगवली आहे. मूर्तीच्या भव्य आकारामुळे ती भीम पाडव या नावानेही ओळखली जाते. ही मूळ मूर्ती शेकडो वर्षांपूर्वी उघड्यावर होती. तिच्यावर नतर मदिर बांधण्यात आले आहे

या प्रचड मूर्तीजवळच्या उचवट्यावरून जवळच्या दरीतील बाळाभाई हूक व मोतीशा हूक यांचे अविस्मरणीय दर्शन घडते या दोन्ही हुकातील मदिरे पाढऱ्याशुभ्र सगमरवराची, अप्रतीम सुदर नक्षीची व भव्य आहेत दरीतील हिरव्यागार झाडीच्या पार्श्वभूमीवर तर ती फारच उठून दिसतात बाळाभाई हूकचा समूह १५१ × १०८ फूट चौकात उभा आहे त्याच्याभोवती गोल बुरुज व तट आहे मुबईचे शाह कल्याणजी कानडी यानी १८३६ साली हा मदिरसमूह बांधला त्याची उभारणी चौमुख मदिरसमूहाच्या धर्तीवर आहे मुख्य मंदिराला दोन मजले आहेत या मदिरात दगडाच्या ३४ व धातूच्या दोन मूर्ती असून एक विश्वचक्र व नवग्रहाचा ताम्रपट आहे. रगमंडपात सर्व चोवीस तीर्थंकराच्या मूर्ती आहेत वरच्या मजल्यावर चौमुखाच्या अठरा मूर्ती आहेत मुख्य दरवाजाजवळ चक्रेश्वरी माता आणि गोमुख यक्ष यांच्या मूर्ती आहेत प्रवेशद्वाराचे मदिर

पुडरिकाचे आहे. या मुख्य मदिराच्या उत्तरेस शीतलनाथाचे मदिर आहे. जवळच श्रावकानी स्थापन केलेल्या १२३ मूर्ती आहेत.

मोतीशा हूक हा शत्रुजय पर्वतावरील एक महत्त्वाचा आणि विशेष सुदर असा मदिरसमूह आहे मुबई येथे शेठ मोतीशा अमीचद हे फार मोठे व्यापारी राहत होते त्याच्या जहाजाचा परदेशाशी व्यापार होता १८३४ साली त्याच्या एका जहाजातून चोरट्या मालाची वाहतूक होते असा त्याच्यावर आरोप करण्यात आला तेव्हा मोतीशा यानी जाहीर केले की हा आरोप पूर्णपणे खोटा आहे. हे जहाज जेव्हा मुबईला येईल तेव्हा सरकारने त्याची तपासणी करावी असे आव्हान त्यानी दिले. इतकेच नव्हे, तर या जहाजावरील मालाची जी किंमत येईल तो सर्व पैसा आपण शत्रुजय पर्वतावर मदिरे बाधण्यासाठी खर्च करू असेही त्यानी जाहीर आश्वासन दिले जहाज मुबईस आले तेव्हा त्यावर काहीही आक्षेपार्ह सापडले नाही मात्र मोतीशा यानी आपल्या वचनाला जागून या मालाच्या विक्रीतून आलेले पाच लाख रुपये खर्चून १८३५-३६ साली हा मदिरसमूह बाधला कलेच्या दृष्टीने हा मदिरसमूह विशेष लक्षणीय आहे मोतीशा यानी हा ट्रक बाधण्याचे ठरवले तेव्हा पर्वताखाली सर्व जागा भरल्या होत्या म्हणून त्याना शेजारच्या दरीकडे आपले कार्य न्यावे लागले

मोतीशा हूकची लाबी २३१ फूट व रुदी २२४ फूट आहे सभोवती भक्कम तट असून त्याला बुरुज आहेत. पूर्वेकडे भव्य दरवाजा व त्यावर मनोरा आहे या समूहातील मुख्य मदिर पाढऱ्या सगमरवरी दगडाचे व दुमजली आहे. त्यावरील नक्षी अत्यत सुदर व मनोहर आहे. बालाभाई मदिराच्या धर्तीवरच हे मदिर बाधण्यात आले आहे. मदिराचा चबुतरा ८१ फूट × ६७ फूट आहे प्रवेशद्वाराच्या पायऱ्याजवळ दोन लहान मदिरे आहेत. त्यास चक्रेश्वरी माता आणि गोमुख यक्ष याच्या मूर्ती आहेत त्यापूर्वी पोर्च व नक्षीदार तोरण लागते. या मदिरात २२५ प्रतिमा आहेत मुख्य मूर्ती ही चौमुखमधील मूर्तीइतकी मोठी नसली तरी तिच्या डोकीवर मौलिक सुवर्ण मुकुट आहे मुख्य मदिराच्या दोन्ही बाजूला दोन लहान मदिरे आहेत. तसेच चार कोपऱ्याना आणखी चार लहान मदिरे आहेत उत्तरेकडील दरवाजावरचे मदिर सुरतच्या खुशालचद ताराचद यानी बाधले असून त्यात गणधराच्या १५४२ पादुका आहेत. उत्तरेला आदिनाथाच्या पादुकाचे मदिर आहे हे मदिर मोतीशाच्या चिरजीवाने

बाधले आहे. या मदिराच्या आवारात अनेक धनिकानी लहान लहान मदिरे बाधलेली आहेत. या आवाराबाहेरही देवचद कल्याणचद आणि शाह मानचद वल्लभदास यानी १८३६ व १८४६ साली बाधलेली लहान पण सुदर मदिरे आहेत. भीम पाडव मदिराच्या उचवट्यावरून मोतीशा हूकचे दृश्य विशेष लोभसवाणे दिसते

मोतीशा हूकच्या तटबदीच्या अग्नेय बाजूच्या दरवाजातून आपण हिराचरण रायकरण मदिराजवळ येतो या ठिकाणी आल्यावर सूर्य वर येऊन तासभरच झाला होता त्यामुळे त्याचे किरण त्रासदायक न वाटता उलट आल्हाददायकच वाटत होते तीन शिखराचे हे मदिर दमणच्या हिराचद रायकरण यानी १८०३ साली बाधले. शातिनाथाच्या या टुमदार मदिराला सुदर द्वारमडप (पोर्च) आहे तेथे पधरा मिनिटे विश्राती घेऊन व ताजेतवाने होऊन आम्ही पुढील समूहाकडे वळलो

या समूहाला विमलवासी हूक असे नाव आहे त्याच्याआधी एक लहानसा जलाशय आहे पालितानाचा पहिला गोहिल राजा नोगन याने हा तलाव खणला. उजव्या हाताला वाघ दरवाजा आहे. या दाराजवळ वाघ व हनुमान याच्या प्रतिमा आहेत या दरवाजातून आत गेल्यावर विमलवास हूक लागतो या हूकमध्ये भूलौनी मदिर हे महत्त्वाचे आहे भूलौनी म्हणजे भूलभुलैय्या पण नावाप्रमाणे तेथे अशी काही गुतागुतीची, चकविण्याची व्यवस्था नाही लखनौ येथे मात्र बडा इमाममध्ये प्रेक्षकाला चक्रावून टाकणारी भूलभुलैय्या व्यवस्था आहे चितोडच्या दोशी करम शहा यानी या समूहातील एक मदिर बाधले. (१५३०) आणि नतर १७६४ साली सुरतच्या ताराचद सघवी यानी आणखी एक मदिर स्थापन केले या दुसऱ्या मदिरात वाघावर बसलेल्या वाघिश्वरी मातेची मूर्ती आहे पहिल्या मदिरात चक्रेश्वरी मातेची मूर्ती आहे या समूहातील काही मदिरे वेगवेगळ्या वेळी बाधलेली आहेत अर्थात हे शत्रुजयवरील सर्वच मदिराना लागू आहे भूलौनीमध्ये सुपार्श्वनाथाचे एक मदिर आहे या हूकमध्ये एक जुनी इमारत आहे ती अहमदाबादच्या सघवी रूपजी यानी १६१८ मध्ये बाधली आहे ती मदिराच्या पुजाऱ्यासाठी बाधली असावी मात्र या इमारतीचे काही भाग बाराव्या शतकातील आहेत त्यावरून सघवी रूपजी यानी जुन्या इमारतीची पुनर्बांधणी केली असावी असे दिसते या हूकमधील मध्यवर्ती मदिरात अनेक आकाराच्या तीर्थंकराच्या मूर्ती आहेत

जवळच एक लहान जलाशय आहे. पण त्याचा बराच भाग झाकला आहे. त्याला मोठी विहीर असेही म्हणता येईल

भुलौनीकडून आपण पश्चिमेकडे जातो तेव्हा एक पाढरे शुभ्र, घुमटाचे मदिर लागते त्याला जाळीच्या भिंती आहेत ग्वाल्हेरचे शाह वीरधीचद यानी १८५२ साली हे बाधले मदिराच्या आत आणखी एक सगमरवरी मदिर आहे. आतील मदिराच्या एका बाजूला मेरू अष्टपाद रावणाची प्रतिमा कोरलेली आहे तर दुसऱ्या बाजूला समेव शिखर चिनी शैलीने कोरलेले आहे जैन परपरेहून दोन्ही कोरीव कामे वेगळी वाटतात गर्भ मदिरात पार्श्वनाथ व चद्रप्रभा याच्या मूर्ती आहेत. पार्श्वनाथाची मूर्ती निळसर आहे तर आठवे तीर्थंकर चद्रप्रभा याची मूर्ती पाढऱ्या सगमरवरी दगडाची आहे. या मदिराच्या उजवीकडे जे मोठे मदिर आहे, त्याचा विशेष असा की त्याला पाच गर्भगृहे आहेत हे मदिर १७५८ साली भावनगरचे शाह कुवरजी लाढा यानी बाधले. त्याजवळचे जे दुसरे मोठे मदिर आहे, ते अजमेरचे मोतीचद शिवचद यानी बाधले ते मदिर धर्मनाथाचे आहे नतरचे चद्रप्रभा मदिर पाटणाचे शाह मिठाचद यानी १८१२ साली बाधले आहे त्याजवळच सभवनाथाचे मदिर आहे सभवनाथ याचे चिन्ह अश्व हे आहे त्याना पार्श्वनाथ पर्वतावर मोक्ष मिळाला याच समूहात शतस्तभ देवालय आहे महावीर स्वामी याचे हे मदिर जोधपूरच्या जेतवाला यानी १६२९ साली बाधले. वास्तविक या मदिरात एकदर ६४ च स्तभ आहेत पण ते शतस्तभ या नावाने प्रसिद्ध आहे महावीरस्वामींची या मदिरातील मूर्ती चौमुखी आहे या समूहाजवळच सुमतीनाथ व जगत् शेठ ही मदिरे आहेत सुमतीनाथाचे चिन्ह शख हे आहे त्याचा जन्म अयोध्येत झाला होता व त्याना समेत शिखरावर मोक्ष मिळाला.

जैन धर्मियाचे सर्वात महत्त्वाचे तीर्थक्षेत्र म्हणजे शत्रुजय आणि शत्रुजयवरील सर्वात महत्त्वाचे मदिर म्हणजे मूळनायक श्री आदिश्वर भगवान मदिर, हात्तीपोटा दरवाजातून गेल्यावर आणखी एक लहान दरवाजा लागतो त्यातून गेल्यावर या भव्य मदिराच्या प्रागणात आपण येतो. हे महान मदिर प्रामुख्याने इतर मदिराच्याच धर्तीवर बाधलेले आहे पाढऱ्या शुभ्र सगमरवरी दगडाचे, उत्कृष्ट नक्षी व अनेक मूर्तींनी युक्त असे हे दुमजली मदिर कलात्मक आहे त्याच्या शिखरावर शेकडो लहान लहान शिखरे आहेत. दोन फूट उचीचा चबुतऱ्यावर बाधलेल्या या मदिराचे दर्शनी तोरणही अत्यत कलापूर्ण आहे

जवळच एक लहान जलाशय आहे पण त्याचा बराच भाग झाकला आहे त्याला मोठी विहीर असेही म्हणता येईल

भुलौनीकडून आपण पश्चिमेकडे जातो तेव्हा एक पाढरे शुभ्र, घुमटाचे मदिर लागते त्याला जाळीच्या भिंती आहेत ग्वाल्हेरचे शाह वीरधीचद यानी १८५२ साली हे बाधले मदिराच्या आत आणखी एक सगमरवरी मदिर आहे आतील मदिराच्या एका बाजूला मेरू अष्टपाद रावणाची प्रतिमा कोरलेली आहे तर दुसऱ्या बाजूला समेव शिखर चिनी शैलीने कोरलेले आहे. जैन परपरेहून दोन्ही कोरीव कामे वेगळी वाटतात गर्भ मदिरात पार्श्वनाथ व चद्रप्रभा याच्या मूर्ती आहेत पार्श्वनाथाची मूर्ती निळसर आहे तर आठवे तीर्थंकर चद्रप्रभा याची मूर्ती पाढऱ्या सगमरवरी दगडाची आहे या मदिराच्या उजवीकडे जे मोठे मदिर आहे, त्याचा विशेष असा की त्याला पाच गर्भगृहे आहेत हे मदिर १७५८ साली भावनगरचे शाह कुवरजी लाढा यानी बाधले त्याजवळचे जे दुसरे मोठे मदिर आहे, ते अजमेरचे मोतीचद शिवचद यानी बाधले ते मदिर धर्मनाथाचे आहे नतरचे चद्रप्रभा मदिर पाटणाचे शाह मिठाचद यानी १८१२ साली बाधले आहे त्याजवळच सभवनाथाचे मदिर आहे सभवनाथ याचे चिन्ह अश्व हे आहे त्याना पार्श्वनाथ पर्वतावर मोक्ष मिळाला याच समूहात शतस्तभ देवालय आहे. महावीर स्वामी याचे हे मदिर जोधपूरच्या जेतवाला यानी १६२९ साली बाधले वास्तविक या मदिरात एकदर ६४ च स्तभ आहेत पण ते शतस्तभ या नावाने प्रसिद्ध आहे. महावीरस्वामीची या मदिरातील मूर्ती चौमुखी आहे या समूहाजवळच सुमतीनाथ व जगत् शेठ ही मदिरे आहेत सुमतीनाथाचे चिन्ह शख हे आहे त्याचा जन्म अयोध्येत झाला होता व त्याना समेत शिखरावर मोक्ष मिळाला.

जैन धर्मियाचे सर्वात महत्त्वाचे तीर्थक्षेत्र म्हणजे शत्रुजय आणि शत्रुजयवरील सर्वात महत्त्वाचे मदिर म्हणजे मूळनायक श्री आदिश्वर भगवान मदिर, हाथीपोटा दरवाजातून गेल्यावर आणखी एक लहान दरवाजा लागतो त्यातून गेल्यावर या भव्य मदिराच्या प्रागणात आपण येतो हे महान मदिर प्रामुख्याने इतर मदिराच्याच धर्तीवर बाधलेले आहे पाढऱ्या शुभ्र सगमरवरी दगडाचे, उत्कृष्ट नक्षी व अनेक मूर्तींनी युक्त असे हे दुमजली मदिर कलात्मक आहे त्याच्या शिखरावर शेकडो लहान लहान शिखरे आहेत. दोन फूट उचीचा चबुतऱ्यावर बाधलेल्या या मदिराचे दर्शनी तोरणही अत्यत कलापूर्ण आहे.

दर्शनी शिखराच्या मागे आणखी एक उच शिखर आहे व त्यावर ध्वज आहे. या मंदिराच्या भोवती अनेक लहान लहान मदिरे निरनिराळ्या काळात विविध भक्तांनी बाधलेली आहेत त्यामुळे दर्शनी बाजूखेरीज या मदिराच्या सौंदर्याचे नीट रसग्रहण इतर बाजूनी करता येत नाही, इतकी ही इतर मदिरे मुख्य मदिराच्या जवळ बाधलेली आहेत आदिश्वर मदिरावरील नक्षी इतकी सुदर व सूक्ष्म आहे की प्रथम ती लाकडावर कोरून मग दगडावर हिची प्रतिकृती कोरली असावी असा तज्ज्ञाचा अदाज आहे.

गाभाऱ्यातील ऋषभनाथाची मूर्ती भव्य आहे पद्मासन घालून बसलेल्या या मूर्तीखाली त्याचे वृषभ हे चिन्ह आहे. दोन्ही बाजूना दोन श्रावक व त्यावर पद्मासन घातलेल्या दोन लहान मूर्ती आहेत ऋषभदेवाच्या डोईवर सोन्याचा मुकुट व अगावरही सोन्यामोत्याचे दागिने आहेत आसनाखाली हत्ती व सिंह कोरलेले आहेत डोक्याच्या मागे हत्ती, हस व यक्षगणाच्या लहान सगमरवरी मूर्ती आहेत या मुख्य मूर्तीशिवाय या मदिरात तीर्थंकरांच्या ५५ लहान मूर्ती आहेत रगमडपातही १०० मूर्ती आहेत. दरवाजाजवळ हत्तीवर बसलेल्या नाभिराज व मरुदेवी याच्या मूर्ती आहेत. वरच्या मजल्यावर तीर्थंकरांच्या तेहतीस मूर्ती आहेत त्याशिवाय गौतमस्वामी, महालक्ष्मी आणि दोन तपस्विनी याच्या मूर्तीही वरच्या मजल्यावर आहेत मडपात तीर्थंकराच्या ९३ मूर्ती आहेत

ऋषभनाथाचे अनेक नावे आहेत. आदिनाथ, नाभेय, युगधिजिन, ऋषभदेव, कौसालिका, आदिश्वर व वृषभसेन या नावानी ते जैनाना पूज्य आहेत नाभी आणि मरुदेवी याचे ते पुत्र. त्याचा वर्ण पिवळा किंवा सोनेरी आहे कल्पसूत्र या ग्रथानुसार ऋषभदेव याचा जन्म अयोध्येत झाला. ते प्रथम राजा, प्रथम भिक्षाकार, प्रथम तीर्थंकर आहेत अष्टपाद पर्वतावर त्यांना मोक्षप्राप्ती झाली शत्रुजयवरील ऋषभदेवाची मूर्ती बाहुबलींनी स्थापन केली असल्याने ती विशेष पवित्र आहे

शत्रुजयवरील आदिश्वर मदिर निरनिराळ्या वेळी बाधले गेले पहिले आदिश्वर मदिर भरताने बाधले. त्यानतरचे मदिर भरताच्या आठव्या पिढीतील दडविर्याने बाधले तिसरे इसनेंद्रने बाधले चौथे मदिर महेंद्र, यानतर पाचवे ब्रिमिंद्राने बाधले, सहावे भवरथीने आणि सातवे सागर चक्रवर्तीने बाधले

आठवे विनितेंद्रने आणि नववे चद्रजसने बाधले दहावे चक्रायुधाने, अकरावे राजा तामचद्राने, बारावे पाडा बधूनी आणि तेरावे मदिर काश्मीरचा व्यापारी जावडा शहाने उभारले हे मदिर विक्रमादित्यानतर शभर वर्षांनी बाधले गेले बहिरदेव मेहता यानी चौदावे आणि समर सारग यानी इ. स. १३७१ साली पधरावे मदिर बाधले चितोडचे मत्री कर्मदोशी यानी १५७८ साली सोळावे आदिश्वर मदिर बाधले यापैकी काहींनी पूर्वीच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला तर काहींनी मदिर सपूर्णपणे पुन्हा बाधले मात्र सुरुवातीच्या काही जणाच्या नोंदी या इतिहासावर आधारित नसून धर्मग्रथावर आधारित आहेत काही वेळा मोगलानी मदिर नष्ट केल्याने ते पुन्हा बाधण्यात आल्याच्या जुन्या ऐतिहासिक कागदपत्रात नोंदी आहेत या मदिरातील एका शिलालेखात म्हटले आहे की, 'आदिश्वराचे हे मदिर बाधण्यात बहादुर शहाच्या कारकीर्दीत सवत १५८२ साली सुरुवात झाली दोशी कर्मशहा यानी हे मदिर बाधले आदिश्वर हे आमचे देव असून सर्वांचे मालक आहेत'

या पर्वतावर केलेले पुण्य शतपटीने वाढते आणि येथील वृक्ष म्हणजे कल्पवृक्षच आहेत, असे जैनधर्मीय मानतात जैन धर्मग्रथानुसार या पर्वताचा राजा कुभ हा होता त्याने सर्व शत्रू गिळून टाकले. त्याप्रमाणेच या पर्वतावर आदिश्वराचे दर्शन घेणाऱ्याची सर्व पापे नष्ट होतात या मदिराचे सस्थापक दोशी कर्म शहा हे बापाभाई नावाच्या सन्याशाला भेटण्यासाठी सपत्नीक गेले असता बापाभाईंनी उपदेश केली की पार्थीव सपत्ती अपार आहे, तू या सपत्तीचा उपयोग आदिश्वराचे मदिर बाधण्यासाठी कर. हा उपदेश मान्य करून दोशी कर्म शहा यानी अफाट पैसा खर्च करून हे मदिर बाधले आदिश्वर मदिरात खबायत येथील एक सुवर्णकार श्री. तेजपाल यानी जी भर घातली, तिचा उल्लेख मदिराच्या दुसऱ्या प्रवेशद्वारामधील शिलालेखात करण्यात आला आहे त्यानी या आवारात चैत्य व काही मदिरे बाधली. तसेच त्यानी अनेक सुवर्ण अलकार व सोन्याची भाडीही मदिरास दिली तेजपाल यानी १५८८ ते १५९३ या काळात हे धार्मिक कार्य केले आदिश्वर मदिराच्या आवारात शेषकूट व सहस्रकूट मदिरे आहेत ती दीवच्या गोविंदजी सघवी यानी बाधली आहेत

शेषकूटच्या पश्चिमेस जे लहानसे चौमुख मदिर आहे, ते सुरत येथील रूपचद यानी १७९१ मध्ये बाधले त्याजवळच समेत शिखर मदिराचे आवार

आठवे विनितेंद्रने आणि नववे चद्रजसने बाधले दहावे चक्रायुधाने, अकरावे राजा तामचद्राने, बारावे पाडा बधूनी आणि तेरावे मदिर काश्मीरचा व्यापारी जावडा शहाने उभारले हे मदिर विक्रमादित्यानतर शभर वर्षांनी बाधले गेले बहिरदेव मेहता यानी चौदावे आणि समर सारग यानी इ स १३७१ साली पधरावे मदिर बाधले चितोडचे मत्री कर्मदोशी यानी १५७८ साली सोळावे आदिश्वर मदिर बाधले यापैकी काहींनी पूर्वीच्या मदिराचा जीर्णोद्धार केला तर काहींनी मदिर सपूर्णपणे पुन्हा बाधले मात्र सुरुवातीच्या काही जणाच्या नोंदी या इतिहासावर आधारित नसून धर्मग्रथावर आधारित आहेत. काही वेळा मोगलानी मदिर नष्ट केल्याने ते पुन्हा बाधण्यात आल्याच्या जुन्या ऐतिहासिक कागदपत्रात नोदी आहेत या मदिरातील एका शिलालेखात म्हटले आहे की, 'आदिश्वराचे हे मदिर बाधण्यात बहादुर शहाच्या कारकीर्दीत सवत १५८२ साली सुरुवात झाली. दोशी कर्मशहा यानी हे मदिर बाधले आदिश्वर हे आमचे देव असून सर्वांचे मालक आहेत'

या पर्वतावर केलेले पुण्य शतपटीने वाढते आणि येथील वृक्ष म्हणजे कत्रपवृक्षच आहेत, असे जैनधर्मीय मानतात जैन धर्मग्रथानुसार या पर्वताचा राजा कुभ हा होता. त्याने सर्व शत्रू गिळून टाकले त्याप्रमाणेच या पर्वतावर आदिश्वराचे दर्शन घेणाऱ्याची सर्व पापे नष्ट होतात या मदिराचे सस्थापक दौशी कर्म शहा हे बापाभाई नावाच्या सन्याशाला भेटण्यासाठी सपत्नीक गेले असता बापाभाईंनी उपदेश केली की पार्थीव सपत्ती अपार आहे, तू या सपत्तीचा उपयोग आदिश्वराचे मदिर बाधण्यासाठी कर. हा उपदेश मान्य करून दौशी कर्म शहा यानी अफाट पैसा खर्च करून हे मदिर बाधले आदिश्वर मदिरात खबायत येथील एक सुवर्णकार श्री तेजपाल यानी जी भर घातली, तिचा उल्लेख मदिराच्या दुसऱ्या प्रवेशद्वारामधील शिलालेखात करण्यात आला आहे त्यानी या आवारात चैत्य व काही मदिरे बाधली तसेच त्यानी अनेक सुवर्ण अलकार व सोन्याची भाडीही मदिरास दिली तेजपाल यानी १५८८ ते १५९३ या काळात हे धार्मिक कार्य केले आदिश्वर मदिराच्या आवारात शेषकूट व सहस्रकूट मदिरे आहेत ती दीवच्या गोविंदजी सघवी यानी बाधली आहेत.

शेषकूटच्या पश्चिमेस जे लहानसे चौमुख मदिर आहे, ते सुरत येथील रूपचद यानी १७९१ मध्ये बाधले त्याजवळच संमेत शिखर मदिराचे आवार

आहे. तेथे एक अष्टकोनी स्तूप असून एक मडप आहे मडपात यक्ष, किन्नर वगैरेंच्या २६ सगमरवरी मूर्ती आणि काही पादुका आहेत. त्यामागे अगदी झळझळीत पाढऱ्या सगमरवराचे सुदर मदिर आहे तेही आदिश्वराचे असून अहमदाबादचे दलपतभाई भगुभाई यानी १५३० साली बाधले. आदिश्वर मदिराच्या उत्तरेस मदिर स्वामीचे देवालय आहे काहीजण त्यानाही तीर्थंकर मानतात पण जैन धर्मशास्त्राच्या अधिकृत यादीत त्याचे नाव नाही अहमदाबादच्या शाह चापसी ओसवाल यानी १६०० साली हे स्वामी मदिर बाधले या चौकाच्या एका कोपऱ्यात शातिनाथ मदिर आहे, ते गाधारियाच्या रामजींनी बाधले असल्याने रामजी मदिर या नावानेही ओळखले जाते मुख्य दरवाज्याजवळ पुडरिक स्वामी याचे मदिर आहे शत्रुजय पर्वतावरील मदिरे पाहण्यासाठी दोन ते अडीच तास लागतात

पूर्वेकडील दरवाजाच्या एका बाजूला एक दर्गा आहे हेंगर या मुसलमान पिराचा हा दर्गा आहे त्यामुळे जैनाच्या प्रमाणेच काही मुस्लिम धर्मीयही या शत्रुजय पर्वतावर भक्तिभावाने येतात.

या दर्ग्यांच्या एका बाजूला मडक्यातून दही विकणाऱ्या बायका बसलात पर्वत चढ्याचे व मदिराचे विस्तीर्ण आवार पाहून जे श्रम होतात, ते निवारण्यासाठी येथे येणारे लोक दही खातात ते प्रकृतीला थड व सात्त्विक असते एक नवीन धर्मस्थान उभारण्यात आले आहे, या मदिराचा आकार अगदी वेगळा व लक्षात राहण्यासारखा आहे. त्याचे नाव '१०८ जैन तीर्थ दर्शन भवन' असे आहे एक कोटी रुपये खर्चून १९५६ साली हे बाधण्यात आले हे चार मजली मदिर गोलाकार असून त्याला वरपर्यंत जाण्यासाठी बाहेरून जिने आहेत. शिखरावर कळसाऐवजी वेली व फुले आहेत व जैन तीर्थंकराची मूर्ती आहे वीस हजार वार इतकी विस्तृत जमीन या मदिराच्या आवाराने व्यापली आहे सपूर्ण भारतात जैनाची जी १०८ तीर्थे आहेत, त्याचे सुभग दर्शन या महामदिरात होते मदिराचे आवार अतिशय स्वच्छ व सुदर ठेवण्यात आले असून ग्रथालय व धार्मिक कार्य करण्याची कचेरी वगैरे व्यवस्था उत्तम आहे अनेक जैन मुनींची तैलचित्रे या महामदिरात ठेवण्यात आली आहेत

❑

# १३. साहित्य, संगीत, नृत्य, सण व यात्रा

गुजरातची लोकनृत्ये व लोकसंगीत यांना श्रीकृष्णाच्या कालापासूनची दीर्घ परपरा आहे श्रीकृष्ण गोपींच्याबरोबर रासक्रीडा करीत असे नटवर हे श्रीकृष्णाचे नाव त्याच्या या नृत्यनैपुण्यावरून पडले आहे गुजरातेत आज सर्वत्र प्रसृत असलेले रासनृत्य हजारो वर्षांचे आहे तसेच गर्बानृत्याचा उगम श्रीकृष्णाची नात-सून उषा हिच्यापासून झाला आहे उषाने द्वारकेच्या गौळणींना गर्बा शिकवला व आज गुजरातेतील सर्वात लोकप्रिय नृत्यप्रकार हे मानाचे स्थान गर्बा नृत्याला मिळाले आहे गुजरातचे आद्य कवी व सत हे उत्तम सगीतज्ञ होते नरसी मेहता यांनी सावकाराकडून घेतलेल्या कर्जाला गहाण म्हणून आपला राग केदार ठेवला होता अशी आख्यायिका आहे तानसेनचा समकालीन गुजराती गायक बैजू बावरा मध्य गुजरातमधील चपानेरचा होता. बैजू बावराने एका जुगलबदीत तानसेनचाही पराभव केला होता. राग दीपक गायल्यामुळे तानसेनच्या अगाची उष्णतेने लाहीलाही झाली, तेव्हा तो गुजरातच्या वडनगरला आला व तेथील ताना रिरी या गायिकांनी मल्हार राग गाऊन पाऊस पाडला व तानसेनची उष्णता घालविली अशी आख्यायिका आहे

उत्तर भारतीय शास्त्रोक्त संगीतातील अनेक रागाची नावेही गुजरातमधील ठिकाणाच्या नावावरून पडली आहेत. राग बिलावताचे मूळ वेरावळमध्ये आहे, राग सोरठीचे सोरठमध्ये व राग खबायती हे नाव खबायतवरून आले आहे. लोकनाट्यात भवई हा गुजरातचा खास प्रकार प्रसिद्ध आहे सस्कृतमधील 'भाव' वरून भवई हे नाव आले आहे आपल्याकडील तमाशाच्या जवळपास भवई हा प्रकार येतो विडबन, सगीत व नृत्य याचे गमतीदार मिश्रण भवईत असते गुजरातचे राजे सगीत, नृत्यनाट्य याचे मोठे आश्रयदाते व रसिक होते. त्यामुळे या कलाची गुजरातीत भरपूर वाढ झाली पारशी जमातीने स्वत च्या 'पार्शी थिएटर' हा नाट्यप्रकार विकसित केला आहे. गुजराती थिएटर व पार्शी थिएटर हे गुजरातीत दोन मुख्य नाट्यप्रकार आहेत गुजराती थिएटर हे

स्थानिक प्रश्न व लोक यातून विकसित झाले आहे तर पार्शी थिएटरवर पाश्चात्य नाटकांचा विशेष प्रभाव आहे

भारतातील सण, उत्सव आणि जत्रा या मुख्यत· दोन गोष्टींशी निगडित असतात ऋतूतील बदल ही एक व देवदेवतांचे ठरलेले दिवस ही दुसरी नवे पीक आल्यावर सण साजरा करावयाचा ही भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वच देशाची अनादी कालापासूनची परंपरा आहे. उत्तम धान्य दिल्याबद्दल परमेश्वराचे आभार मानण्याची ही रीत आहे. उत्तर भारतात दसरा, बगालमध्ये कालीपूजा, दक्षिणेत ओनम ही याची उदाहरणे आहेत गुजरातमध्ये प्राय· वर्षभर कसले ना कसले सण व उत्सव चालूच असतात पावसाळ्याचे काही दिवस त्यात थोडा खड पडतो एवढेच इग्रजी वर्षाच्या सुरुवातीला म्हणजे मकरसंक्रातीला किवा १४ जानेवारी रोजी गुजरातेत साजरा होणारा महोत्सव म्हणजे पतग उडविण्याचा. पतग उडविण्याच्या कलेला गुजरातएवढे महत्त्व जगाच्या इतर कोणत्याही भागात नाही या उत्सवाची तयारी गुजरातमध्ये महिना महिनाभर आधी सुरू होते, पतग काटण्याच्या चढाओढी आखण्यात येतात, आपला पतग सर्वात डौलदार व गतिमान व्हावा म्हणून श्रम घेण्यात येतात, दुसऱ्याचे पतंग सुलभतेने काटता यावेत म्हणून काच कुटून तिचा मांजा करून तो दोऱ्याला लावण्यात येतो जास्तीत जास्त उच जागी जाऊन आपला पतग उडविण्यात अहमहमिका सुरू होते. मकर सक्रातीच्या दिवशी गुजरातभर व विशेषत: अहमदाबाद, बडोदा, सुरत, राजकोट, भावनगर अशा प्रमुख शहरात लक्षावधी पतगानी आकाश झाकोळून जाते. या पतंग महोत्सवाचे धावते वर्णन नभोवाणीवर देण्यात येते व दूरदर्शनवरही हा आगळावेगळा महोत्सव दाखविण्यात येतो भारताच्या निरनिराळ्या भागातून व काही परदेशातूनही हौशी लोक त्या दिवशी गुजरातमध्ये येऊन या उत्सवाचे व पतंग काटण्याच्या चढाओढीचे चित्रपट काढतात. यशस्वी पतंग मालकास चादीच्या ढाली, पेले वगैरे पारितोषिके देण्यात येतात मकरसक्रात हा सण गुजरातमध्ये पतगाच्या या महोत्सावामुळे सर्वत्र उत्साही वातावरण निर्माण करतो

त्यानंतर फेब्रुवारीमध्ये महाशिवरात्र येते. जुनागडमध्ये गिरिनार पर्वताच्या पायथ्याशी वस्त्रपटक्षेत्र आहे तेथे महाशिवरात्रीत भावनाथ यात्रा

भरते या क्षेत्राची कथा अशी आहे की, शकर आणि पार्वती गिरिनार पर्वताला जात असता त्याची कांही वस्त्रे या ठिकाणी पडली तेथे नतर मदिर बांधण्यात आले व म्हणून त्याचे नाव 'वस्त्रपट' असे पडते महाशिवरात्रीस या ठिकाणी पाच दिवस मोठी जत्रा भरते त्यावेळी भाविक लोक मृगकुडात स्नान करतात व शिवाची पूजा करतात शिवरात्रीस शिवाची महापूजा होते त्यावेळी हत्तीवर बसून 'नागबाबा' या नावाने ओळखले जाणारे शिवभक्त येतात वेदमत्रानी व शखनादात महापूजा साजरी होते. या पाच दिवसात नृत्य, भवई, गाणी, भजन इत्यादी कार्यक्रम होतात व हजारो प्रेक्षक ते पाहतात

मार्चमध्ये भारतातील इतर ठिकाणाप्रमाणेच गुजरातमध्येही होळीचा सण मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो वसत ऋतूच्या स्वागताचा हा सण असतो हा रगाचा उत्सव असतो होळीच्या पूर्वी गुजरातच्या पारपरिक पद्धतीप्रमाणे गर्बा होतो या वेळी मध्यभागी वादक बसतात व सभोवती स्त्रिया गर्बा खेळतात तर पुरुषही स्त्रियांचा खेळ खेळतात होळी नतर दुसऱ्या दिवशी गुलाल व रग उडविला जातो होळीच्या सणाविषयी पुराणात कथा आहे ती अशी की- हिरण्यकश्यपूला अमरत्व प्राप्त झाल्याने तो उन्मत्त झाला आपल्याशिवाय इतर कोणाची भक्ती केलेली त्याला आवडत नसे पण त्याचा मुलगा प्रल्हाद हा विष्णूची भक्ती करू लागला तेव्हा हिरण्यकश्यपूने आपली बहीण होलिका हिला आज्ञा केली की तिने प्रल्हादाचा नाश करावा होलिकेजवळ एक दैवी वस्त्र होते त्या वस्त्रावर ती बसल्यावर अग्नीपासून तिला भय नव्हते म्हणून तिने एक चिता रचली व त्या वस्त्रावर ती बसली मग तिने प्रल्हादाला आपल्या माडीवर बसावयास सागितले त्याप्रमाणे प्रल्हाद तिच्या माडीवर बसल्यावर तिने चितेला आग लावण्याची आज्ञा दिली पण होलिकेचे दैवी वस्त्र उडून जाऊन होलिका जळून गेली मात्र श्रीविष्णूच्या कृपेमुळे प्रल्हाद जिवत राहिला तो प्रसग साजरा करण्यासाठी होळीचा सण केला जातो.

गुजरात व महाराष्ट्र याच्या सरहद्दीवर गुजरात राज्यात डागा ही आदिवासींची वस्ती असलेला भाग आहे. या भागात 'डाग दरबार' नावाचा उत्सव आठवडाभर साजरा केला जातो होळीपूर्वी एक आठवडा हा उत्सव सुरू होतो व होळीबरोबर समाप्त होतो हजारो वर्षांपूर्वीपासून चालत

आलेली वाद्ये यावेळी ऐकायला मिळतात व तशीच नृत्येही पाहायला मिळतात या आदिवासींची जीवनपद्धती प्राचीन काळी होती तशीच आजही आहे कहालिया व ताडपुटा या जुन्या वाद्यांच्या तालावर होणारी आदिवासींची नृत्ये आपल्याला एका वेगळ्या जगात नेतात होळीनतर चौदा दिवसानी खेडब्रम्हनजीक गणभरवेरी खेड्यात चित्रविचित्र आदिवासी जत्रा असते दोन नद्याच्या सगमावर ही जत्रा भरते या सगमाच्या पाण्यात रोग बरे करण्याचे सामर्थ्य आहे अशी यात्रेकरूंची भावना असते चित्रवीर व विचित्रवीर या पुराणकालीन व्यक्ती येथे राहिल्या होत्या व त्याचे रोग या सगमातील स्नानाने बरे झाले म्हणून या जत्रेला चित्रविचित्र जत्रा असे नाव पडले आहे.

पोरबदरपासून साठ मैलावर माधवपूर येथे श्रीकृष्ण व रुक्मिणी याचा विवाह झाला असे मानले जाते त्याची आठवण म्हणून या ठिकाणी होळीनंतर कृष्ण-रुक्मिणी याची वरात काढण्यात येते या भागात मेर लोक राहतात मेर स्त्रियाची नृत्ये व गाणी याचे कार्यक्रम माधवपूर जत्रेत होतात अहमदाबाद येथे शहा आलम जत्रा याच सुमारास भरते. १४१९ मध्ये या मुस्लिम संताचे निधन झाले व त्यानतर ५६ वर्षांनी त्याची कबर बांधण्यात आली जैन धर्मांचे सस्थापक महावीर याच्या जयंतीस महावीर उत्सव साजरा करण्यात येतो हा उत्सव मुख्यत· पालिताना येथील जैन मदिरात होतो प्रार्थना, भजने, पूजा-अर्चा हे त्याचे धार्मिक स्वरूप असते त्यानतर कडक उन्हाळा व लगेच पावसाळा यामुळे मे व जून या महिन्यांत महत्त्वाचे उत्सव किंवा जत्रा होत नाहीत. अहमदाबाद शहर वसविणाऱ्या सुल्तान अहमद शहा याचा गुरू शहा अहमद खटाव बक्ष यांची जत्रा अहमदाबादमध्ये जुलै महिन्यात सरखेडा जत्रा या नावाने भरते. हजारो लोक त्या जत्रेत भाग घेतात गुजरातमध्ये मुस्लिमाच्या दरसाल सुमारे १५० यात्रा व उरूस भरतात त्यापैकी सरखेडा व शहा आलम या यात्रा सर्वात मोठ्या असतात

जगन्नाथपुरी येथील रथयात्रा जगप्रसिद्ध आहे कृष्णाष्टमीच्या दिवशी जुलै-ऑगस्ट मध्ये अहमदाबादमध्येही भव्य रथयात्रा निघते जगदीश मदिरापासून हजारो भक्ताच्या उपस्थितीत रथ निघतो. त्यात कृष्ण, बलराम व सुभद्रा याच्या मूर्ती असतात हत्ती, घोडे, बैलगाड्या या

रथयात्रेत असतात व भक्त मडळी रथ ओढतात शहराच्या प्रमुख रस्त्यातून ही रथयात्रा जाते गुजरातमध्ये पारशाची सख्या बरीच मोठी आहे सजाण, उदवाडा, नवसारी, बिलिमोरिया, अकलेश्वर इत्यादी भागात पारशी एकवटले आहेत आठव्या शतकात इराणहून आलेल्या झरतुष्ट्री धर्मियानी प्रथम गुजरातच्या या भागात वस्ती केली पर्शियाहून हे लोक आले म्हणून त्याना पारशी हे नाव पडले पटेटी हा त्याच्या नव वर्षाचा प्रारभ. हा सण गुजरातमधील पारशी मोठ्या धूमधडाक्यात साजरा करतात आठव्या शतकात या लोकानी इराणहून आणलेला अग्नी उदवाडा येथे अजूनही जळत आहे, त्यामुळे भारतातील सर्व पारशाना उदवाडा अग्नी मदिर अत्यत पवित्र आहे

गोकुळ अष्टमीचा सण गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो हा कृष्णजन्माचा दिवस असून त्या दिवशी दहीहडी, कृष्णाची भजने, रास, गर्बा इत्यादी भव्य प्रमाणावर साजरे होतात द्वारकेला जगत् मदिरात हा सण विशेष प्रमाणात केला जातो. ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये तरनेतर यात्रा भरते राजकोटपासून ७५ किलो मीटर्सवर त्रिनेत्रेश्वर हे शिवाचे मदिर आहे त्याचा अपभ्रश होऊन तरनेतर झाले अहमदाबादपासून ९५ मैलावर वाडथा येथे कार्तिक महिन्यात जत्रा भरते त्यावेळी तेथे गाढवाचा मोठा बाजार भरतो.

ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये येणारे नवरात्र, दसरा व दिवाळी हे गुजरातमधील सर्वात मोठे सण आहेत दसऱ्यापूर्वी नऊ रात्री सपूर्ण गुजरातमध्ये गर्बा व दांडिया नृत्य (टिमटी) याचा जल्लोष होतो. अनेक ठिकाणी सबध रात्र हा कार्यक्रम चालतो. मध्ये अबा मातेची मूर्ती ठेवण्यात येते, त्या मूर्तीजवळ गायक-वादक बसतात व सभोवती स्त्री-पुरुष फेर धरून गर्बा नृत्य करतात गुजराती स्त्रिया छिद्रे पाडलेल्या मडक्यात पणती ठेऊन शक्तिपूजा करतात ही मडकी गर्बा नृत्याच्या वेळी मध्यभागी ठेवण्यात येतात. नवरात्रीत गर्बा नृत्याच्या चढाओढी होतात व विजेत्या सघाना मोठमोठी पारितोषिके देण्यात येतात नवरात्रीतील गर्बा रास ही नृत्ये अत्यत प्रेक्षणीय असतात दसरा हा सण रामाचा रावणावर झालेला विजय साजरा करण्यासाठी केला जातो नवरात्रात राम व गर्बा याच्याबरोबरच रामलीलाही नऊ रात्री दाखविण्यात येते शेवटच्या रात्री

रावण व इतर असुरांचे दहन करण्यात येते त्यात रावण, मेघनाद व कुभकर्ण यांच्या प्रतिकृती असतात दीपावली हा सण भारतातील इतर भागाप्रमाणे गुजरातमध्येही प्रचड प्रमाणावर साजरा होतो. रावणाचा पराभव करून विजयी राम दीपावलीला आपल्या राजधानीला- अयोध्येला परतला हे या दिवसाचे वैशिष्ट्य आहे. दिवाळीच्या पाडव्यापासून व्यापाऱ्यांचे नवे वर्ष सुरू होते गुजरात हा उद्योग व व्यापारप्रधान प्रात असल्याने तेथे या नव्या वर्षाला अतिशय महत्त्व आहे लक्ष्मीपूजन हे तेथें अत्यत थाटाने साजरे केले जाते वर्ष प्रतिपदेपासून व्यापाऱ्याचे नवे हिशोब सुरू होतात. दुसऱ्या दिवशीची भाऊबीजही भारताच्या इतर राज्याप्रमाणे गुजरातमध्ये साजरी होते सिद्धपूर येथे भरणाऱ्या वार्षिक जत्रेत उटाचा मोठा बाजार भरतो. सोळकी वशातील सिद्धराज जयसिंहचे स्मारक म्हणून हे गाव वसले आहे ब्राम्हणाची मोठी वस्ती व ज्ञानाची दीर्घ परपरा ही गावाची वैशिष्ट्ये आहेत. शिवाचा मुलगा कार्तिकेय याच्या स्मरणार्थ सोमनाथ येथे दरसाल मोठी जत्रा भरते. या जत्रेत नाटके, नृत्य वगैरे करमणुकीचे कार्यक्रम होतात कार्तिकेयाच्या जत्रेचा उल्लेख पुराणातही आहे साबरकठ जिल्ह्यात शामलजी येथेही वैष्णवाची जत्रा भरते. जवळच असलेल्या राजस्थानमधूनही या यात्रेसाठी भक्त येतात. पचमहल जिल्ह्यातील आदिवासींचे दैवत महाकाली हे आहे पावागड टेकडीच्या पायथ्याशी महाकालीची जत्रा भरते. बनासकठ जिल्ह्यातील अबाजीची जत्रा ही प्रख्यात आहेत स्वामी नारायण पथाचा गुजरातमध्ये मोठा प्रसार आहे या पथाची जत्रा गडान येथे जल जितानी जत्रा या नावाने भरते. मोहरम हा मुसलमानाचा आणि नाताळ हा ख्रिश्चनाचा सणही गुजरातेतील त्या त्या धर्मांचे अनुयायी साजरे करतात. मुसलमान धर्माचे सस्थापक महंमद याच्या जन्मदिनी ईद-मिलाद साजरा होतो अहमदाबादचा सस्थापक अहमद शहा याच्या कालापासून गुजरातेत स्थायिक झालेल्या मुस्लिमाची सख्या बरीच मोठी आहे. रमजानचा महिना व रमजान ईद हे मुसलमानाचे महत्त्वाचे सण गुजरातमधील मुस्लिम उत्साहाने साजरे करतात. गुजरातमध्ये ख्रिश्चनाची संख्या मोठी नाही, पण नाताळ हा सण व नववर्षाचे आगमन ख्रिश्चन लोक धूमधडाक्याने साजरे करतात विशेषत: मोठ्या हॉटेल्समधील ३१ डिसेंबरच्या रात्री नृत्य-गायन व मेजवान्या लक्षणीय असतात हिंदू, जैन, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन अशा

सर्व धर्मांचे सण गुजरातेत साजरे होतात

गुजराती साहित्यविषयक परपरा प्राचीन व श्रेष्ठ अशी आहे श्री के एम. मुनशी यांनी 'गुजरात अँड इट्स लिटरेचर' नावाचा उत्कृष्ट ग्रथ या विषयावर लिहिला असून म. गाधींनी त्याची प्रस्तावना लिहिली आहे या प्रस्तावनेत गाधीजींनी गुजरातच्या लोकगीताचा खास उल्लेख केला आहे. स्वत· गाधीजी हे नरसी मेहता, संत मीरा इत्यादी गुजराती साहित्यातील पूर्वसुरीचे फार मोठे चाहते होते. गेल्या पाऊणशे वर्षांतील गुजराती भाषा व साहित्य यावर गाधीजींच्या साध्या प्रासादिक भाषेचा फार मोठा प्रभाव पडला आहे. इ स ५५० मध्ये गुजरातचा राजा ज्या भागात होता, त्याला आज मारवाड हे नाव आहे राजधानीचे नाव भिल्लमला असे होते राजांना गुर्जर किंवा गुर्जरेश्वर असे म्हणत असत. महाकवी प्रेमानंद यानी आपल्या 'दशम स्कंध' या ग्रथात या भागातील भाषेचा उल्लेख 'गुजराती भाषा' असा प्रथम केला मात्र अपभ्रंश किंवा प्राकृत भाषा या नावाने ही भाषा त्यापूर्वीही प्रचलित होती मराठी, हिंदी, बगाली या भाषाप्रमाणे गुजराती भाषाही आर्य भाषेच्या कुळातील आहे प्राचीनकाळी सस्कृत, अर्धमागधी या माध्य· तून ही भाषा विकसित झाली गेल्या हजार वर्षांचा गुजराती भाषेचा इतिहास लक्षात घेतला तर ती गौर्जर अपभ्रंश, गुर्जर भाषा व अर्वाचीन गुजराती अशा तीन खंडांत विभागता येईल अर्वाचीन गुजराती ही सतराव्या शतकापासून प्रचारात आली

कोणत्याही भाषेतील मूळ ग्रथ हे धार्मिक असतात संस्कृतमध्ये महाभारत, रामायण, हिब्रू व इग्रजीत बायबल, मराठीत ज्ञानेश्वरी तसेच गुजरातीतील मूळ ग्रथ हे धार्मिक आहेत पालिताना येथील जैन मुनी पदालिप्ता प्राचार्य याचा 'तरगवती' हा ग्रंथ यादृष्टीने महत्त्वाचा आहे. त्यातील नायिका तरंगवती ही दीक्षा घेते असे वर्णिले आहे हरिभद्र कवींनी 'सुदर्शन समुच्चय' व 'धर्मकथा' हे ग्रंथ लिहिले ब्राम्हण असलेल्या हरिभद्र यांनी नतर जैनदीक्षा घेतली होती दहाव्या ते बाराव्या शतकात गुजराती साहित्याला बहर आला प्राकृत, अपभ्रश व लाटी या भाषेत विपुल साहित्य निर्माण झाले दक्षिण गुजरात हा त्या वेळी 'लाट' देश म्हणून ओळखला जात होता व तेथे लाटी भाषा प्रचलित होती. या काळातील लाटी साहित्यात गुजरातीतील विनोदी साहित्याचा उगम दिसतो

गुजरातच्या वाङ्मय विकासास जयसिंह सिद्धराजाच्या कारकीर्दीस फार महत्त्व आहे सिद्धराजाने १११४ मध्ये सौराष्ट्र जिंकले. ११३० पर्यंत त्याने कोटा, मारवाड व माळवापर्यंत आपले राज्य पसरले. त्याने पन्नास वर्षे राज्य करून गुजरातला समृद्धी व स्थैर्य दिले; साहित्याच्या विकासाला त्याची अत्यत आवश्यकता असते सिद्धराज हा वाङ्मयाचा व कलाचा भोक्ता व आश्रयदाता. भोजराजाशी याबाबत तो स्पर्धा करण्याची महत्त्वाकाक्षा धरीत होता. उज्जैनसारख्या ज्ञानाच्या क्षेत्रात प्रख्यात असलेल्या नगरीहून त्याने अनेक विद्वान, पडित, साहित्यिक अनहिलवाड या आपल्या राजधानीत आणले पाटण येथे सिद्धराजाने भाव बृहस्पतींना आणले व विद्यापीठाची स्थापना केली सस्कृतपरपरेचे त्यामुळे पुनरुज्जीवन झाले आणि हेमचद्रासारखे साहित्यभास्कर उदयास आले हेमचंद्राने जैन साहित्याला सस्कृतचा दर्जा दिला व्याकरण, निघटु शिक्षा, काव्यशास्त्र, तर्कशास्त्र, चरित्र इत्यादी अनेक क्षेत्रात हेमचद्राने मूलभूत रचना केली. महावीर व शीख याच्यातील साधर्म्य दाखवून त्याने हिंदू व जैन याच्यात जवळीक निर्माण केली अपभ्रश व प्राकृत या भाषात त्याने रचना केल्या व जैन म्हणून त्याचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. 'देशीनाममाला' हा त्यांचा ग्रथ म्हणजे देशी शब्दांचा सर्वात मोठा कोश आहे त्यानतर दीड शतक गुजरातमध्ये साहित्याची अभिवृद्धी होत गेली. मात्र १२९९ साली अल्लाउद्दिन खिलजी याने गुजरातवर स्वारी करून देवळे पाडण्याचा व लोकांना बाटविण्याचा कहर केला या धर्मछळाला वैतागून गुजरातमध्ये अभूतपूर्व पळापळ सुरू झाली विद्वान, पंडित, कवी, लेखक, इतर कलावत हे अनहिलवाड सोडून ग्रामीण भागात पळून गेले

मात्र या पळापळीचा एक अनपेक्षित फायदा झाला तो असा की, आतापर्यंत राजधानीत राजाश्रयाखाली राहणाऱ्या पडिताचा व साहित्यिकाचा प्रत्यक्ष जनतेशी जवळचा सबध आला तळागाळातल्या लोकाची भाषा व सस्कृती याची त्याना प्रथमच जाणीव झाली व साहित्य हे हस्तिदती मनोऱ्यातून निघूंन लोकाभिमुख होऊ लागले अल्लाउद्दिन खिलजीच्या आक्रमणामुळे गुजराती साहित्यात वास्तव युगाची चाहूल सुरू झाली. आपल्याकडे ज्याप्रमाणे तमाशा, लावणी हे काव्यप्रकार लोकवाङ्मयातून आले तसेच गुजराती साहित्यात रास, फागु, बारमासी,

कक्का, आख्यान हे वाङ्मयप्रकार सुरू झाले. सर्वांना समजणाऱ्या भाषेत सर्वसामान्य लोकांच्या भावना व्यक्त केल्या जाऊ लागल्या रास हा प्रकार जनमानसात इतका खोलवर रुजला की नतरची अडीचशे वर्षे गुजरातच्या साहित्यातील सर्वात प्रभावी प्रकार होता. 'भारत-बाहुबली रास' ही सर्वात जुनी रचना आहे बाहुबली व भारत याच्यातील संघर्ष आणि बाहुबलीला झालेल्या दैवी साक्षात्कारामुळे त्याने घेतलेला सन्यास यांची ही रसाळ कहाणी आहे रास या प्रकाराबरोबरच फागु म्हणजे फाल्गुन महिन्यात गावयाची गाणी प्रसिद्ध आहेत. ही जैनाची रचना आहे. 'वसत विलास' हा फागु त्यातील सर्वात प्रसिद्ध आहे. मात्र तो लोकाच्या पठणातून पुढील पिढीस मिळाला त्यामुळे त्याचे जनकत्व कोणाकडे आहे याची निश्चित माहिती नाही आपल्याकडेही खेडोपाडी म्हटल्या जाणाऱ्या शेकडो ओव्याचे मूळ अज्ञात आहे प्रबध हा ऐतिहासिक आख्यानाचा प्रकार आहे. 'कान्हडदे प्रबध' हा त्यापैकी सर्वात मशहूर आहे पद्मनाभ नावाच्या झालोरच्या रास कवीने ही रचना केली ही एक महान वीरगाथा आहे. आपल्याकडील पोवाड्याशी याची जातकुळी जुळते कान्हेने अल्लाउद्दीन खिलजीबरोबर केलेल्या ‑‑ढाईचा हा रोमहर्षक काव्यमय वृत्तात आहे.

नरसी मेहताने गुजराती साहित्यात नवे युग सुरू केले त्याच्या आसपास सत मीरा, प्रेमानद, आखो, दयाराम इत्यादी इतर सतकवी होते त्याच्या मधुर व रसाळ काव्याने गुजराती संत भक्तियुगाचा प्रारंभ झाला महाराष्ट्रात ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ इत्यादी अपूर्व प्रतिभेच्या कवींनी भक्तियुग सुरू केले तसेच ते नरसी मेहतांच्या काळात (पंधरावे शतक) गुजरातेत सुरू झाले नरसी मेहता हा गुजरातीतील आख्यानक कवितेचा जनक आहे सत मीराबाईची पदे गुजरातीबरोबरच व्रज व राजस्थानी या भाषातही आहेत. काठेवाडातला कवी आखो याने आपल्या तुकारामाप्रमाणेच समाजातील भोदूगिरी व खोटेपणा यावर कोरडे ओढले सोळाव्या शतकाचा शेवटचा काळ हा आखोच्या प्रभावाचा काळ होता. बडोद्याचा प्रेमानद हा सतराव्या शतकातील महत्त्वाचा कवी त्याने प्राय: आख्यानकाव्ये लिहिली. आपल्या पन्नास ग्रथांनी त्याने गुजरातच्या सुसस्कारी समाजाचे उत्कृष्ट चित्रण करून साहित्यात चैतन्य आणले दयाराम हा अठराव्या शतकातील कवी म्हणजे गुजराती साहित्यातील ...

महत्त्वाचा टप्पा आहे. तो डभोई गावचा, पण कृष्णभक्तीमुळे डाकोरला आला गरबा गीताच्या भक्तिरसपर, रसाळ रचनेने दयारामला गुजराती साहित्यात अपूर्व स्थान दिले आहे

त्यानतरचे गुजराती युगप्रवर्तक कवी म्हणजे नर्मदाशकर. त्याचा जन्म सुरत येथे १८३३ साली झाला पण संस्कारी वयाच्या काळात ते मुबईला आले त्यामुळे पाश्चात्य साहित्य व विचार याचा त्याच्यावर प्रभाव पडला. नर्मदाशकर यानी गुजराती साहित्याचे आधुनिकतेशी नाते जोडले 'जय जय गरवी गुजरात' हे त्याचे अमर गीत गुजरातचे राज्यगीत झाले आहे. 'नमकविता', 'रसप्रवेश', 'अलंकार प्रवेश', 'धर्मविचार', 'पिंगल प्रवेश' इत्यादी त्याचे ग्रंथ आधुनिक गुजरातीचे अभिजात ग्रथ ठरले आहेत. नर्मदाशंकर हे उत्कृष्ट वक्तेही होते. त्यामुळे त्यांच्या विचाराचा व काव्याचा प्रभाव पडण्यास फार साहाय्य झाले १८८५ मध्ये त्यांचे निधन झाले.

दलपतराम डाह्याभाई हे नर्मदाशकर याचे समकालीन 'दलपत पिंगल', 'दलपतकाव्य' इत्यादी त्यांच्या ग्रथात अत्यंत सोपी पण मनावर जबरदस्त परिणाम करणारी भाषा त्यांनी वापरली आहे त्यांचे काव्य नीतिमत्तेवर भर देणारे व उपदेशात्मक आहे. त्याच्या सरळ रचनेमुळे दलपतरामाचे काव्य गुजराती समाजात खोलवर रुजले आहे दलपतरामाचे चिरजीव व्हानालाल हेही महाकवी झाले हे गुजरातचे सुदैवच 'दोलन शैली' किंवा मुक्तछंद ही व्हानालाल यांची गुजराती साहित्याला देणगी आहे. 'जयाजयंत', 'इदूकुमार' सारखी त्याची वृत्त बद्ध नाटके ही अभिजात नाट्यकलेचा उत्कृष्ट आविष्कार आहे. कलापी हे कवी निसर्गवर्णनाबद्दल प्रसिद्ध आहेत. त्यांच्यावर वर्डस्वर्थ या पाश्चात्य कवीचा उघड प्रभाव दिसतो. 'कलापीनो केकारव' हा त्यांचा काव्यग्रथ सर्वमान्य झाला आहे. मणिशंकर भट्ट ऊर्फ 'कात' यानी आपल्या सात खडकाव्यानी गुजराती साहित्यात महत्त्वाची भर घातली एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस गोवर्धनदास त्रिपाठी या गुजरातीतील एका महान गद्यलेखकाने 'सरस्वतीचंद्र' ही प्रदीर्घ कादंबरी लिहून आधुनिक 'क्लासिक' ची निर्मिती केली ही गुजरातीतील सर्वात महान कादबरी.

विसावे शतक हे गुजराती भाषेत म. गांधींचे शतक असे म्हणावे लागेल या काळात महात्माजींचे निष्ठावंत जीवन व त्याची सोपी पण प्रभावी भाषा याची सपूर्ण गुजराती साहित्यावर छाप पडली कन्हैयालाल मुन्शी, उमाशकर जोशी, गुलाबदास ब्रोकर, विष्णुप्रसाद त्रिवेदी, ज्योतींद्र दवे, सुरेश जोशी, काकासाहेब कालेलकर, किशोरीलाल मश्रुवाला, रामनारायण पाठक, मेघाणी, 'धूमकेटर', चद्रवदन इत्यादी विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकापासून आतापर्यंतचे प्रमुख गुजराती लेखक हे म. गांधींच्या प्रभावातील साहित्यिक आहेत. एकेकाची सस्कृतनिष्ठ व विद्वतापूर्ण भाषा हे गुजराती साहित्यकारांच्या प्रतिष्ठेचे लक्षण होते पण 'मोट हाकणाऱ्यालासुद्धा हे सहज समजू शकेल, तेच साहित्य' हा गांधीजींचा आदर्श आता इतर लेखकांनी शिरोधार्य मानला. गांधीजींच्या शैलीवरही नरसी मेहताचा प्रभाव आहे म्हणजे गुजराती साहित्य पुन्हा सतकवींच्या शैलीच्या वळणावर गेले म्हणूनच ते विद्यापीठाच्या काचेच्या कपाटात न राहता आमजनतेत रुजले. या बुझुर्गांनंतरची पिढी म्हणजे हरिंद्र दवे, बकुल त्रिपाठी, मधु राय, निरंजन भगत, चद्रकात बक्षी, राजेंद्र शहा, रघुवीर चौधरी, कुदनिका कापडिया या आधुनिकाची सामाजिक जाणिवेवर या नव्या पिढीने भर दिला महात्माजींच्या साहित्यात व प्रेरणेत सामाजिक जाणिवेचे भरपूर भान होते, पण तिचे मुख्य लक्ष त्या वेळेच्या गरजेनुसार स्वातत्र्यप्राप्तीवर होते. अशा गुजरातमध्ये प्रखर असे दलित साहित्यही लिहिले जाऊ लागले. मनीषी, जानी, नीरव पटेल, मौन बलौली, दलपत चव्हाण इत्यादींच्या विद्रोही साहित्याने समाज ढवळून निघला 'आक्रोश' आणि 'हूं' या नियतकालिकानी या नव्या पिढीच्या उद्रेकाला वाट करून दिली


गुजरातीत गेल्या पन्नास वर्षांत महिलांनीही समर्थ भर टाकली आहे सत मीरेचा वारसा घेऊन अलीकडच्या काळात कुदनिका कापाडिया, इला मेहता, मीनल दीक्षित, वसुबेन भट, उषा शेठ, स्वरूप ध्रुव इत्यादी लेखकानी आपले स्वतत्र्य स्थान निर्माण केले आहे. 'सात पगला आकाशमां' या कुदनिका कापडिया याच्या कादबरीला १९८५ चे दिल्लीच्या साहित्य ॲकॅडमीचे पारितोषिक मिळाले आहे एका बडखोर स्त्रीचे चित्र त्यानी या कादबरीत रेखाटले आहे स्त्रीमुक्तीवर अनेक गुजराती लेखिकानी

आशयपूर्ण लेखन केले आहे.

श्री उमाशंकर जोशी आणि श्री पन्नालाल पटेल या दोन गुजराती लेखकाना भारतातील सर्वोच्च असे ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले आहे. साराश, गुजराती वाङ्मय अत्यत समृद्ध असून त्याचा उत्तरोत्तर विकास होत जाईल याची खात्री देणारी नवी दमदार साहित्यिकाची फळी आज सज्ज आहे

❑

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0027148


गुजरात
पाकिस्तान
अबूरोड
पालनपुर
मेहसाणा
भुज
कांडला
अहमदाबाद
सुरेंद्रनगर
राजकोट
ओखा
द्वारका
आनंद
जूनागढ़
भावनगर
सूरत
डांग
धरमपुर
दमण
पश्चिम समुद्र
महाराष्ट्र